

# अरुणोदय

## गौरवशाली परंपरेचा..!



ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्

# अरुण नरके फौंडेशन

**समाजसेवेतील तब्बल २६ वर्षांचा अनुभव असणारी यशस्वी संस्था...**

## रौप्यमहोत्सवी विशेषांक

## आमचे प्रेरणास्थान



**मा.श्री.अरुण दत्तात्रय नरकेसो**

संस्थापक : अरुण नरके फौंडेशन



**मा.श्री.चेतन अरुण नरकेसो**

अध्यक्ष : अरुण नरके फौंडेशन

वाणिज्य सल्लागार, अर्थमंत्रालय थायलंड सरकार

# अनुक्रमणिका


प्रास्ताविक ..........

संपादकीय ..........

आम्ही सारस्वताचे उपासक ..........

परिचय ..........

ध्येय, उद्दिष्ट्ये ..........

मान्यवरांच्या विचारांचा नंदादीप ..........

सामाजिक उपक्रम ..........

शैक्षणिक उपक्रम ..........

लाभार्थी ..........

पुरस्कार ..........

वर्तमानपत्रांनी घेतलेली दखल ..........

भविष्यातील उपक्रम ..........

आव्हान ..........

समारोप ..........

अभिप्राय

- मान्यवरांची मनोगते
- यशवंतांची यशोगाथा
- कर्मचारी मनोगते

# प्रास्ताविक

प्राचीन काळापासून भारतखंडात सामाजिक जाणिवेतून महानकार्य केली गेली, कोणी एक कार्य करणे व अनेकांनी मिळून करणे यातून एकसंघतेची भावना व विविधतेत एकता ही खरी भारतखंडाची ओळख आहे.

सामाजिक ऐक्यातूनच सर्वांना बरोबर घेऊन समाजाचा विकास सर्वोतोपरी साधला जातो. थोर पुरुष व संतांची, संशोधक, दूरद्रष्टे अशा उच्च लोकांची भूमी असणारा हा प्रदेश सबंध जगात कायम आपली उच्च प्रतिमा दर्शवित आला आहे तो केवळ आपल्या कार्यातून, कर्तुत्वातून..! त्यात दख्खन ची भूमी म्हणजे महाराष्ट्र ! हा तर श्री. छत्रपती शिवरायांच्या एकनिष्ठ व सहकारातून, एकतेकडून समृद्धिकडे जाणाऱ्या मर्द मावळ्यांचा, माता–भगिनींचा निष्ठावतांचा प्रदेश..!

अशा पुण्य भुमित अस्पृश्यतेच्या प्रथेला न जूमानता, मानवतेची रूजवणूक करणाऱ्या श्री छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यभूमीत सामाजिक भावना व जाणिवेतून श्री करवीर क्षेत्री सन १९९४ साली स्थापित झालेले 'अरुण नरके फौंडेशन' (ANF) आज महान वटवृक्ष बनतोय, संस्थेच्या कार्य व कर्तृत्वाच्या फांद्या विविध कार्याच्या माध्यमातून आज विस्तारत आहेत.

ज्याच्या मुळाशीच उच्च गुणवत्ता असणारी माती आणि पोषक द्रव्ये आहेत म्हणजेच उत्तमोत्तम गुणवान, ज्ञानवान व्यक्तीचा समूह आहे तिथे म्हणावे लागेल..

'शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी'

सामाजिक, शैक्षणिक, संशोधन, कला, क्रिडा, सहकार इ. क्षेत्रात आपला विशेष ठसा उमटविणारे, लोकांच्यासाठी, लोकहितास्तव, लोकार्पण भावनेने, निस्पृह अद्यावत कार्य करणारे २६ वर्षांची अखंड परंपरा जपत थोरामोठ्यांचे आशिर्वाद , सल्ले घेत नव सृजनात्मकतेला गती देणारे, नव्याचा स्विकार, जुन्यांचा आदर बाळगत, नवनवीन उपक्रम राबवून भारतीय प्रशासनात आपल्या गुणवान विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ठसा उमटविणारे सर्वांना आपलेच व हवेहवेसे वाटणारे आपल्या हक्काचे 'अरुण नरके फौंडेशन' (ANF)

''इवलेसे रोप लावियले द्वारी,
तयाचा वेलू गेला गगनावरी ''

या उक्तीप्रमाणे संस्थेच्या यशाची कमान सतत चढती राहिली आहे. राष्ट्रहितार्थ राष्ट्राच्या समृद्ध सर्वांगिण विकसीत जिवनासाठी राष्ट्रीय मूल्यांचा स्विकार करून कायम सेवा देण्यात अरुण नरके फौंडेशन सदैव वचनबद्ध आहे !

# संपादकीय

कृषी, दुग्धव्यवसाय, सहकार आणि क्रिडा क्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्ती म्हणून संपूर्ण महाराष्ट्र अरुण नरके साहेबांना ओळखतो. पाच दशकांहून अधिक काळ या क्षेत्रांमध्ये आपले विविधांगी योगदान आदरणीय अरुण नरके साहेब देत आहेत. अरुण नरके साहेबांच्या पन्नासाव्या जन्मदिनाच्या औचित्याने सामाजिक क्षेत्रात योगदान देणारी सेवाभावी संस्था स्थापावी आणि त्याद्वारे समाज जीवनाच्या प्रत्येक आघाडीवर व्यापक प्रमाणातील लोकोन्नतीचे कार्य सर्वदूर पसरावे अशा उदात्त हेतूंनी अरुण नरके साहेब आणि त्यांच्या मित्र परिवाराने २९ नोव्हेंबर १९९४ रोजी अरुण नरके फौंडेशन ची स्थापना केली. संस्थेचे संस्थापक श्री. अरुण नरके, संस्थेचे अध्यक्षपद भूषविलेले श्री. रामचंद्र पाटणकर, श्री. रवींद्र उबेरॉय, श्री. पी.टी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली संस्था उत्तरोत्तर बहरत गेली. आज २६ वर्षांचा हा मोठा टप्पा यशस्वीरीत्या पार केल्यानंतर फौंडेशनच्या अध्यक्ष पदाची धुरा नव्या पिढीकडे आली आहे.

उच्चविद्याविभूषित असलेले आणि जागतिक पातळीवरील मोठ्या संस्थांच्या कामाचा अनुभव असलेले श्री. चेतन अरुण नरके अध्यक्ष पदाची ही जबाबदारी मोठ्या उत्साहाने सांभाळत आहेत, त्यांची समाजाप्रती असणारी संवेदनशीलता, अचूक विश्लेषण, समस्यांचे निराकरण करण्यासाठी असणारी सततची धडपड आणि नाविन्याची आस या कार्यपद्धतीतून निश्चितच संस्थेचा आणखी विकास आणि विस्तार होणार आहे.

जेष्ठांकडून ही ध्येय पताका पुढे नेताना नव्या पिढीला आपला उज्ज्वल इतिहास माहित असणे आवश्यक आहे. कारण जो इतिहास विसरतो त्याला वर्तमान समजत नाही आणि वर्तमान न समजल्याने भविष्य घडवता येत नाही! संस्था स्थापनेपासून आज पर्यंत समाजहिताचे अविरत कार्य चालू आहे. संस्थेच्या २६ वर्षांच्या या कार्याचा धावता घेणारा, या कार्याचे स्मरण करुन देणारा आणि हे कार्य उभे करणाऱ्या शिलेदारांच्या आठवणींना उजाळा देणारा संस्थेच्या इतिहासाचा संक्षिप्त दस्तावेज नव्यापिढीला उपलब्ध व्हावा, या हेतूने आशा प्रकारचा अहवाल तयार करावा अशी कल्पना संस्थेचे अध्यक्ष श्री. चेतन नरके यांनी मांडली. संस्थापक श्री. अरुण नरके साहेबांनी या संकल्पनेचे स्वागत केले.

संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. रामचंद्र पाटणकर, श्री. रविंद्र उबेरॉय यांनी त्यांच्या अनुभवातून संस्थेविषयीच्या हळव्या आठवणींना उजाळा दिला. जुन्या नोंदी, अहवाल, फोटो, वृत्तपत्रांची कात्रणे, लाभार्थ्यांचे अभिप्राय इत्यादी गोष्टी एकत्रित करुन क्रमवार पद्धतीने त्या-त्या विषयांशी संबंधित दस्तावेज संकलित केले गेले. याकामी संस्थेचे विकास अधिकारी श्री. शशिकांत सुतार, वरिष्ठ लेखाधिकारी श्री. प्रकाश शिंदे, वरिष्ठ लिपिका सौ. शुभांगी शेळके, शिवाजी पेठ शाखेचे शाखाधिकारी रमेश कांबळे, नागाळा पार्कच्या शाखाधिकारी सौ. गौरी देशपांडे, ग्रंथपाल सौ. राजेश्वरी पवार, समुपदेशक सौ. शुभांगी शिंदे, समुपदेशक सौ. अश्विनी बोडके, कु. आकाश शेवाळे इत्यादींचे मोलाचे सहकार्य लाभले.

# संपादकीय

हा अहवाल तयार करीत असताना, अरुण नरके फौंडेशनच्या गेल्या २६ वर्षातील कार्याचा धावता आढावा घेताना त्याला तांत्रिक स्वरूप येऊ न देता तो अधिक वाचनीय व्हावा असा प्रयत्न केला आहे. शिवाय, भविष्यातील कार्याची दिशा विभागवार स्पष्ट केली आहे. या अहवालाबरोबरच संस्थेच्या चालू असलेल्या आणि प्रस्तावित असणाऱ्या विविध प्रकल्प आणि उपक्रमांबद्दल आपल्या सूचना, प्रतिक्रिया, अभिप्राय यांची संस्थेच्या वाढीस निश्चितपणे मदत होणार असल्याने त्याचे स्वागत आहे. या अहवालाद्वारे अरूण नरके फौंडेशनशी असणारे आपले स्नेह संबंध आणखी दृढ होतील या खात्रीसह.....

# आम्ही सारस्वताचे उपासक

अरुण नरके ही आता व्यक्ती राहीली नसून ती संस्था झाली आहे.सहकार, शैक्षणिक, क्रीडा, बँकिंग, शेती, युवा, राजकीय, सामाजिक अशा विविध क्षेत्रावर अरुण नरके यांनी आपल्या व्यक्तिमत्वाचा आणि कार्य कुशलतेचा ठसा उमटवला आहे. अरुण नरके या नावाला एक वलय आहे आणि हे वलय दुग्ध व्यवसायातल्या त्यांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील कामगिरीने अधिकच विस्तारले आहे. महाराष्ट्रात या नावाला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

अरुण नरके यांची यशस्वी जीवनाची ७७ वर्षाची वाटचाल नोव्हेंबर मध्ये पूर्ण होत आहे. त्यांचा हा वाढदिवस नवी स्वप्ने फुलवणारा, गतस्मृतींना उजाळा देणारा आहे. त्या दृष्टीने त्यांचा हा वाढदिवस परंपरागत पद्धतीबरोबर काही नवी स्वप्ने सत्यात उतरविण्याच्या दृष्टीने संकल्प करणारा ठरावा. या दृष्टीने हा वाढदिवस काही नविन उपक्रमांनी साजरा व्हावा असे नरके परिवारातल्या साऱ्यांनाच वाटत आहे.

ज्या वेळी अरुण नरके यांनी सुवर्णमहोत्सवी जीवनप्रवास पुरा केला, त्यावेळी त्यांचा पन्नासावा वाढदिवस सर्वांच्याच स्मरणात कायम रहावा या दृष्टीने एक निधी गोळा करावा आणि त्या निधीतून अनेक उपक्रमांचे नियोजन करावे, ते करताना अरुण नरके यांना अभिप्रेत असलेले आणि त्यांनी ज्या ज्या क्षेत्रात काम केले त्या क्षेत्रांचा विचार करावा आणि त्याही क्षेत्रात काम करावे असा विचार झाला, या कल्पनेतूनच सुमारे पन्नास लाखांचा निधी गोळा झाला. आमच्या या आवाहनाला साऱ्या क्षेत्रातून आणि गावपातळीपासून शहरापर्यंत सर्व थरातल्या व्यक्ती व संस्थांनी आमच्या कल्पनेचं स्वागत केलं, त्या कल्पनेला सक्रीय प्रतिसाद दिला. आजच्या स्पर्धेच्या युगात भरकटलेल्या युवक–युवतींना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन देत असतानाच त्यांना प्रसंगी धीर देण्याचं आणि योग्य मार्गदर्शन करायचं काम अरुण नरके फौंडेशनने केले. सध्या विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जातं, त्यांच्यातल्या गुणांचा अचूक उपयोग कसा करता येतो याविषयी अनेक तज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ अरूण नरके फौंडेशनने त्यांना करून दिला आहे.

समाजात डोळसपणाने वावरताना आज अनेक कामे करण्याची गरज आहे. समाज शिक्षणापासून आरोग्यापर्यंत, व्यवसाय मार्गदर्शनापासून आरोग्यापर्यंत आणि व्यवसाय मार्गदर्शनापासून नव्या पिढीला सामाजिक प्रबोधन करण्याचे काम विविध स्तरावर निरनिराळ्या माध्यमातून कार्यकर्त्यांच्या सहकार्याने करायचे आहे. काही कामे श्रमातून उभी राहतात, काही कामे मार्गदर्शनातून उभी राहतात. पण काही काही कामे आर्थिक बळाशिवाय उभी राहू शकत नाहीत आणि त्यासाठीच अरुण नरके फौंडेशन ही संस्था अधिक भक्कम होण्याची गरज आहे. सामाजिक जाणिवा अजून तरी जाग्या आहेत, सामाजिकतेचं भान अजून उरात कुठं तरी विविध प्रसंगातून सतत जागवते. अशा व्यक्तिंचं व संस्थांचं सहकार्य त्यासाठी अपेक्षित आहे.

अरूण नरके यांचा मित्र परिवार साऱ्या महाराष्ट्राभर विविध क्षेत्रात विखुरलेला आहे. अरुण नरके यांचा ७७ वा वाढदिवस वेगळ्या पद्धतीने आणि नवे सामाजिक उपक्रम सुरु करुन, पूर्वी सुरू केलेले उपक्रम अधिक जोमाने सुरु ठेवण्याच्या दृष्टीने विचार करुन साजरा करावा व आमच्या उपक्रमास सर्वांनी सहकार्स करावे ही अपेक्षा आहे.

# आम्ही सारस्वताचे उपासक

अरुण दत्तात्रय नरके हे सामाजिक क्षेत्रातलं भारदस्त नाव! दुग्ध व्यवसाय आणि सहकार या क्षेत्राशी अरुण नरके साहेब यांचे नांव त्या क्षेत्रातल्या कामामुळे जोडले गेले. सामाजिक जाणिवांचे भान कायम ठेवून ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंतचे अनेक छोटे मोठे प्रश्न शांत, संयमी स्वभावाने त्यांनी हाताळले आहेत. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धक असावेत पण शत्रू नसावेत असं म्हणतात, पण अरुण नरके यांनी आपल्या स्वभावाने स्पर्धक आणि शत्रू या दोघांनाही आपलंसं करुन घेतलं.

संकटात मदतीला धावून जाणं हा त्यांचा स्थायीभाव..! धावणाऱ्याला प्रोत्साहन देण्याची वृत्ती..! त्यामुळे सर्वच क्षेत्रात त्यांनी आपला असा वेगळा ठसा उमटविलेला आहे. स्वतःचं वेगळेपण सिद्ध केले. मात्र ते सिद्ध करताना आपली लीनता कधी सोडली नाही. जेष्ठ, श्रेष्ठ व्यक्तीपासून ते तळागळातल्या लहान कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांनाच ते हवेहवेसे वाटतात. ते याच कारणाने ! सहकार, शिक्षण, क्रीडा, शेती, दुग्ध व्यवसायापासून ते अनेक साहित्यिक, कवी, कलाकारांना विविध स्वरूपात आधार द्यायचं काम अरुण नरके यांनी केलं आणि आपल्या कार्यपद्धतीचा ठसा या क्षेत्रांवर उमटवला. ज्या ज्या व्यक्तीत काही विशेष गुण जाणवले ते आपल्यात कसे आणता येतील याचा सतत ध्यास असणारं हे व्यक्तीमत्व!

आज अरुण नरके घरात जसे वडील, आजोबा, सासरे अशा विविध नात्यांनी वावरत आहेत त्याच प्रमाणे मित्र परिवारात व व्यवसायात अरुण नरके साहेब म्हणून सर्वांनाच परिचित आहेत. यांनी विविध क्षेत्रात मिळवलेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार पाहिले म्हणजे त्यांच्या स्वप्नांची झेप सर्वांनाच जाणविल्याशिवाय राहात नाही.

आता नोव्हेंबरमध्ये अरुण नरके ७७ वर्षे पूर्ण करीत आहेत. अरुण नरके हे सामाजिक जीवनाचाच एक भाग बनले आहेत. साहजिकच त्यांचा हा वाढदिवसाचा शुभारंभ सामाजिक कार्याने व्हावा ही सर्वांचीच अपेक्षा असणार आणि ती अपेक्षा तुम्ही आम्ही सर्वांनीच पुरी करायचा संकल्प या निमित्तानं करणं हे आपलं कर्तव्य आहे आणि ते पार पाडण्यात आपण कुठेही कमी पडणार याची खात्री वाटते. थोरसमाजसेवक बाबा आमटे यांनी एके ठिकाणी म्हटलं आहे की, हात उभारण्यासाठी असतात, उगारण्यासाठी नसतात. अरुण नरके यांनी आजपर्यंत अनेक हात हातात घेऊन जीवन प्रवास केला. उगारण्यासाठी उभारलेल्या अनेक हातांचे रूपांतर अरुण नरके यांनी सामाजिक कार्याची धुरा वाहण्यासाठी केलं.

हे अरुण नरके यांचं ऋण अंशतः तरी फेडण्याची ही संधी आपण मुळीच वाया घालवायची नाही, हा संकल्प करुया, चांगल्या शुद्ध भावनेने केलेले संकल्प सिद्धीला जातात, त्यात काहीही अडचण आली तरी त्यावर मात करून ते हजार हात सिद्धीला नेतात हे आपल्याला इतिहास सांगतो या पेक्षा आणखीन काय हवे ?





# परिचय

## वैयक्तिक माहिती

**नाव व पत्ता**

### अरुण दत्तात्रय नरके

कृषीचंद्र, ११८७/ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६०१२
फोन : ०२३१-२६२९३९३

---

**जन्मतारीख व ठिकाण**

२९ नोव्हेंबर १९४३, कोल्हापूर (महाराष्ट्र)

---

**शैक्षणिक पात्रता**

एम. एस्सी.(ॲग्री)

---

**विविध क्षेत्रातील कार्ये**

परिशिष्ट अ

---

**सन्मान, पारितोषिके व पुरस्कार**

परिशिष्ट ब





## परिशिष्ट अ
### विविध क्षेत्रातील कार्य
### (अ) सहकार क्षेत्र

| | |
|---|---|
| माजी अध्यक्ष | **कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., कोल्हापूर.(गोकुळ)**<br>(वार्षिक उलाढाल रू.२६०० कोटी)<br>**१९७८ पासून संचालक** (चेअरमन १९९० ते २०००) |
| अध्यक्ष | **यूथ डेव्हलपमेंट को. ऑप बँक लि., कोल्हापूर.**<br>आशिया खंडातील युवकांनी युवकांसाठी स्थापन केलेली सर्व स्तरातून उत्तम प्रतिसाद मिळालेली व संपूर्णपणे संगणकीकरण झालेली महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातील एकमेव बँक |
| माजी व्हा. चेअरमन | **दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि., मुंबई.** |
| माजी व्हा. चेअरमन | **कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., कोल्हापूर.**<br>(वार्षिक उलाढाल रू.१५०० कोटी) |
| संचालक | **महाराष्ट्र राज्य सह. साखर कारखाना संघ लि., मुंबई.** |
| माजी उपाध्यक्ष | **कोल्हापूर डिस्ट्रीक्ट अर्बन बँक को.ऑप. असो. कोल्हापूर.** |
| संस्थापक अध्यक्ष | सहकार भूषण पुरस्कार प्राप्त–<br>**यशवंत सहकारी तालुका खरेदी–विक्री संघ लि., पन्हाळा, जि. कोल्हापूर.**<br>(वार्षिक उलाढाल रू.१०० कोटी) |
| चेअरमन | **शेती पदवीधर असोसिएशन, कोल्हापूर.** |
| माजी संचालक | **श्री दत्त सह. साखर कारखाना लि., आसुर्ले पोर्ले, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर.** |





## परिशिष्ट अ
### विविध क्षेत्रातील कार्ये
### (ब) शैक्षणिक क्षेत्र

| | |
|---|---|
| संस्थापक | अरुण नरके फौंडेशन, कोल्हापूर. |
| उपाध्यक्ष | कुंभी-कासारी शिक्षण प्रसारक मंडळ, कुडित्रे.<br>१. रेसिडेन्शियल स्कूल्स<br>२. नॉन रेसिडेन्शियल स्कूल्स<br>३. ज्युनिअर कॉलेजस्<br>४. सैनिक स्कुल |
| माजी कार्यकारी समिती सदस्य | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी |
| विश्वस्त | महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट, कोल्हापूर |
| विश्वस्त | नेहरू हायस्कूल कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. |
| माजी विधीसभा सदस्य | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. |
| माजी समिती सदस्य | स्वयंम मतीमंद मुलांची शाळा, कोल्हापूर. |



## परिशिष्ट अ

### विविध क्षेत्रातील कार्ये (क) सामाजिक, क्रीडा व इतर क्षेत्र विषयक

| | |
|---|---|
| राष्ट्रीय समिती सदस्य | इंडियन डेअरी असोसिएशन, नवी दिल्ली. |
| उपाध्यक्ष | वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन, मुंबई. |
| अध्यक्ष व विश्वस्त | विश्व प्रकृति निधी, भारत, कोल्हापूर विभाग. |
| समिती सदस्य | इंडियन रेडक्रॉस सोसायटी, कोल्हापूर. |
| सन्माननीय सदस्य | रोटरी क्लब, कोल्हापूर. |
| माजी अध्यक्ष | गार्डन क्लब, कोल्हापूर (प्रत्येक वर्षी जिल्हास्तरिय पुष्प प्रदर्शन आयोजन) |
| उपाध्यक्ष | कोल्हापूर स्पोर्टस् असोसिएशन, कोल्हापूर. |
| सल्लागार | राष्ट्रीय अंध कल्याण संघ, शाखा कोल्हापूर. |
| सदस्य | क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. |
| माजी समिती सदस्य | छ. शहाजी शुटींग व कॉन्झर्वेशन क्लब, कोल्हापूर. |





## परिशिष्ट अ
### विविध क्षेत्रातील कार्य (ड) व्यावसायिक व आंतरराष्ट्रीय संपर्क

| | |
|---|---|
| माजी अध्यक्ष/उपाध्यक्ष | इंडियन डेअरी असोसिएशन, नवी दिल्ली |
| माजी अध्यक्ष | इंडियन डेअरी असोसिएशन, (प.वि.) मुंबई. |
| माजी संचालक | महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ, मुंबई. |
| सदस्य | दूध दर कमिटी, महाराष्ट्र शासन, मुंबई |

१) भारतीय कृषी संधान, नवी दिल्ली यांचेमार्फत आयोजित अभ्यास दौऱ्यामध्ये कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघामार्फत सहभाग.

२) शेती विषयक नवनवीन तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी इटली, डेन्मार्क, नेदरलँड, फ्रान्स, इस्त्राईल, यू.के. व यू.एस.ए या देशांचा १९८७ व १९९५ मध्ये अभ्यास दौरा.

३) महाराष्ट्र स्टेट को. ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांच्यातर्फे व निर्याती बाबतच्या अभ्यास दौऱ्यामध्ये सहभाग.

४) ब्रुसेल्स येथे झालेल्या दुसऱ्या जागतिक दुग्ध उत्पादकांच्या दुग्ध परिषदेसाठी २००१ मध्ये संपूर्ण भारतातून शेतकऱ्यांचे एकमेव प्रतिनिधी म्हणून सहभाग.



परिशिष्ट ब

# सन्मान, पारितोषिके व पुरस्कार

## वैयक्तिक

### शिव छत्रपती राज्य युवा पुरस्कार
1989-90

युवा, शैक्षणिक, क्रिडा व सामाजिक क्षेत्रामध्ये १५ वर्षाच्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्राचे त्या वेळचे **मा.मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक** यांच्या हस्ते दि. १२ जून १९९२ रोजी स्विकारला.

### फाय फांऊडेशन पुरस्कार
1994

अभियांत्रिकी व व्यवस्थापन क्षेत्रातील महत्वपूर्ण कार्याबद्दल लोकसभेचे **माजी सभापती मा. श्री. शिवराज पाटील** यांचे हस्ते व **माजी मुख्य निवडणूक आयुक्त श्री. टी. एन. शेषन** यांचे उपस्थितीत दि. ५ मार्च १९९५ इ. रोजी स्विकारला.

### जेम ऑफ इंडिया ॲवॉर्ड
1996

ऑल इंडिया ॲचिव्हर्स कॉन्फरन्स, नवी दिल्ली यांचे मार्फत वैयक्तिक क्षेत्रामधील महत्वपूर्ण कामगिरीबद्दल **मा. श्रीमती रत्नमाला सावनूर, नियोजन राज्यमंत्री भारत सरकार** यांच्या हस्ते दि. १६ जून १९९७ इ. रोजी स्विकारला.

### नेस इनिशिएटीव्ह डेव्हलपमेंट ॲवॉर्ड
1996

बिझनेस इनिशिएटीव्ह डेव्हलपमेंट बोर्ड यांचेमार्फत उत्कृष्ट कार्याबद्दल **मा. श्रीमती रत्नमाला सावनूर, नियोजन राज्यमंत्री, भारत सरकार** यांचे हस्ते दि. १६ जून १९९७ इ. रोजी स्विकारला.




### हिंद गौरव ॲवॉर्ड
1996

ऑल इंडिया ॲचिव्हर्स कॉन्फरन्स नवी दिल्ली यांचेमार्फत देशाच्या आर्थिक उन्नतीच्या सहभागाबद्दल **मा. श्रीमती रत्नमाला सावनूर, नियोजन राज्यमंत्री, भारत सरकार,** यांचे हस्ते दि. १० ऑगस्ट १९९७ रोजी स्वीकारला.

### डॉ. कुरियन ॲवॉर्ड
1997-98

देशाच्या दुग्धव्यवसाय क्षेत्रामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल इंडियन डेअरी असोसिएशन नवी दिल्ली यांच्या मार्फत देण्यात येणारा सन्मानाचा पुरस्कार

ARUN NARKE FOUNDATION
मानवता हिताय तत्परम्



परिशिष्ट ब

# सन्मान, पारितोषिके व पुरस्कार

## वैयक्तिक



1989 TO 2020

### विजयरत्न ॲवॉर्ड
1997

इंडियन इंटरनॅशनल फ्रेंडशिप सोसा. नवी दिल्ली यांचेतर्फे राजकीय व सामाजिक कार्यामधील अनुकरणीय सहभागाबद्दल **मा. श्री. विशाल केसींग, माजी मुख्यमंत्री मणिपूर** यांच्या हस्ते दि. १७ एप्रिल १९९७ इ. रोजी स्विकारला.

### उद्योगरत्न ॲवॉर्ड
1997

इन्स्टिट्युट ऑफ इकॉनॉमिक स्टडीज् नवी दिल्ली यांचे मार्फत देशाच्या औद्योगिक प्रगतीमधील हातभाराबाबत **मा. श्री. के. पी. एस. गील, माजी पोलीस आयुक्त पंजाब** यांच्या हस्ते दि. ५ जुलै १९९७ इ. रोजी स्वीकारला.

### इंटरनॅशनल एक्सलन्सी ॲवॉर्ड
1997

इंडियन कौन्सिल फॉर स्मॉल ॲण्ड मिडियम एक्स्पोर्टस् नवी दिल्ली यांचे मार्फत देशाच्या औद्योगिक विकासामधील सहभागाबद्दल **मा. श्री. के. पी. एस. गील माजी पोलीस आयुक्त पंजाब** यांच्या हस्ते दि. ५ जुलै १९९७ इ. रोजी स्वीकारला.

### कोल्हापूर भूषण पुरस्कार
2003

सहकारी दुग्धव्यवसाय व क्रीडा या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित.

### राष्ट्रपती सन्मान
------

मा. ग्यानी झैलसिंग यांच्या हस्ते उत्कृष्ट युवा विषयक कार्याबद्दल यूथ हॉस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडियातर्फे सन्मानित.

### कै. नरूभाऊ लिमये स्मृति आर्यभूषण पुरस्कार
2012

महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांच्यामार्फत सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल.

### कृषिभूषण डॉ. तानाजीराव चोरगे कृषी व सहकार जीवनगौरव पुरस्कार
20 Feb. 2020

गेल्या ४५ वर्षातील दूध, कृषी, सहकार क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन चिपळूण येथील कृषीभूषण डॉ. तानाजीराव चोरगे शिक्षण व संशोधन संस्थेच्या वतीने देण्यात आला.





## कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) या संस्थेच्या चेअरमन पदी कार्यरत असतांना संघास मिळालेली पारितोषिके

### अ) राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार

| पारितोषिकाचे स्वरूप | क्षेत्र | हस्ते |
|---|---|---|
| प्रथम उत्कृष्ट १९८९-९० | दुग्ध प्रक्रिया उद्योग | मा. श्री. अजितसिंग कृषीमंत्री, भारत सरकार ८.५.१९९० |
| प्रथम उत्कृष्ट १९९१-९२ | सहकारी क्षेत्रामधून दुग्ध व्यवसाय विकास व उत्पादन (दुग्धशाळा) | मा. श्री. बलराम जाखर कृषीमंत्री, भारत सरकार १९.१०.९३ |
| प्रथम उत्कृष्ट १९९२-९३ | दुग्ध प्रक्रिया उद्योग | मा. श्रीमती कृष्णा साही उद्योग राज्यमंत्री, भारत सरकार २९.१०.९४ |
| द्वितीय उत्कृष्ट १९९२-९३ | पशुखाद्य प्रक्रिया उद्योग | मा. श्रीमती कृष्णा साही उद्योग राज्यमंत्री, भारत सरकार २९.१०.९४ |
| प्रथम उत्कृष्ट १९९३-९४ | दुग्ध प्रक्रिया उद्योग | मा. डॉ. शंकर दयाळ शर्मा राष्ट्रपती, भारत सरकार ३०.१०.९५ |
| प्रथम उत्कृष्ट १९९३-९४ | सहकारी व सार्वजनिक क्षेत्रातील दुग्ध व्यवसाय विकास (उत्पादन प्रकल्प) | मा. डॉ. शंकर दयाळ शर्मा राष्ट्रपती, भारत सरकार ३०.१०.९५ |
| उत्तेजनार्थ प्रमाणपत्र १९९३-९४ | पशुखाद्य प्रक्रिया उद्योग | मा. डॉ. शंकर दयाळ शर्मा राष्ट्रपती, भारत सरकार ३०.१०.९५ |
| द्वितीय उत्कृष्ट १९९४-९५ | दुग्ध प्रक्रिया उद्योग | मा. श्री. एच. डी. देवेगौडा पंतप्रधान, भारत सरकार २३.११.९६ |





## कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) या संस्थेच्या चेअरमन पदी कार्यरत असतांना संघास मिळालेली पारितोषिके

### अ) राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार

| पारितोषिकाचे स्वरूप | क्षेत्र | हस्ते |
|---|---|---|
| द्वितीय उत्कृष्ट १९९४-९५ | पशुखाद्य प्रक्रिया उद्योग | मा. श्री. के. आर. नारायणन राष्ट्रपती, भारत सरकार २३.११.९७ |
| उत्तेजनार्थ प्रमाणपत्र १९९५-९६ | पशुखाद्य प्रक्रिया उद्योग | मा. श्री. सिकंदर बख्त उद्योगमंत्री, भारत सरकार २६.१२.९८ |
| द्वितीय उत्कृष्ट १९९६-९७ | दुग्ध प्रक्रिया उद्योग | मा. श्री. कृष्णकांत उपराष्ट्रपती भारत सरकार २४.८.२००० |
| उत्तेजनार्थ प्रमाणपत्र १९९६-९७ | कार्यक्षम उत्पादकता | मा. श्री. सिकंदर बख्त उद्योगमंत्री, भारत सरकार २६.१२.९८ |

गोकुळला उत्पादकता, गुणवत्ता व नवनिर्मिती याबाबत इंडियन कौन्सिल फॉर स्मॉल अॅण्ड मिडीयम एक्स्पोर्टर्स्, नवी दिल्ली यांच्यावतीने पंजाब राज्याचे माजी पोलीस आयुक्त मा. श्री. के. पी. एस. गील यांच्या हस्ते **सुवर्ण पदक** प्राप्त (५.७.९७)




## कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) या संस्थेच्या चेअरमन पदी कार्यरत असतांना संघास मिळालेली पारितोषिके

### ब) राज्य पातळीवरील पुरस्कार

गोकुळने वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या कार्यामध्ये घेतलेल्या उत्कृष्ट व अनुकरणीय सहभागाबद्दल सामाजिक वनीकरण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचा १९९२ सालचा वनश्री पुरस्कार त्या वेळचे महाराष्ट्र राज्याचे दुग्ध व्यवसाय व पशुसंवर्धन मंत्री मा. मधुकररावजी पिचड यांचे हस्ते स्वीकारला (२२.४.९४)

गोकुळच्या वार्षिक अहवालाची उत्कृष्ट मांडणी, संघाची आर्थिक प्रगती तसेच ऑडीट वर्ग या गुणवत्तेस पात्र ठरल्याने राष्ट्रीय सहकारीता विकास तथा ग्रामीण प्रबंधन संस्था अमरावती यांचे प्रथम क्रमांकाचे निर्माण पारितोषिक दरवर्षी मिळत आहे.

# नव्या युगाचा अरुणोदय...



**मा.श्री. चेतन अरुण नरकेसो।**
BE Prodcution, MS Computer Science, USA
MBA Finance, USA

## अल्प परिचय...

### सध्या कार्यरत

- वाणिज्य सल्लागार - अर्थमंत्रालय, थायलंड सरकार
- मानद संचालक- बुराफा युनिर्व्हसिटी, थायलंड
- संचालक - IMAT
  (कृषि व पशुसंवर्धन विषयक शेतकऱ्यांना व शासनाला मार्गदर्शन करणारी संस्था)
- विद्यमान सदस्य - AFGG-Asia Forum for Global Governance
- अध्यक्ष - अरुण नरके फौंडेशन
- संचालक-कुंभी कासारी शिक्षण प्रसारक मंडळ, कुडित्रे
- मानद संचालक-न्यु एज्युकेशन सोसायटी
- प्रगतशील शेतकरी

### कार्यानुभव

- २० वर्षाचा आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा अनुभव
- २५ देशांचे विविध कंपन्याच्याद्वारे नेतृत्व
- जागतिक मान्यताप्राप्त ब्रँडचे नेतृत्व
- युरोप आणि आशियाई देशातील मान्यवर अर्थ व्यवस्थापक आणि मार्केटिंग व्यक्तीमत्व म्हणून प्रसिद्ध
- देश आणि विदेशातील उद्योग, अर्थ, कृषी, कार्पोरेट, समाजकारण आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसोबत २० वर्षे कामाचा अनुभव

# ध्येय-उद्दिष्ट्ये

## ध्येय

अरुण नरके फौंडेशनच्या स्थापनेसमयीचे बोधचिन्ह मा. विश्वस्त सौ. स्निग्धा नरके यांनी नव्याने सर्व उद्दिष्ट्ये स्पष्ट व्हावी या हेतूने पूर्वस्थापित केले. तसेच 'मानवता हिताय तत्परम्' हे ब्रीद वाक्य निर्माण करुन मानवी हिताच्या प्रत्येक आघाडीवर तत्परतेने दीर्घकाळ टिकणारे, रचनात्मक असे कार्य उभे करण्याचे व त्याद्वारे समाजाचे जीवनमान उंचावण्याचे ध्येय संस्थेने उराशी बाळगले आहे ते ध्येय पूर्ण करण्याची ग्वाही दिली.



## उद्दिष्ट्ये

संस्थेच्या ध्येयाकडे नेणाऱ्या व सध्या चालू असणाऱ्या तसेच नजीकच्या भविष्यात सुरू होणाऱ्या कार्य स्वरूपात संस्थेने आपली उद्दिष्ट्ये निर्धारित केली आहेत. शिक्षण, स्पर्धा परीक्षा, कृषी, सहकार, ग्रामविकास, कला, क्रिडा, आरोग्य, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय-मत्स्यव्यवसाय विकास, शहरी विकास, महिला व बालकल्याण, अपंगकल्याण व पुनर्वसन, सामाजिक न्याय, पर्यावरण, साहित्य-भाषा व सांस्कृतिक कार्य, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, कामगार कल्याण, अल्पसंख्यांक विकास, कौशल्यविकास व उद्योजकता, विधी व न्याय, नियोजन आदिवासी व भटके-विमुक्त विकास माहिती तंत्रज्ञान व विदा, माध्यम या विभागांच्या प्रस्थापनेद्वारे प्रत्येक विभागात मूलभूत, रचनात्मक, संशोधनात्मक शिक्षण -प्रशिक्षणात्मक व प्रबोधनात्मक असे कृतिशील कार्य निर्माण करणे.

# मान्यवरांच्या विचारांचा नंदादीप

देशभरातील विविध संस्था प्रमाणे केवळ चौकटीबध्द अध्यापन न होता मन, मनगट आणि मस्तिष्क ही कणखर असले पाहिजे. तरूणांना शुन्यातून ज्यांनी विश्व निर्माण करण्याचा ध्यास घेतला अशा प्रेरणादायी व्यक्तीमत्वांचे अवकाश गवसावे यासाठी सद्‌विचारांचा नंदादीप चेतवणे गरजेचे आहे. त्यासाठी गेली दोन दशके अरूण नरके फौंडेशनच्या प्रेरणास्थान असलेल्या कै. सौ. सुनिता अरुण नरके यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून देशभरातील नामवंतांच्या व्याख्यानांचे आयोजन करत आहोत.

आजवर चाललेल्या या जागरात माजी निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण, मा. पोलीस महासंचालक कै. श्री. अरविंद इनामदार, पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, डॉ. राम शेवाळकर, डॉ. निर्मला सामंत, स्नेहलता देशमुख, अभिनेते आदेश बांदेकर, मासिक जडण घडणचे संपादक डॉ. सागर देशपांडे, प्रा. नितिन बानुगडे–पाटील या मान्यवरांनी विचारांचा लोकजागर घडवून आणला.



संस्थेच्या संस्थापिका सदस्या कै. सौ. सुनिता अरूण नरके
यांच्या स्मृतिदिनानिमित्त सुप्रसिद्ध वक्तांची झालेली व्याख्याने..

# गत स्मृतींना पुन्हा उजाळा..

| साल | मान्यवरांची उपस्थिती | विषय |
|---|---|---|
| २००० | नामवंत कलाकारांची गीत संगीताची आदरांजली. | |
| २००१ | सौ. निर्मला सामंत प्रभाळकर<br>महिला आयोगाच्या अध्यक्षा | विविध स्तरामधील महिलांचे सामाजिक योगदान |
| २००२ | श्री. सिद्धेश्वरी कॅन्सर सेंटर<br>सोलापूर तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन | महिला कर्करोग-मार्गदर्शन शिबिर |
| २००३ | डॉ. राम शेवाळकर साहित्यीक<br>न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी | महाभारतातील स्त्री शक्ती<br>स्वातंत्र्यानंतर कमावलं काय आणि गमावलं काय |
| २००४ | अभिनेत्री रोहिणी हट्टगंडी, निशिगंधा वाड<br>आणि लेखिका डॉ. विजया वाड | सोनेरी क्षण |
| २००५ | डॉ. स्नेहलता देखमुख<br>मा. कुलगुरू मुंबई विद्यापीठ | स्त्रीने स्वतःला ओळखण्याचा गुरुमंत्र |
| २००६ | मंगला खाडीलकर | आरसा हा एकपात्री कार्यक्रम |
| २००७ | डॉ. अरुणा ढेरे लेखिका | देवतांचे संसार |
| २००८ | नीला सत्यनारायण<br>प्रशासकीय अधिकारी | आदर्शमाता |
| २००९ | विठ्ठल कामत लेखक | आई माझा श्वास |



ARUN NARKE FOUNDATION
मानवता हिताय तत्परम्

# गत स्मृतींना पुन्हा उजाळा..

| साल | मान्यवरांची उपस्थिती | विषय |
| --- | --- | --- |
| २०१० | प्रा. डॉ. वीणा देव लेखिका | स्त्री साहित्यातील संवेदना |
| २०११ | प्रा. मिलिंद जोशी लेखक | विवेकानंदाच्या विचार विश्वातील स्त्री |
| २०१२ | श्री. परेश पांड्या<br>मानसशास्त्र व्यवस्थापन अभ्यासक | पारिवारिक रिश्तो में नारीकी भूमिका |
| २०१३ | श्री. पंडीत उपेंद्र भट<br>भीमसेन जोशीचे परमशिष्य | संतवाणी |
| २०१४ | आकार प्रस्तुत-अंतरंग चे कलाकार | आई स्वरमय अविष्कार |
| २०१५ | श्री. अरविंद इनामदारसो<br>माजी पोलीस महासंचालक | आव्हाने स्त्री जीवनाची या विषयावर व्याख्यान |
| २०१६ | मा. श्री. आदेश बांदेकर व<br>मा. डॉ. स्नेहलता देशमुख | रसिकांशी मुक्तसंवाद |
| २०१७ | मा. श्रीमती प्रतिभाताई रानडे | 'नाते स्त्री संस्कृतीचे'<br>या विषयावर व्याख्यान |
| २०१८ | मा. श्री विश्वास नांगरे पाटीलसो<br>विशेष पोलीस महानिरीक्षक | 'संवाद ध्येयवेड्यांसाठी' स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्यान |
| २०१९ | मा. डॉ. सागर देशपांडे, पुणे | 'आदर्शांच्या शोधात..!' प्रेरणादायी व्याख्यान |
| २०२० | प्रा. नितीन बानुगडे-पाटील<br>उपाध्यक्ष कृष्णा खोरे विकास महामंडळ | 'यशोमार्ग.. उज्ज्वल भविष्याचा ! '<br>प्रेरणादायी व्याख्यान |






संस्थेच्या संस्थापिका सदस्या
कै. सुनिता अरूण नरके यांच्या स्मृतिदिनादिवशी सुप्रसिद्ध वक्तांची
झालेल्या व्याख्यानांची क्षणचित्रे...

ARUN NARKE FOUNDATION
मानवता हिताय तत्परम्



# गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...







मुंबईच्या माजी महापौर व महिला आयोगाच्या अध्यक्षा, सौ. निर्मला सामंत-प्रभावळकर यांचे विविध स्थरामधील महिलांचे सामाजिक योगदान या विषयावर व्याख्यान.

श्री सिध्देश्वर कॅन्सर अॅण्ड रिसर्च सेंटर, सोलापूर येथील कॅन्सर सेंटर युनिटच्या तज्ज्ञ डॉक्टरांचे महिलांचे कर्करोग या विषयावर मार्गदर्शन शिबिर







डॉ. राम शेवाळकर साहित्यिक यांचे 'महाभारतातील स्त्री शक्ती' आणि
न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचे 'स्वातंत्र्यानंतर कमावलं काय आणि गमावलं काय' या विषयावर व्याख्यान

# गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...





मंगला खाडीलकर 'आरसा' हा एकपात्री कार्यक्रम



सुप्रसिद्ध लेखक प्रा. मिलिंद जोशी यांचे
'विवेकानंदाच्या विचार विश्वातील स्त्री'
या विषयावर व्याख्यान








नीला सत्यनारायण–उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकारी,
आदर्श माता, लेखिका, कवयित्री व संगीतकार–यांचेशी डॉ. स्नेहलता देशमुख यांनी साधलेला संवाद

# गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...





मानसशास्त्राचे व व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासक
श्री. परेश पांड्या पारिवारिक रिश्तो में नारीकी भूमिका या विषयावर व्याख्यान




आकार प्रस्तूत अंतरंग च्या कलाकाराद्वारे
माऊलीची महती सांगणारा स्वरमय अविष्कार.









भारतरत्न भीमसेन जोशीचे परमशिष्य
श्री. पंडीत उपेंद्र भट यांचा संतवाणी कार्यक्रम

# गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...







माजी पोलीस महासंचालक श्री. अरविंद इनामदार यांचे
'आव्हाने स्त्री जीवनाची' या विषयावर व्याख्यान.

मा. श्रीमती प्रतिभाताई रानडे
'नाते स्त्री संस्कृतीचे' या विषयावर व्याख्यान







मा. श्री. आदेश बांदेकर व मा. डॉ. स्नेहलता देशमुख यांचा रसिकांशी मुक्त संवाद.

# गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...






मा. श्री विश्वास नांगरे पाटीलसो – विशेष पोलीस महानिरीक्षक
'संवाद ध्येयवेड्यांसाठी' स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्यान



प्रा. नितीन बानुगडे–पाटील –
उपाध्यक्ष कृष्णा खोरे विकास महामंडळ यशोमार्ग..
उज्ज्वल भविष्याचा ! ' प्रेरणादायी व्याख्यान








मा. डॉ. सागर देशपांडे, पुणे 'आदर्शांच्या शोधात..!' प्रेरणादायी व्याख्यान

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्

# गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

## गोकुळगाथा प्रकाशन सोहळा










मा. श्री. अरविंद इनामदार (माजी पोलीस महासंचालक), मा. न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, कृषीतज्ञ मा. श्री. बुधाजीराव मुळीक यांच्या उपस्थितीत मा. अरूण नरके लिखीत 'गोकुळगाथा' प्रकाशन सोहळा (अण्णाभाऊ साठे सभागृह बिबेवाडी,पुणे)







# गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

## मान्यवरांची संस्थेला भेट...



मा. न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी



मा. श्री. अरविंद इनामदार (माजी पोलीस महासंचालक)



सरकारी वकील मा. ॲड. उज्वल निकम



मा. सिंधुताई सपकाळ




मा. श्री. अविनाश धर्माधिकारी




मा. श्री. मदन नागरगोजे

अनंताच्या अवकाशातील एक खारीचा वाटा... एक मानवतेचा वाटा..

वसा मानव सेवेचा...वसा मानवहिताचा...

ARUN NARKE FOUNDATION ®

ANF

मानवता हिताय तत्परम्

# सामाजिक उपक्रम

समाज सेवेसाठी एक मदतीचा हात...

# सामाजिक उपक्रम

**सामाजिक उपक्रम** – 'अरुण नरके फौंडेशन' ची नाळच समाजाशी जोडलेली असून समाजसेवेच व्रत गेली २६ वर्षे अखंड अविरतपणे सुरु आहे. केवळ अर्थाजनांचा हेतू बाजूला ठेऊन सामाजिक बांधिलकीच्या प्रेरणेने, सेवाभावी वृत्तीने समृद्ध भारत घडविण्यासाठी दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमातून अखंडपणे सामाजिक कार्य करत आहे. ज्याचा समाजातील सर्वच स्तरातील लोकांना निश्चितपणे फायदा होतो. भविष्यात सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी व त्यांच्याकडून ही समाजसेवा, देशसेवा व्हावी या हेतूने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

- **रक्तदान शिबीर -** रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. ज्यामुळे कित्येक लोकांचे प्राण वाचवले जाऊ शकतात. सद्य स्थितीत आवश्यक असणारा रक्तसाठा व रक्तदान करणारे रक्तदाते खूपच कमी असल्यामुळे रक्ताचा तुटवडा नेहमी भासतो यासाठी प्रामाणिक प्रयत्न संस्था दरवर्षी करते.

- **स्वच्छता अभियान -** मा. पंतप्रधानांनी केलेल्या स्वच्छ भारत अभियानास देशभरातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत होता. त्याचाच एक भाग म्हणून स्वच्छता अभियान राबविले गेले. सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये प्रत्यक्ष स्वच्छता व प्रभातफेरी काढून स्वच्छतेबाबत लोकांना जागृत केले.

◆ **गांधीनगर व्यापारी पेठ -** गांधीनगर व्यापारी पेठ येथे सर्व व्यापारी राहतात. पूर्णवेळ फक्त काम आणि फक्त कामच करण्यात व्यस्त असतात त्यामुळे आसपासच्या परीसरात प्रचंड कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले होते. ते तेथील स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधून त्यांच्या सहकार्याने स्वच्छता मोहिम राबवली गेली.

◆ **गांधीनगर (पंचगंगा नदीप्रवाह )-** गांधीनगर परीसरातील पंचगंगा नदीवरील नदीघाट, पाणवठ परीसर स्वच्छ केला. प्रचंड प्रमाणातील ओला कचरा, फुले, हार, चिखल, गाळ इ. साफसफाई करून स्वच्छ व सुंदर नदीघाट पुर्वीप्रमाणे दिसायला लागला.

◆ **श्री क्षेत्र गगनगड-** प्रसिद्ध धार्मिक स्थळ व ऐतिहासिक गड किल्ले गगनगड येथे स्वच्छता व श्रमदान शिबिर आयोजित केले होते. मोठ्या प्रमाणात सर्वांचा सहभाग मिळाल्यामुळे एकदिवसीय श्रमदान शिबीर यशस्वीरीत्या संपन्न झाले.

# सामाजिक उपक्रम

- **गडकोट किल्ले संवर्धन - पन्हाळगड-** ऐतिहासिक पन्हाळगड स्वच्छता मोहिम आखण्यात आली व दुर्ग अभ्यासकांच्या मदतीने व मा. अध्यक्षांच्या मार्गदर्शनाने संपूर्ण परीसर ५ वेगवेगळ्या तुकड्या करुन स्वच्छता अभियान व गड किल्ले संवर्धन मोहिम यशस्वीरित्या पार पाडली गेली.
- अंध यूवा मंच, हणबरवाडी येथील अंध मुलांच्या निवासी शाळेला जीवनावश्यक वस्तू व अन्नधान्य वाटप.
- शाहूवाडी तालुक्यातील दुर्गम वाड्या–वस्त्यामध्ये शालेय मुलांना शैक्षणिक साहित्य, कपडे, खाऊ वाटप.
- 'करूणालय' या शिये, कोल्हापूर येथील एच.आय.व्ही पॉझिटिव्ह मुलांच्या निवासी संस्थेला बेडशीट व खाऊ वाटप केले.
- 'एकटी' या निराधार महिला व पुरुषांना राहण्या व जेवणाची व्यवस्था करणाऱ्या समाजसेवी संस्थेला ताटे व कपडे वाटप केले.
- 'अवनि' या निराधार निराश्रीत मुलांसाठी काम करणाऱ्या समाजसेवी संस्थेला संगणक टेबल, भांडी भेट व तेथील विद्यार्थ्यांसाठी व्यक्तीमत्व विकास शिबिर राबवण्यात आले.
- महिला सबलिकरणासाठी व जनजागृतीसाठी शहरातील न्यू कॉलेज, मिरजकर तिकटी, बिंदू चौक अशा गर्दीच्या ठिकाणी पथनाट्य व युवती स्वसंरक्षण शिबिरांचे आयोजन केले.
- सर्वांसाठी मोफत डोळे तपासणी शिबीर, दंत चिकित्सा शिबीर, मानसशास्त्रीय समुपदेशन ज्यामुळे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी व परिसरातील वृद्ध व नागरीक या सर्वांना फायदा झाला.

# सामाजिक उपक्रम

- **वृद्धाश्रमांना जिवनावश्यक वस्तूंचे वाटप** - कोल्हापूरातील मातोश्री वृद्धाश्रमाला भेट देऊन तेथील वृद्धांसोबत गप्पा मारुन त्यांचा एकाकीपणा घालवण्याचा प्रयत्न करून आनंदी वातावरण तयार केले. कविता, गाणी, नक्कल आदी सादर करुन मनोरंजन केले तसेच त्यांना फळे, धान्य व जेवण बनवण्यासाठी मोठी भांडी भेट स्वरूपात दिली.

- **शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके** - कोल्हापूरातील राजर्षी शाहू स्मृती उद्यानात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन, मर्दानी खेळ, पोवाडे सादरीकरण केले याचा फायदा परीसरातील नागरीकांना मोठ्या प्रमाणात झाला. शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

- **पूरग्रस्तांना मदत** - ऑगस्ट २०१९ मध्ये संपूर्ण कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात महापूराने हाहाकार माजवला होता. अनेक लोक मृत्युमुखी पडले, जिवीत व वित्तहानी मोठ्या प्रमाणावर झाली होती. रस्ते व वाहतुक पूर्णपणे बंद झाली होती जनसंपर्क तुटला होता व लोकांना मदत करणे गरजेचे होते. ही गरज ओळखून गोटे ता. पन्हाळा येथील पूरग्रस्तांना मदत करण्यात आली ज्यामध्ये सर्व प्रकारच्या जिवनावश्यक वस्तुंचे किट करून ते गरजूंना वाटण्यात आले तसेच बरेच विद्यार्थी महापुरामुळे घरी जाऊ शकले नाहीत व खानावळी बंद असल्यामुळे त्यांच्या जेवणाचा प्रश्न गंभीर बनला होता अशावेळी सर्व गरजू विद्यार्थ्यांना सकाळ–संध्याकाळ फुड पॅकेट वाटण्यात आली.



वृक्षारोपण करताना
संस्थापक मा. श्री. अरुण नरकेसो,
अध्यक्ष मा. चेतन नरकेसो व उपस्थित
सर्व गोकुळ दूध संघाचे मान्यवर.



# कोरोना (COVID-19) प्रतिबंधात्मक उपक्रम

मार्च २०२० मध्ये संपूर्ण जगभरात, भारत व मुख्यता महाराष्ट्रात उद्भवलेल्या कोरोना (COVID-19) व्हायरस मुळे सर्वत्र टाळेबंदी व कलम १४४ लागू केल्यामुळे अत्यावश्यक सेवा वगळता सर्व प्रकारच्या दळणवळणावर प्रतिबंध करण्यात आल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन नरके सर यांच्या मार्गदर्शनाने प्रशासकीय यंत्रणेला मदत व्हावी म्हणून कोरोना (COVID-19) महामारी या साथीच्या रोगाच्या प्रतिबंधासाठी लॉकडाऊनच्या काळात शासनासमवेत जिल्हापरिषद, CPR हॉस्पिटल, कोल्हापूर महानगरपालिका यांच्यासोबत केलेली कामे पुढीलप्रमाणे...

- २,००,००० मोफत मास्क वाटप
- पोलीस दलातील २५०० बांधवांना मोफत हँडग्लोजचे वाटप
- १०,००० लोकांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा
- १८,००० लोकांना सॅनिटाइझर वाटप
- ४२८ लोकांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था
- तृतीय पंथियांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप
- संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन नरके सर यांच्या मार्गदर्शनाने कोल्हापूर जिल्ह्यातील दूध संस्थांना २८,७५० मास्कचे मोफत वितरण करण्यात आले.
- पन्हाळा, शाहुवाडी, गगनबावडा तालुक्यातील १,००,००० हून अधिक जनतेला इम्युनिटी बुस्टरचे वाटप करण्यात आले.

COVID-19

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION ANF मानवता हिताय तत्परम्

## कोरोना (COVID-19) प्रतिबंधात्मक उपक्रम

- अरुण नरके फौंडेशनच्या R&D च्या सहाय्याने COVID-19 ची पूर्व तपासणी अगदी कमी वेळेत (३० मि.) मध्ये कशी करायची याविषयीचे मोफत मार्गदर्शन CPR हॉस्पिटल स्टाफ, महाराष्ट्र शासन व 'Haffkine Institute for Training, Research and Testing', Mumbai यांना दिले.
- संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन नरके सर व संस्थेच्या R & D टीमच्या सहाय्याने आंतरराष्ट्रीय पातळीवरील कोरोना प्रतिबंधासाठी 'Rajamangala University of Technology Phra Nakhon', Bangkok (Thailand) व Burapha University, Thailand या विद्यापीठातील R & D टीमला व्हेंटिलेटरच्या उत्पादनासाठी पोर्टेबल, सर्वसमावेशक, टिकाऊ, व्हेंटिलेटर कसा बनवावा, व्हेंटिलेटरचे डिझाइन कसे असावे, त्याचा तांत्रिक तपशील, उत्पादन प्रक्रिया इ. तांत्रिक माहिती चे मोफत मार्गदर्शन केले.
- संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन नरके सर यांच्या सहकार्याने CPR हॉस्पिटल, कोल्हापूरला चार व्हेंटिलेटर अगदी कमी किंमतीत दिले.
- कोरोना प्रतिबंधात्मक जनजागृती साठी जिल्हा परिषद, CPR हॉस्पिटल, कोल्हापूर महानगरपालिका ,जायंट्स ग्रुप सारख्या संस्थाना संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन नरके सर यांनी प्रत्यक्ष भेटून चर्चा केली.
- **शेत टू गेट प्रकल्प :** संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन नरके सर यांच्या मार्गदर्शनाने COVID-1 'कोरोना' जागतिक महामारी या संकटकाळात तरुण उद्योजकांना आधार देण्यासाठी त्यांच्या कार्यात्मकतेला चालना देण्यासाठी 'रत्नागिरी हापूस आंबा विक्री' प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले.
- अरुण नरके फौंडेशन व कोल्हापूर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या **'अरुणोदय कृषी योजनेंतर्गत '** कोरोना लॉकडाऊन च्या काळात शहरातील जनतेला भाजीपाला उपलब्द व्हावा आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेतीमाल विक्रीसाठी हातभार लागावा या उद्देशाने सोशल डिस्टंसिंग चे पालन करून कोल्हापूर शहरातील विविध वॉर्ड मध्ये ' भाजीपाला विक्री स्टॉल ' चे आयोजन करण्यात आले.

## सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...





कै. सौ. सुनिता अरूण नरके यांच्या स्मरणार्थ महिला मार्गदर्शन शिबिर






कै. सौ. सुनिता अरूण नरके यांच्या स्मृतिदिना निमित्य महिलांसाठी ठसेचित्र, रंगभरण स्पर्धा

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्



Committee member visit to the Balwadi Unit in slum area



One Balwadi Unit in Madari Mohalla



Candle and Panti Training in our Institute.

ग्रामिण भागातील बालवाडी उपक्रम

ग्रामिण भागातील महिलांसाठी कार्यशाळा









ग्रामिण भागातील बालवाडी उपक्रम

महिलांसाठी कार्यशाळा

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION
मानवता हिताय तत्परम्








ग्रामीण भागातील बालवाडी शिक्षिकांचे प्रशिक्षण शिबिर







ग्रामीण भागातील धनगरवाडयातील मुलांना शालेयपयोगी वस्तूंचे वाटप

मानवता हिताय तत्परम्





वृध्दाश्रमांना फळे व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



एकटी या निराधार महिला व पुरूषांना आधार देणाऱ्या संस्थेला ताटे व कपडे वाटप







वृध्दाश्रमांना जेवणासाठीची मोठी भांडी,फळे व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

# सामाजिक उपक्रम
गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...






'अवनि' या सामाजिक संस्थेला जेवणासाठीची मोठी भांडी, संगणक टेबल व मुलांना खाऊ वाटप.







अंध युवा मंच हणबरवाडी अंध मुलांच्या निवासी शाळेला
जीवनावश्यक वस्तू वाटप

करूणालय ह्या एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह
निवासी संस्थेला बेडशिट व खाऊ वाटप

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्





संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त दरवर्षी रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते







संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त दरवर्षी मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे व वैयक्तीक मानसशास्त्रीय समुपदेशन केले जाते

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्





ऑगस्ट २०१९ मध्ये पूरपरिस्थितीत कोल्हापूरमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना मोफत दोन्ही वेळ नाष्टा, जेवणाची सोय केली






ऑगस्ट २०१९ मध्ये पूरग्रस्त गोटे गांव, ता. पन्हाळा, मधील जनतेला जिवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात आले.

ARUN NARKE FOUNDATION ®
ANF
मानवता हिताय तत्परम्





महिलासबलीकरण अंतर्गत युवतीच्या स्वसंरक्षणासाठी शहरातील कॉलेज व गर्दीच्या ठिकाणी जनजागृतीसाठी 'पथनाटयाचे' सादरीकरण





महिलासबलीकरण अंतर्गत युवतीच्या स्वसंरक्षणासाठी मोफत 'युवती स्वसंरक्षणाचे' आयोजन

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...






गडकोट किल्ले संवर्धनअंतर्गत पन्हाळा किल्ला स्वच्छता व व्यसनमुक्ती जनजागृती आयोजन





छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकदिनानिमित्त मोफत शिवकालीन युध्दकला प्रशिक्षणाचे आयोजन

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्






महिला दिनानिमित्त यशस्वी युवतीचा सत्कार व युवतीना मार्गदर्शन करताना सौ. साधनाताई झाडबुके, सौ. लिना तुपे–नरके, मेजर गुगा मालती व संस्थेच्या विश्वस्त सौ. स्निग्धा नरके




महिला सबलीकरणा अंतर्गत युवतींसाठी मोफत 'वुमन हेल्थ केअर अँड पर्सनल हायजिन सेमिनार'मध्ये मार्गदर्शन करताना डॉ. शिल्पा गायकवाड व डॉ. अनिल गायकवाड



पी.एस.आय. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या मुलांना शारिरिक चाचणी सरावासाठी मोफत किटचे वाटप

COVID-19

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...





कोरोना प्रतिबंधात्मक जनजागृतीसाठी गोकुळ दूध संघामधील पदाधिकाऱ्यांशी चर्चा करताना...!



मा. सुहास वारके जिल्हा आय. जी. कोल्हापूर यांची महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करताना








कोरोना लॉकडाऊनच्या काळात अनाथआश्रमातील मुलांना खाऊ वाटप व विचारपुस करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. चेतन अरुण नरके

COVID-19

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्







कोरोनाप्रतिबंधासाठी लॉकडाऊनच्या काळात जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर महानगरपालिका, जिल्हा परिषद कार्यालयाना मास्कचे वाटप







कोरोनाप्रतिबंधासाठी लॉकडाऊनच्या काळात शासनाची विविध कार्यालये, संस्था, शिवाजी विद्यापीठ, बँका यांना मास्कचे वाटप
तसेच अत्यावश्यक सेवा व कोरोना जनजागृती अभियानामध्ये सहभाग

COVID-19

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्







कोरोनाप्रतिबंधासाठी लॉकडाऊनच्या काळात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हयामधील पोलीसदलातील बांधवाना मास्क व हॅन्डग्लोजचे वाटप







संस्थेमार्फत गरीब व होतकरू महिलांना रोजगार उपलब्ध करून देऊन कोरोनाप्रतिबंधासाठी मास्क तयार करून घेताना

COVID-19

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्







ग्रामिण भागातील लोकांसाठी कोरोना प्रतिबंधात्मक जनजागृती व विविध दुध संस्था, सेवासोसायटी, ग्रामपंचायत यांना मोफत मास्कचे वाटप








ग्रामिण भागातील लोकांसाठी कोरोना प्रतिबंधात्मक जनजागृती व विविध दुध संस्था, सेवासोसायटी, ग्रामपंचायत यांना मोफत मास्कचे वाटप

COVID-19

# सामाजिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्








कोरोनाप्रतिबंधासाठी लॉकडाऊनच्या काळात तृतीयपंथांसाठी कोरोना जनजागृती व जीवनावश्यक वस्तूचे वाटप








कोरोनाप्रतिबंधासाठी लॉकडाऊनच्या काळात ग्रामीण भागातील जनतेला व झोपडपट्टीवासीयांना जीवनावश्यक वस्तूचे वाटप









कोरोना लॉकडाऊनच्या काळात ग्रामीण शेतकऱ्यांचा शेतमाल व भाजीपाला थेट शहरातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी कोल्हापूर महानगरपालिका यांच्या सहकाऱ्याने 'अरूणोदय कृषी योजनेचे' आयोजन









कोरोना लॉकडाऊनच्या काळात पन्हाळा, शाहुवाडी, गगनबावडा तालुक्यातील १,००,००० हून अधिक जनतेला इम्युनिटी बुस्टरचे मोफत वाटप

# शैक्षणिक उपक्रम
## गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION ®
मानवता हिताय तत्परम्





स्कॉलरशीप परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या सत्काराप्रसंगी मा. विश्वास रविंद्र उबेरॉय, मदन नागरगोजे आदी





विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतान मा. श्री. शिक्षणाधिकारी किरण लोहार

पोलिस उपनिरिक्षक (PSI) पदी निवड झालेल्या
विद्यार्थ्यांच्या सत्काराप्रसंगी
विक्रीकर अधिकारी एकनाथ पाटील
आणि संस्थेचे विश्वस्त

# शैक्षणिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION

मानवता हिताय तत्परम्

## विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर









शिवाजी विद्यापीठ मा. श्री. बी. एम. हिर्डेकर

मा. श्री. जॉर्ज क्रुझ









मा. श्री. रंगनाथ नाईकडे (उपवन संरक्षण अधिकारी), मा. श्री. प्रदिप सानप, मा. श्री. फिरोज पठाण

# शैक्षणिक उपक्रम

## गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

मानवता हिताय तत्परम्

### विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर






विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मा. श्री. इंद्रजित देशमुख CEO




प्रजापिता ब्रम्हाकुमारीचे प्रा. गिरीषभाई
संस्थेच्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना








विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास प्रबळ होण्यासाठी संस्थेच्यावतीने
आंतरराष्ट्रीय किर्तीचे तज्ञ व्याख्याते मा. डॉ. सचिन परब, मुंबई मार्गदर्शन करताना

# शैक्षणिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION ®

मानवता हिताय तत्परम्









संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त विद्यार्थ्यांना अभिवादन करताना संस्थेचे अध्यक्ष चेतन नरके,नोट्सचे अनावरण करताना संस्थेचे अध्यक्ष, विश्वस्त व शिक्षक, कर्मचारी









अरुण नरके फौंडेशन व आकाशवाणी यांच्या संयुक्त विद्यामाने यशोमार्ग व प्रश्नमंजूषा महाअंतिम सोहळयावेळी संस्थेच्या विद्यार्थींनी व कोल्हापूर जिल्हयाचे विक्रीकर आयुक्त मा. श्रीमती वैशाली काशीद मॅडम व संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन नरकेसाो व इतर पदाधिकारी

# शैक्षणिक उपक्रम

## गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

ARUN NARKE FOUNDATION
मानवता हिताय तत्परम्










सामाजिक व स्पर्धापरीक्षा क्षेत्रातील संस्थेच्या २५ वर्षाच्या यशस्वी वाटचालीनिमित्त, स्पर्धा परीक्षांतून विविध शासकीय पदावर निवड झालेल्या संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या भव्य स्नेहसोहळ्याच्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे आजी–माजी अध्यक्ष, विश्वस्त व अधिकारी पदावर रूजू झालेले संस्थेचे विद्यार्थी ...







स्नेहसोहळयास विविध शासकीय पदावर निवड झालेला उपस्थित संस्थेचा विद्यार्थी वर्ग

# शैक्षणिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

## संस्थेचा कार्यविस्तार वाढीसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांच्यासोबत विविध उपक्रमाविषयी चर्चासत्र







मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव, मा. डी. वाय. पाटील, मा. केंद्रीय मंत्री शरदचंद्रजी पवार व मा. केंद्रीय मंत्री सुब्रमणी जयशंकर यांच्यासोबत चर्चा करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. चेतन नरके







मा. उदयोगमंत्री सुभाष देसाई, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, यांच्यासोबत चर्चा करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. चेतन नरके

राजमंगला युनिर्व्हसीटी, थायलंड यांच्याशी शैक्षणिक करार करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. चेतन नरके

# शैक्षणिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...

## विविध कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष व थायलंड सरकारचे वाणिज्य सल्लागार मा. श्री. चेतन नरकेसो








संजय घोडावत युनिर्व्हसिटी

देवाळे विद्यालय व ज्युनि. कॉलेज,
देवाळ,ता. पन्हाळा








न्यु कॉलेज, कोल्हापूर

विठ्ठल पाटील माध्यमिक विद्यालय व ज्यु. कॉलेज,
कळे, ता. पन्हाळा

# शैक्षणिक उपक्रम

गत स्मृतींना.. पुन्हा उजाळा...










वाणिज्य मंत्रालय, थायलंड येथे आयोजित CLMVT FORUM 2019 मध्ये थायलंडचे पंतप्रधान यांच्या उपस्थित 'न्यु व्हॅल्यू चेन हब ऑफ आशिया' वर मार्गदर्शन करताना

मुंबई येथे **Top Thai Brand** आयोजित कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी










भारत व थायलंड या दोन्ही देशामधील व्यापार संबंध सुधारण्यासाठी मुंबई येथे आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ...

# लाभार्थी

अरुण नरके फौंडेशनचे गेल्या २६ वर्षांतील विविध उपक्रमातून, सेवेतून लाभ घेतलेले लाभार्थी पुढीलप्रमाणे.

| | उपक्रम | लाभार्थी |
|---|---|---|
| १ | स्पर्धा-परीक्षा शिक्षण/समुपदेशन | ७५,००० |
| २ | शासकीय व बँकिंग सेवेत कार्यरत लाभार्थी | ४,६५० |
| ३ | विविध शैक्षणिक कार्यशाळा/सेमिनार | १,२५,००० |
| ४ | विविध समाजप्रबोधपर व्याख्याने | ३७,५०० |
| ५ | सामाजिक उपक्रम | |
| | रक्तदान शिबिर | २५०० |
| | स्वच्छता अभियान | १५००० |
| | अंध युवा मंच जिवनावश्यक वस्तू वाटप | २००० |
| | धनगरवाड्यातील मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप | १५०० |
| | करुणालय एचआयव्ही बाधीत मुलांना बेडशीट/खाऊ वाटप | १००० |
| | एकटी या समाजसेवी संस्थेत निराधार महिलांना ताटे व कपडे वाटप | ८०० |
| | अवनि या समाजसेवी संस्थेतील मुलांना संगणक टेबल, भांडी व खाऊ वाटप | ५०० |
| | महिला सबलीकरण (पथनाटय) | २४०० |

# लाभार्थी

अरुण नरके फौंडेशनचे गेल्या २६ वर्षांतील विविध उपक्रमातून, सेवेतून लाभ घेतलेले लाभार्थी पुढीलप्रमाणे.

| | उपक्रम | लाभार्थी |
|---|---|---|
| ५ | आरोग्य तपासणी (डोळे, दात) | २००० |
| | वृध्दाश्रमांना जीवनावश्यक वस्तू व धान्य वाटप | ३००० |
| | मोफत लाईफ मॅनेजमेंट | १५०० |
| | शिवकालीन युध्दकला प्रात्यक्षिके | १००० |
| | युवती स्व-संरक्षण शिबिर | १५०० |
| | पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूचे वाटप | १२०० |
| | पूरग्रस्तांना फूड पॅकेट | १५०० |
| ६ | COVID-19' कोरोना महामारी महामारी काळातील उपक्रम | |
| | ZP,CPR, KMC मोफत मास्क वाटप | २००००० |
| | दूध संस्थाना मोफत मास्कचे वाटप | २८७५० |
| | तृतीय पंथी/देवदासी लोकांना जीवनावश्यक वस्तूंचे पुरवठा | १०००० |
| | मोफत सॅनिटायझर वाटप | १८००० |
| | सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील पोलिस बांधवाना मोफत हॅण्डग्लोज वाटप | २५०० |

# लाभार्थी

अरुण नरके फौंडेशनचे गेल्या २६ वर्षांतील विविध उपक्रमातून, सेवेतून लाभ घेतलेले लाभार्थी पुढीलप्रमाणे.

| | उपक्रम | लाभार्थी |
|---|---|---|
| | पन्हाळा, शाहूवाडी, गगनबावडा परीसरातील जनतेला इम्यूनिटी बुस्टरचे वाटप | १,००,००० |
| | पन्हाळा तालुक्यातील विविध संस्थांना भेटवस्तू वाटप | ६०० |
| | पन्हाळा तालुक्यातील गोरगरीब जनतेला फराळाचे वाटप | १५०० |
| ७ | प्रकल्प लाभार्थी | |
| | शेट टू गेट | १५०० |
| | अरुणोदय कृषी योजना | ३०००० |
| ८ | आकाशवाणी प्रश्नमंजूषा | २४,५०० |
| | एकुण लाभार्थी संख्या | ६,९६,९०० |

**आजपर्यंत संस्थेच्या विविध उपक्रमातून, सेवेतून लाभ घेतलेले 6,96,900 हून अधिक लाभार्थी...!**

# लाभार्थी

मानवता हिताय तत्परम्

आजपर्यंत आमचे ४६५०+ लाभार्थी शासकीय व बँकिंग सेवेत कार्यरत...

| अ. क्र. | प्रशासन विभाग | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | पोलीस प्रशासन<br>Dysp / API / PSI / Police इ | ८६० |
| २ | राज्यकर विभाग<br>आयुक्त / STO / STI / Tax.Assist. | २९१ |
| ३ | जिल्हा प्रशासन विभाग<br>गट 'अ' अधिकारी | ३४३ |
| ४ | बँकिंग सेवा<br>SO / PO / Clerk / LIC-ADO etc. | १२६७ |
| ५ | तलाठी, ग्रामसेवक, लिपिक | ८७२ |
| ६ | अन्य शासकीय विभाग<br>Ex. PSI कोर्ट/MSEDCL व इतर | १०१७ |
| | एकूण लाभार्थी | ४६५० |


ARUN NARKE FOUNDATION®
ANF
मानवता हिताय तत्परम्
आजपर्यंत आमचे
४६५० + विद्यार्थी
शासकीय व बँकींग सेवेत...

# स्पर्धा परीक्षांमधून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

ARUN NARKE FOUNDATION
ANF
मानवता हिताय तत्परम्



ARUN NARKE FOUNDATION
ANF
मानवता हिताय तत्परम्

# संस्थेच्या कार्याचा गौरव




ग्लोबल एज्युकेशन अँड रिसर्च ट्रस्ट, मुंबई या संस्थेने महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षा केंद्राचा सर्वे करुन अरुण नरके फौंडेशन, कोल्हापूर या आपल्या संस्थेस स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील आजपर्यंत केलेल्या गतिमान व भरीव कार्याची नोंद घेत विशेष योगदानाबद्दल राज्यस्तरीय विशेष सन्मानाबद्दल निवड केली.

नाशिक येथे सन २०१३ च्या जानेवारी महिन्यात साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. शेखर गायकवाड व प्रमुख पाहुणे मा. नामदार छगनरावजी भुजबळसो (तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांचे शुभहस्ते आणि ट्रस्टचे अध्यक्ष मा. श्री. आनंद पाटील, मा. भूषण गगरानी इ. मान्यवरांच्या उपस्थितीत संस्थेस समारंभपूर्वक सन्मानचिन्ह बहाल करण्यात आले. हा संस्थेचा कार्याचा गौरव आहे.



# सामाजिक उपक्रम

कोल्हापूर दिनांक पान २ — तरुण भारत

## नरके फौंडेशनतर्फे पन्हाळगडावर स्वच्छता मोहीम

शिक्षक, विद्यार्थी, कर्मचाऱ्यांचा सहभाग : तीन ट्रॉली कचऱ्याची विल्हेवाट, व्यसनमुक्तीसाठी जनजागृती रॅली



## अरुण नरके फाऊंडेशनमार्फत घेतलेल्या 'महिला सबलीकरण' पथनाट्यास प्रतिसाद

कोल्हापूर / प्रतिनिधी : अरुण नरके फाऊंडेशन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त जनजागृती म्हणून महिला सबलीकरण या विषयावर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. या पथनाट्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सध्या शाळा, कॉलेज, बस, ट्रेन, सार्वजनिक ठिकाणी त्याचबरोबर सोशल मीडियाच्या माध्यमातून महिलांवरील अत्याचार वाढत चालले आहेत. अशा प्रकारच्या अत्याचारांवर मात करण्यासाठी महिलांनी सक्षम बनले पाहिजे. जनजागृती म्हणून शहरातील न्यू कॉलेज, मिरजकर तिकटी, बिंदू चौक या ठिकाणी अरुण नरके फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य ... केले. पथनाट्यात ... चिखलकर, ऋतु...



अरुण नरके फाऊंडेशनतर्फे पथनाट्य सादर करताना ...

पुढारी ११/२/२०१९



## नरके फौंडेशनतर्फे पंचगंगा घाटाची स्वच्छता मोहीम

सकाळ २७/९/२०१६



## कोतोलीच्या धनगरवाड्यावर नरके फौंडेशनतर्फे पुस्तक वाटप



कोल्हापूर : अरुण नरके फौंडेशन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे अवनी संस्था मातोश्री वृद्धाश्रमास उपयुक्त वस्तूंची भेट देण्यात आली. या वेळी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.

## अरुण नरके फौंडेशन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे 'अवनी'स भेट

कोल्हापूर, ता. ७ : अरुण नरके फौंडेशन स्पर्धा परीक्षा मा... केंद्रातर्फे अवनी संस्था, मातोश्री वृद्धाश्रमास उपयुक्त वस्तूंची ... दिली. फौंडेशनच्या विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी संस्थांना ... भेट दिली. कळंबा येथे फौंडेशनच्या नागाळा पार्क शाखेतील ८... विद्यार्थ्यांनी 'अवनी'ला भेट दिली. संस्थेला पाच संगणक टेबल, ... तसेच मुलांशी संवाद साधून खाऊवाटप केले. या ...च्या मुलांनी समूहनृत्य, फौंडेशनच्या विद्यार्थ्यांनी ...करण' विषयी पथनाट्य सादर केले. आर. के. नगर ... वृद्धाश्रमाला फौंडेशनच्या शिवाजी पेठ शाखेतील ... भेट दिली. वृद्धांशी संवाद साधत त्यांना फळे, ...च मोठ्या भांड्यांचा सेट दिला. पाटोळे कुटुंबीयांनी ...न करण्यामागची भूमिका स्पष्ट केली. या उपक्रमामुळे ...क्षम अधिकारी होताना सामाजिक समस्यांची जाणीव ...त फौंडेशनच्या शिक्षकांनी व्यक्त केले.

## अरुण नरके फाऊंडेशनतर्फे प्रश्नमंजूषा स्पर्धा



कोल्हापूर : प्रश्नमंजूषा महाअंतिम फेरीतील प्रथम विजेते रोहित चौगुले, विजया रेडेकर. शेजारी योगीराज बच्चे, डॉ. सुनील गायकवाड, वैशाली काशीद, चेतन नरके, शशिकांत सुतार, पांडुरंग गांजवे आदी.

## नरके फाऊंडेशनच्या व्यक्तिमत्त्व विकास शिबिरास प्रतिसाद



शिबिरात विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिके करून घेताना प्रशिक्षक.

कोल्हापूर / प्रतिनिधी : स्पर्धा परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी अरुण नरके फाऊंडेशनतर्फे तीन दिवसांचे मोफत व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रंगकर्मी संजय हळदीकर यांनी मनोरंजनात्मक खेळ व अभिनयाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. सभाधीटपणा, निरीक्षण शक्ती, संवाद कौशल्य, स्वतःचे सादरीकरण, देहबोली, एकाग्रता, मुलाखतीचे तंत्र आणि मंत्र, सामाजिक बांधिलकीची जाणीव आदी प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करवून घेतले गेले.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्या शिल्पा देशपांडे, व्यवसाय अधिकारी बाबासाहेब खालकर, लालासाहेब गायकवाड, राजेश्वरी पवार उपस्थित होते. सांगता समारंभावेळी सहभागी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

चाकोरीबद्ध शिक्षणास फाटा म्हणजे हे शिबिर असे अनुप पोवार, तर मनातील भीती कशी गेली हे कळलेच नाही, असे विशाल शिंगे याने मत व्यक्त केले. संजय हळदीकर म्हणाले, अभिनयाच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास हे विद्यार्थ्यांनी सिद्ध केले. केंद्रप्रमुख शशिकांत सुतार, दीपाली जाधव, प्रा. गोरक्ष निकम, प्रा. अमोल कांबळे, प्रा. सतीश देसाई, नेहा कांबळे, सुप्रिया रानडे उपस्थित होते.

तरुण भारत ९/१२/२०१७ — कोल्हापूर दिनांक पान ३

## 'अवनी', मातोश्री वृद्धाश्रमास भेट



कोल्हापूर : अरुण नरके फौंडेशनच्या विद्यार्थ्यांनी अवनी संस्था व मातोश्री वृद्धाश्रमास भेट देऊन तेथील मुलांशी आणि वृद्धांशी हितगुज केले.

# विद्यार्थ्यांचा सत्कार






# विद्यार्थ्यांचा सत्कार

मानवता हिताय तत्परम्

पुढारी ११/१०/२०१०

## करिअरचा अरुणोदय - अरुण नरके फौंडेशन

### स्टेट बँक - क्लार्क परीक्षेच्या निकालात महाराष्ट्रात अव्वल स्थान

तरुण भारत १/६/२०१८

## अरुण नरके फौंडेशनचा सुधीर पाटील राज्यात दुसरा

कोल्हापूर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सप्टेंबर २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षेत अरुण नरके फौंडेशनचा विद्यार्थी सुधीर सुभाष पाटील हा राज्यात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन त्याची उपजिल्हाधिकारीपदी निवड झाली तसेच राजश्री संपतराव देसाई ही मुलींमध्ये राज्यात ११ वी आली. तिची मुख्याधिकारी (नगरपरिषद)पदी निवड झाली.

परीक्षेतील यशासाठी दररोज १० ते १२ तास अभ्यास करून सातत्याने प्रयत्न केलेच, त्याचबरोबर अरुण नरके फौंडेशनमुळे मला अभ्यासातले बारकावे समजले. याकामी तज्ज्ञ शिक्षक व मुलाखत कमिटीमुळे यश संपादन करू शकलो, अशी प्रतिक्रिया पाटील यांनी व्यक्त केली.

नरके फौंडेशनमध्ये एम.पी.एस.सी., राज्यसेवा, सरळसेवा तसेच बँकिंगमधील IBPS, SBI स्टाफ सिलेक्शन कमिशन, रेल्वे, LIC प्रॉव्हीडंड फंड, SPI औरंगाबाद इ. स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन घेतात.

गेली २५ वर्षे परीक्षांच्या माध्यमातून सक्षम अधिकारी ... काम अरुण नरके ... अखंडीतपणे करीत आहे. अधिक ... संस्थेच्या कोल्हापुरात ... पेठ, नागाळापार्क ... गडहिंग्लज येथील ... संपर्क साधावा, असे आवाहन ... आहे.

सुधीर पाटील

राजश्री देसाई

सकाळ १०/१०/...

## रिक्षाचालकाच्या मुलीचं लखलखतं यश

### पहिल्याच प्रयत्नात एमपीएससी उत्तीर्ण

## 'आयबीपीएस'मध्ये नरके फौंडेशनच्या विद्यार्थ्यांचे यश

मयुर पाटील

मयूर सोनवणे

निखिल पैजरे

प्रतिक्षा आपटे

सचिन मुगडे

सकाळ ९/१२/२०१८

अवतीभवती



कोल्हापूर : राष्ट्रपती शौर्यपदक प्राप्त पीएसआय शीतलकुमार डोईजड यांचा सत्कार करताना अरुण नरके फाऊंडेशन संस्थेचे उपाध्यक्ष चेतन नरके आणि शशिकांत सुतार.

## अरुण नरके फाऊंडेशनतर्फे पीएसआय डोईजड यांचा सत्कार

कोल्हापूर : अरुण नरके फाऊंडेशनचे विद्यार्थी शीतलकुमार डोईजड ... गडचिरोली येथे पीएसआयपदी नेमणुकीत असताना केलेल्या ... रीसाठी त्यांना राष्ट्रपती शौर्यपदक बहाल करण्यात आले. याबद्दल ... थोरात अभ्यासिकेत फाऊंडेशनतर्फे त्यांचा सत्कार झाला. ... ाध्यक्ष चेतन नरके यांच्या हस्ते डोईजड यांचा सत्कार झाला. ... जड यांनी फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेपासून ते ... दापर्यंतच्या कालावधीतील महत्त्वाचे टप्पे आणि आठवणी ... पेच एकाच पोस्टसाठी प्रयत्न करण्यापेक्षा विविध ... करत राहण्याचा कानमंत्र देखील त्यांनी दिला. यावेळी ... शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्य नगरी ११/१२/२०१८



कोल्हापूर : अरुण नरके फौंडेशनतर्फे करनिर्धारण व न्यायालयीन परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत मधुकर गाताडे, वैशाली काशीद. सोबत दिलीप नरके.

## करनिर्धारण परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

### अरुण नरके फौंडेशनतर्फे आयोजन

कोल्हापूर / प्रतिनिधी :

येथील अरुण नरके फौंडेशनच्या वतीने करनिर्धारण व न्यायालयीन परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा निवृत्त पोलीस उपअधीक्षक मधुकर गाताडे आणि विक्रीकर उपायुक्त वैशाली काशीद यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

करनिर्धारण अधिकारी व न्यायालयात स्टेनो/ क्लार्क/ शिपाईपदी निवड झालेल्या ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांपैकी ३५ यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाहुण्यांच्या हस्ते गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

विक्रीकर उपायुक्त वैशाली काशीद या १९९५ मध्ये अरुण नरके फौंडेशनच्या पहिल्या वरिष्ठ अधिकारी झालेल्या विद्यार्थिनी असून, याचा त्यांना अभिमान असल्याचे विश्वस्त दिलीप नरके यांनी सांगितले. निवृत्त पोलीस उपअधीक्षक गाताडे म्हणाले, न्यायालयीन नोकरी प्राप्त विद्यार्थ्यांनी अन्यायाविरुद्ध न्याय देण्याची संधी मिळाली हेच समजावे. प्रत्येकाने प्रयत्नवादी बनले पाहिजे. सूत्रसंचालन स्वप्नील पाटील यांनी केले.

पुढारी ११/१/२०१८

प्रियांका भोसले

रामलिंग सूर्यवंशी

निखील पाटील

संतोष पाटील

## नरके फौंडेशनचे राज्य उत्पादन शुल्क दुय्यम निरीक्षक परीक्षेत यश

कोल्हापूर : प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या राज्य उत्पादन शुल्क, दुय्यम निरीक्षक परीक्षेत अरुण नरके फौंडेशनची विद्यार्थिनी प्रियांका भोसले राज्यात पाचवी तर रामलिंग सूर्यवंशी हा राज्यात नववा आला. त्याचबरोबर निखील पाटील व संतोष पाटील यांचीही निवड झाली. संस्थेच्या मुख्य कार्यालयात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा विश्वस्त दिलीप नरके व सौ. लिनाताई तुपे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व रोप देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रमेश कांबळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी २८/८/२०१०

## बँकिंग स्पर्धा परीक्षेत अरुण नरके फौंडेशनचे यश

# मान्यवरांची व्याख्याने

ARUN NARKE FOUNDATION
ANF
मानवता हिताय तत्परम्

कोल्हापूर शहर- जिल्हा | ५

## स्त्रीत्वाच्या जाणिवा साहित्यात समर्थपणे

डॉ. वीणा देव : अरुण नरके फाऊंडेशनतर्फे सुनीता नरके स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान









## विद्यार्थ्यांनो, सकारात्मक दृष्टिकोन बाळगा : पाटील





तरुण भारत १४-३-२०१८

## स्पर्धा परीक्षा अभ्यासापूर्वी स्वतःच्या क्षमता ओळखा

विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे - पाटील : नरके फाऊंडेशनच्या 'संवाद ध्येयवेड्यांशी' कार्यक्रमास प्रतिसाद



सकाळ ६/३/२०१८

## स्वतःतील क्षमता ओळखून अभ्यासाची पद्धत तयार करा

नांगरे-पाटील : नरके फाउंडेशनतर्फे कार्यक्रम



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील.

सकाळ पान-४ ३-३-१८

## स्वतःला सिद्ध करणे हीच खरी स्पर्धा

अरविंद इनामदार : नरके फौंडेशनतर्फे 'आव्हान स्त्री जीवनाचे' विषयावर व्याख्यान





तरुण भारत ३/३/२०१६

## स्त्रीशक्तीच्या आशीर्वादानेच झाले जीवन यशस्वी



महाराष्ट्र टाईम्स ३/३/२०१६

## 'स्त्रीशक्तीनेच घडवले माझे जीवन'



ARUN NARKE FOUNDATION
मानवता हिताय तत्परम्

# मान्यवरांची व्याख्याने



कोल्हापूर : अरूण नरके फौंडेशनतर्फे आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मान्यवर.

## अरूण नरके फौंडेशनच्या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

कोल्हापूर

अरूण नरके फौंडेशनच्यावतीने पीएसआय/ एसटीआय/ राज्यसेवा परीक्षार्थ्यांसाठी संस्थेच्या नागाळापार्क शाखेकडील प्रशस्त हॉलमध्ये नुकतीच कार्यशाळा आयोजित केली होती. प्रदीर्घ ... तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. अजय ... गणित, अर्थशास्त्र, इतिहास, विज्ञान या विषयांवर कोल्हापूर व सांगली येथे आयोजित केलेल्या उजळणी वर्गाचा ४०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. कार्यशाळेचा शुभारंभ विश्वस्त अजय नरके यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. शरद कांबळे यांनी केले तर आभार रमेश कांबळे यांनी मानले. कार्यशाळेचे नियोजन प्राचार्य, शिक्षक व ...

## अरुण नरके फौंडेशनचा २६ वा वर्धापनदिन साजरा

### स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील विश्वसनीय संस्था: चार हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी प्रशासकीय सेवेत



कोल्हापूर: स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त अशा छापील नोट्सचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

कोल्हापूर

पश्चिम महाराष्ट्रातील यशस्वितेचा हजारोंचा टप्पा ओलांडणारी स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील विश्वसनीय संस्था अरुण नरके फौंडेशनचा २६ वा वर्धापनदिन २९ नोव्हेंबरला मोठ्या उत्साहात साजरा झाला. संस्थेची स्थापना संस्थेचे संस्थापक अरुण नरके यांच्या ५० व्या वाढदिनी झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थी अधिकारी व्हावेत, हाच यामागचा उदात्त हेतू होता. संस्थेचे आजपर्यंत ४००० पेक्षा जास्त विद्यार्थी प्रशासकीय व बँकिंग सेवेत कार्यरत आहेत.

... वेळी संस्थेच्यावतीने सर्व ... परीक्षांसाठी उपयुक्त अशा ... ील नोट्सचे मान्यवरांच्या ... े अनावरण करण्यात आले.

लक्ष्मी हॉल' बागल चौक, कोल्हापूर येथे पार पडला. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अरुण नरके यांच्या हस्ते सभागृहाचे उद्घाटन करण्यात आले. नूतन सभागृह लग्नसमारंभ, मिटींग व विविध कार्यक्रमासाठी ...

करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष चेतन अरुण नरके (वाणिज्य सल्लागार थायलंड सरकार) ... विद्यार्थ्यांशी संवाद सा... प्रकाशनाम... मोलाचे स...

सर्वांचे कौतुक केले.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष, विश्वस्त बाळ पाटणकर, रवींद्र 'उबेरॉय, दिलीप नरके, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी उपस्थित



कोल्हापूर : विनायक रेडेकर यांचे स्वागत करताना अरुण नरके फाऊंडेशनच्या विश्वस्त स्निग्धा नरके आदी.

## नरके फाउंडेशनमध्ये शिवजयंतीनिमित्त मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. २१ : अरुण नरके फाऊंडेशनतर्फे शिवजयंतीनिमित्त विनायक रेडेकर यांनी स्पर्धा परीक्षार्थींना मार्गदर्शन केले.

या वेळी श्री. रेडेकर यांनी शिवरायांचे विचार जोपासले, तर उत्तम प्रशासकीय अधिकारी घडतील, असा विश्वास व्यक्त केला. गोरक्ष निकम यांनी शिवाजी महाराजांच्या इतिहासाविषयी माहिती दिली. अनुसूया रावत, मनाली जाधव, गौरी चौगले यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य व त्यांची प्रेरणा' विषयावर मनोगत व्यक्त केले. प्रीती मनवाडकर हिने आरती गायली. नीतेश पताडे याने कविता सादर केल्या. फाउंडेशनच्या विश्वस्त स्निग्धा नरके यांनी स्वागत केले. रोहिणी पाटील हिने सूत्रसंचालन केले. रमेश कांबळे यांनी प्रास्ताविक केले. अजित चव्हाण यांनी आभार मानले.

महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर • मंगळवार, २८ एप्रिल २०१५

## यशासाठी हवे मानसिक स्थैर्य

### डॉ. सचिन परब यांचा स्पर्धा परीक्षार्थींना सल्ला

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



'शोध अंतर्मनाचा, शोध भविष्याचा,' या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. सचिन परब.

हे लक्षात ठेवा



## ...र्धा परीक्षेसाठी जिद्द, मेहनतीची गरज : देशमुख

## तप केल्याशिवाय पत वाढत नाही

इंद्रजित देशमुख यांचा सल्ला : नरके फौंडेशनतर्फे यशवंत विद्यार्थ्यांचा गौरव





कोल्हापूर : स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसोबत मान्यवर.

## अरुण नरके फौंडेशनतर्फे यशवंतांचा सत्कार

25 वर्षपूर्ती

मा. श्री. इंद्रजीत देशमुख

गौरव यशवंतांचा!

सत्कार सोहळा

स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्यान

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

अरुण नरके फौंडेशन

संस्थेचा गौरव

# स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल नरके फौंडेशनचा गौरव

कोल्हापूर : प्रतिनिधी

ग्लोबल एज्युकेशन अँण्ड रिसर्च ट्रस्ट फौंडेशनमार्फत स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलन नाशिक येथे आयोजित केले होते.

अरुण नरके फौंडेशन, कोल्हापूर या संस्थेच्या १७ वर्षांतील गतिमान प्रगतीचा आढावा घेऊन ग्लोबल एज्युकेशन अँण्ड रिसर्च ट्रस्ट फौंडेशनतर्फे सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन संस्थेस गौरविण्यात आले.

यावेळी संस्थेचे केंद्रप्रमुख ज्ञानदेव भोपळे, संमेलनाचे अध्यक्ष शेखर गायकवाड, आय. ए. एस., फौंडेशनचे अध्यक्ष आनंद पाटील, ग्लोबल एज्युकेशन अँण्ड रिसर्च ...



कोल्हापूर : ग्लोबल एज्युकेशन अँण्ड रिसर्च ट्रस्ट फौंडेशनतर्फे सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते सन्मानचिन्ह स्वीकारताना नरके फौंडेशनचे केंद्रप्रमुख ज्ञानदेव भोपळे.

१२/११/२०१८

# नरके फौंडेशनचा 'स्नेहसोहळा' उत्साहात

## रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम : मान्यवरांच्या हस्ते हवेत फुगे सोडून उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अरुण नरके फौंडेशनच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या शासकीय, बँकिंग क्षेत्रातील यशवंतांचा स्नेहसोहळा उत्साहात पार पडला.

कळंबा येथील नरकेवाडी अमृतधारा फार्म येथे शनिवारी (दि. १०) झालेल्या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन फौंडेशनचे यशस्वी विद्यार्थी व शिक्षक मदुरा दिंडे, राणीताई पाटील, राजकुमार पाटील, दिग्विजय पाटील, अर्जुन धनवडे, किरण कांबळे, कुलदीप कुऱ्हाडे, शिवकुमार पोवार यांच्या हस्ते करण्यात आले; तर या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते हवेत फुगे सोडून करण्यात आले.

फौंडेशनचे उपाध्यक्ष चेतन नरके म्हणाले, माफक फीमध्ये स्पर्धा परीक्षेच्या मार्गदर्शनाचे कार्य करीत असतानाही, ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु हुशार, होतकरू, गरजू विद्यार्थ्यांसह अंध, अपंग मुलांना हातभार लावण्याचे कार्य संस्था करीत आहे. तसेच भविष्यात ई-लायब्ररी, ऑनलाईन कोर्सेस, पुस्तके स्कॅनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. फौंडेशनला विद्यार्थ्यांसाठी प्रशासकीय सेवेचा दीपस्तंभ बनविण्याचा संस्थेचा संकल्प आहे.

फौंडेशनचे संस्थापक अरुण नरके यांनी, विद्यार्थी हेच फौंडेशनचे वैभव आहे, अशी भावना व्यक्त केली. तसेच फौंडेशनचे ज्येष्ठ विश्वस्त रवींद्र उबेरॉय, अध्यक्ष बाळ पाटणकर यांनी फौंडेशनच्या स्थापनेचा उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी सेल्सटॅक्स कमिशनर वैशाली काशीद, शर्मिला मिस्कीन, एपीआय सतीश शिंदे, जलसंपदा अधिकारी संजय खोत यांनी स्वानुभवातून संस्थेच्या कार्याची माहिती स्पष्ट केली. पांडुरंग गांजवे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी फौंडेशनचे प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कोल्हापुरातील कळंबा येथील नरकेवाडी अमृतधारा फार्म येथे शनिवारी अरुण नरके फौंडेशनच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या यशवंतांच्या स्नेहसोहळ्याचे हवेत फुगे सोडून उद्घाटन केले. डावीकडून रवींद्र उबेरॉय, चेतन नरके, बाळ पाटणकर, अरुण नरके, दिलीप नरके, आदी उपस्थित होते.

# अरूण नरके यांचे सहकारातील काम मार्गदर्शक

## सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे गौरवोद्गार

▸ पुणे / प्रतिनिधी

अरुण नरके हे सहकार क्षेत्रात अतिशय चांगले काम करत असून आम्हाला सहकारात काम करताना कोणतीही अडचण आली तरी आम्ही त्यांचे मार्गदर्शन घेतो, असे गौरवोद्गार सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी रविवारी पुण्यात काढले.

कै. नरुभाऊ लिमये स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणारा 'आर्यभूषण पुरस्कार' सहकार क्षेत्रासाठी 'गोकुळ'चे संचालक अरुण नरके यांना, तर 'पत्रकारितेसाठी' ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे यांना पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ शां. ब. मुजुमदार, म्हाडाचे अध्यक्ष ... विजय पाटील आदी यावेळी उपस्थित ... सहकारमंत्री पाटील म्हणाले ...

आणावी लागेल. आर्यभूषण प्रिंटिंग प्रेस बाबत तातडीने बैठक घेऊन त्यात पूर्णपणे बदल करू. अशा संस्था टिकायला हव्यात. सहकार क्षेत्रातून पूर्णपणे सहकार्य मिळेल असे आश्वासनही सहकार मंत्री पाटील यांनी यावेळी दिले.

नरके म्हणाले, दुधाबाबत सहकारात काही चुका झाल्या आहेत. पूर्वी जेव्हा एक गाव एक डेअरी असायची तेव्हा सुरळितपणे चालू असायचे. पण, आता एक गाव आठ डेअऱ्या झाल्या आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम सहकारावर होत आहे. जिल्हा दूध संघाचे तालुका दूध संघ झाले आहेत. सर्व सहकारी संस्था या व्यवस्थित चालल्या पाहिजेत, असेही ते म्हणाले. ...



पुणे : कै. नरुभाऊ लिमये स्मृतीप्रीत्यर्थ देण्यात येणारा 'आर्यभूषण पुरस्कार' सहकार ... अरुण नरके यांना सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या ...

# अरुण नरके फौंडेशन म्हणजे हमखास यश

## स्पर्धा परीक्षेसाठी सुसज्ज ग्रंथालय; सामाजिक उपक्रमातही संस्थेचा पुढाकार

कोल्हापूर : प्रतिनिधी

अरुण नरके फौंडेशनमुळे अनेक अधिकारी घडले आहेत. नरके फौंडेशन म्हणजे स्पर्धा परीक्षेत हमखास यश, हे समीकरण बनले आहे. स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारे सर्व प्रकाशनांची पुस्तके उपलब्ध असणारे सुसज्ज ग्रंथालय संस्थेचे आहे. शैक्षणिक कार्याबरोबर सामाजिक उपक्रमातही संस्थेचा नेहमीच पुढाकार असतो. शैक्षणिक, सहकार, क्रीडा, बँकिंग, शेती, दूध, राजकीय व सामाजिक अशा विविध क्षेत्रात अरुण दत्तात्रय नरके यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्यकुशलतेचा ठसा उमटविला आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना त्यांच्या जबाबदारीची योग्य जाणीव करून देत असतानाच त्यांना आधार, धीर देण्याबरोबरच योग्य मार्गदर्शन करण्याचे काम फौंडेशन करीत आहे.

फौंडेशनची १९९४ साली स्थापना झाली. ...

संस्था उभी करण्यास, वाढविण्याचे काम १९९४ पासून आजपर्यंत अध्यक्ष रामचंद्र पाटणकर, खजानिस रवींद्र उबेरॉय, विश्वस्त शिवराम पाटील, चेतन नरके, सल्लागार अरुण द. नरके करीत आहेत. संस्थापक अरुण नरके यांनी स्वतःची चार मजली इमारत ट्रस्टला भेट स्वरूपात दिली आहे.

संस्थेतर्फे सर्व स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते. बहुपर्यायी उत्तरे अचूकपणे आणि नेमक्या सेकंदात सोडविण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने मार्गदर्शन केले जाते. आजपर्यंत अनेक उमेदवार या संस्थेतून आयएएस सारख्या पदावर विराजमान आहेत. तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि ग्रंथसंपदा ही संस्थेची सर्वात मोठी जमेची बाजू आहे. दररोज नवीन नोकरीविषयक जाहिरातीची माहिती, प्रत्येक विषयास तज्ज्ञ अनुभवी शिक्षकवर्ग, सराव चाचणी पेपरची सुविधा, एकावेळी अनेक स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, चालू घडामोडीवर नोट्स, छापील नोटस, वसतीगृह, ... आदी पायाभूत सुविधा ...

व्यक्तिमत्त्व विकास, स्पोकन इंग्लिश आणि सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट कोर्सही घेतले जातात. संस्थेच्या सुसज्ज ग्रंथालयामध्ये १५ हजारांहून अधिक पुस्तके आहेत. यूपीएससी, एमपीएससीसाठी लागणारी क्रमिक पुस्तके तसेच पाचवी ते दहावी पर्यंतची महाराष्ट्र सरकार, सीबीएसई आणि एनसीईआरटीची जुन्या व नवीन अभ्यासक्रमाची सर्व पुस्तके उपलब्ध आहेत. महाराष्ट्रात अशा प्रकारचे एकमेव ग्रंथालय आहे.

संस्थेतर्फे प्रतिवर्षी कै. सुनीता अरुण नरके यांच्या स्मृतिदिनानिमित्त तज्ज्ञ वक्त्यांची विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करून समाजप्रबोधन केले जाते. स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन 'ग्लोबल एज्युकेशन अँड रिसर्च ट्रस्ट, मुंबई' यांच्यातर्फे संस्थेला विशेष पुरस्काराने सन्मानित केले आहे. याशिवाय इतर पुरस्कारही संस्थेला मिळाले आहेत.

शैक्षणिक कार्यासोबत रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान आदी सामाजिक उपक्रम संस्थेतर्फे दरवर्षी राबविले जातात. मुख्य कार्यालयासह शिवाजी पेठ, नागाळा पार्क, सांगली, गडहिंग्लज या शाखांद्वारे संस्था कार्यरत आहेत.

सकाळ १३/११/२०१८



कोल्हापूर : येथे अरुण नरके फाउंडेशनमध्ये दीपप्रज्वलन करताना राजकुमार पाटील, मदुरा दिंडे, राणीताई पाटील, दिग्विजय पाटील आदी.

# अरुण नरके फाउंडेशनचा स्नेहसोहळा उत्साहात

कोल्हापूर, ता. १२ : अरुण नरके फाउंडेशनच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित संस्थेचा स्नेहसोहळा संपन्न झाला. नरकेवाडी, कळंबा येथे झालेल्या कार्यक्रमास शासकीय, बँकिंग क्षेत्रातील यशवंतांनी हजेरी लावली. कार्यक्रमाची सुरवात संस्थेचे माजी विद्यार्थी जे सध्याचे अधिकारी आहेत आणि शिक्षकांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. संस्थेचे विश्वस्त रवींद्र उबेरॉय यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. ...

कार्याला प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले. उपाध्यक्ष चेतन नरके यांनी संस्थेने फक्त माफक फीच नाही तर आर्थिक दुर्बल, अंध, अपंग मुलांनाही सुविधा दिल्याचे सांगितले. डिजिटल लेक्चर, ई-लायब्ररी, ऑनलाईन कोर्सेस असे अनेक स्टडी मटेरियल उपलब्ध दिल्याचे सांगितले. या वेळी वैशाली काशीद, शर्मिला मिस्कीन, सतीश शिंदे, संजय खोत या विविध पदावरील अधिकाऱ्यांनी स्वानुभव कथन केले. ...

तरूण भारत १३/६/२०१९

# सामाजिक बांधिलकी जपणारे नरके फौंडेशन

**स्पर्धा परीक्षेसह देशाच्या विकासाचे केंद्र**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्यासाठी कोणतेही कौशल्य नसते. आर्थिक परिस्थितीही बिकट असते, पण अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून नरके फौंडेशनमध्ये येतात. अशा विद्यार्थ्यांना अधिकारी बनवण्याचे काम नरके फौंडेशन करते. ग्रामीण भागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना अधिकारी बनवणारी अरुण नरके फौंडेशन एकमेव संस्था आहे. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेसह देशाच्या विकासाच्या केंद्रबिंदूचा एक भाग बनले आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. स्पर्धा परीक्षेत १० टक्के मुले यशस्वी होतात, पण जी ९० टक्के मुले अपयशी ठरतात अशा विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित शिक्षण देवून, रोजगाराच्या संधी देण्याचा प्रयत्न करण्याचा मानस फौंडेशनचा आहे.

अध्यक्ष चेतन नरके (अरुण नरके फौंडेशन)

... प्रत्येक विषयाला एक शिक्षक देवून पूरक मार्गदर्शन व योगा क्लास घेवून आरोग्यदायी जीवन विद्यार्थ्यांना देते.

**दिल्लीपातळीवर संस्थेचा सन्मान**

संस्थेच्या कार्याची दखल घेतली जात आहे. ग्लोबल एज्युकेशन अँड रिसर्च ट्रस्ट या संस्थेने राज्यातील स्पर्धा परीक्षा केंद्राचे सर्वेक्षण केले. यामध्ये अरुण नरके फौंडेशन संस्था अव्वल ठरली. संस्थेने एका समारंभात नरके फौंडेशनचा विशेष पुरस्कार देऊन सन्मान केला. नाशिक येथे २०१३ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, तत्कालीन बांधकाममंत्री ट्रस्टचे अध्यक्ष आनंद पाटील, भूषण गगराणी यांच्या हस्ते संस्थेचा सन्मान केला. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी अरुण नरके फौंडेशनचा ५ मार्च २०१९ रोजी गौरव केला आहे.

**स्पर्धा परीक्षेत हमखास यश**

ग्रामीण भागातील मुलांकडे गुणवत्ता असूनही त्यांना स्पर्धा परीक्षेपासून वंचित रहावे लागते. या विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यासाठी नरके फौंडेशनची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची नस ओळखून नरके फौंडेशनने प्रशासकीय अधिकारी घडविण्याचे धनुष्य उचलले आहे. ... आजपर्यंत ४ हजाराहून अधिक विद्यार्थी शासकीय व बँकींग सेवेमध्ये रूजू झाले आहेत. ... एमपीएससी, बँकिंग, राज्यसेवा, तलाठी भरतीसंदर्भात मार्गदर्शन केले जाते.

**सामाजिक बांधीलकी**

मुलांना शालेय शिक्षणाबरोबर सामाजिक बांधिलकीचे भान असावे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून एक सक्षम अधिकारी बनावा यासाठी रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, गड-कोट किल्ले संवर्धन, व्यसनमुक्ती कार्यक्रम, शिवराज्याभिषेक दिनी शिवकालीन मर्दानी खेळाची व युद्ध कलेची प्रात्यक्षिके, वृक्षारोपण यासारखे उपक्रम राबवले जातात. यातून विद्यार्थ्यांचा मानसिक, बौद्धिक, शारीरिक विकास करण्यासाठी उपयोग होतो. ... प्रामाणिक आणि सामाजिक बांधिलकी ... समाजाच्या विकासात हातभार लावणारे अधिकारी ... करतात.

स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी जवळपास १५ हजार पुस्तकांचे सुसज्ज ग्रंथालय आहे. ... ४ हजाराहून जास्त ... शासकीय सेवेत रूजू आहेत.



चेतन नरके

**कॅम्पसची वैशिष्ट्ये-**

- आतापर्यंत ४ हजारपेक्षा जास्त विद्यार्थी शासकीय व बँकींग क्षेत्रात कार्यरत
- अभ्यास करूनही स्पर्धा परीक्षेत अपयशी विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारीत शिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध
- ग्लोबल एज्युकेशन अँड रिसर्च ट्रस्टकडून नरके फौंडेशनचा गौरव



कोल्हापूर : नरके फौंडेशनने आतापर्यंत जवळपास ४ हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शासकीय नोकरी दिली आहे. याची दखल घेवून राज्यपाल विद्यासागर राव यांनी फौंडेशनचे अध्यक्ष चेतन नरके यांचा सत्कार केला. सोबत विद्युतचे माजी राज्यमंत्री डॉ. टी. डाय. पाटील, माजी आमदार सुरेश साळोखे.

अहिल्या परकाळे, कोल्हापूर

ARUN NARKE FOUNDATION ®

ANF

मानवता हिताय तत्परम्



# शहरातील तृतीयपंथीयांना प्रशासनाकडून अन्नध...

ग्रामीण भागात परवड, लॉकडाऊनचा परिणाम

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

जिल्हा प्रशासनाकडून शहरातील तृतीयपंथीयांना अन्नधान्याचे किट दिले.



» अवतीभवती

कोल्हापूर : शिवकालीन मर्दानी खेळांच्या प्रात्यक्षिक प्रसंगी चेतन नरके, विश्वस्त अजय नरके, वस्ताद आनंदराव ठोंबरेंसह आदी.

## अरुण नरके फौंडेशनतर्फे शिवकालीन खेळांची प्रात्यक्षिके

कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकदिनानिमित्त अरुण नरके फौंडेशनतर्फे शिवकालीन युद्धकलेची मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर झाली. चुना वाशी नाका, राजकपूर पुतळ्याजवळ, रंकाळा गार्डन येथे झालेल्या कार्यक्रमात शिवकालीन शस्त्रांची माहिती देण्यात आली. शाहीर मिलिंद सावंत यांनी ऐतिहासिक पोवाडे, शिवसंस्कारित समाज प्रबोधनपर गीते सादर केली. अध्यक्ष चेतन नरके यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन झाले. लाठीकाठी, लाठी कैची, पट्टा, पट्टाकैची, पट्ट्याच्या सहाय्याने लिंबू कापणे अशी चित्तथरारक प्रात्यक्षिके वस्ताद आनंदराव ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केली. निवृत्त प्राचार्य आर. डी. पाटील, एस. व्ही. सूर्यवंशी, संदीप पाटील, प्रसाद कारेकर, सागर जाधव, स्वप्नील यादव उपस्थित होते.



कोल्हापूर : द न्यू एज्युकेशन सोसायटीतर्फे व्हाईट आर्मीला आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक साहित्य देताना विनोदकुमार लोहिया, चेतन नरके, नितीन वाडीकर, प्रभाकर हेरवाडे, अशोक रोकडे आदी.

# कठोर परिश्रमाने यश मिळतेच : चेतन नरके

कोल्हापूर, ता. ७ : 'कठोर परिश्रम, प्रयत्नात सातत्य ठेवले की हमखास यश मिळते. नेहमी सकारात्मक विचार करा,' असे प्रतिपादन थायलंड सरकारचे आर्थिक आणि वाणिज्य सल्लागार चेतन नरके यांनी केले. दि न्यू एज्युकेशन सोसायटीच्या सौ. स. म. लोहिया ज्युनिअर कॉलेज व व्यवसाय अभ्यासक्रम विभागाच्या 'अक्षर' या वार्षिक अंकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष विनोदकुमार लोहिया होते. उपाध्यक्ष नितीन वाडीकर, सहसचिव प्रभाकर हेरवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य एस. एस. चव्हाण यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उपप्राचार्य ए. एस. सूर्यवंशी यांनी परिचय करून दिला. लोहिया म्हणाले, ''अक्षर या अंकामुळे नवीन लेखक, कवी यांना व्यासपीठ मिळाले आहे. तसेच या अंकातील लिखाणामुळे अनेकांना प्रेरणा मिळेल.'' यावेळी व्हाईट आर्मीचे प्रमुख अशोक रोकडे यांनी महापुराच्या काळात केलेल्या बचाव कार्यांची माहिती दिली. व्हाईट आर्मीला ब्रशकटर, हायड्रोलिक कटर, डायमंड कटर, हॅमर, वॉटर प्रेशर, वेल्डिंग मशीन, बार कटर, जनरेटर, ब्रेकर मशीन हे साहित्य देण्यात आले. तसेच रोकडे, सागर बगाडे यांचा सत्कारही झाला. सूत्रसंचालन बी. डी. कलगे यांनी केले. आभार जी. बी. गडगे यांनी मानले.



# नरके फौंडेशनतर्फे मर्दानी खेळांची प्रात्यक्षि...

कोल्हापूर : रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या पूर्वसंध्येला बुधवार ५ जून रोजी नरके फौंडेशनतर्फे मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. जुनावाशीनाका, राजकपूर पुतळ्याजवळ रंकाळा गार्डन, कोल्हापूर येथे मोठ्या दिमाखात शिवकालीन शस्त्रांच्या माहितीसह मर्दानीखेळांचे प्रात्यक्षिके व शाहीर शिवप्रेमी मिलिंद सावंत यांचे ऐतिहासिक पोवाडे, शिवसंस्कारीत समाज प्रबोधनपर बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला.

सुरवातीस छत्रपती शिवरायांचे मूर्तीचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष चेतन नरके यांनी प्रास्ताविक केले. चेतन नरके म्हणाले, अरुण नरके फौंडेशन ही संस्था पश्चिम महाराष्ट्रात, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाप्रमाणेच सामाजिक कार्यातही अव्वल आहे. गेल्या २५ वर्षात ४००० हून अधिक विद्यार्थ्यांची शासकिय व बँकिंग सेवेत निवड झाली असून अरुण नरके फौंडेशन नेहमी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा शैक्षणिक मार्गदर्शनाशिवाय विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ जपणूक व शारिरिक तंदुरुस्तीच्या दृष्टीची दखल घेऊ... आजवर करीत आहे.

शाहीर शिवप्रेमी मिलिंद ... यांनी पोवाड्याच्या माध्यमातून ... मुलूखातील धगधगत्या इति...



# भारत – थायलंड व्यापारसेतू बांधणार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

**थायलंडचे वाणिज्य सल्लागार चेतन नरके यांची माहिती**

'भारत सरकारने आपली अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढविण्याचा निर्धार केला आहे. या पार्श्वभूमीवर भारत आणि थायलंड या दोन देशांत व्यापार, उद्योगांचा सेतू बांधण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती, थायलंड सरकारचे वाणिज्य विषयक सल्लागार चेतन नरके यांनी पत्रकार परिषदेत दिली. आपल्याला मिळालेल्या संधीचा कोल्हापूरला लाभ होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जानेवारी २०१९ मध्ये थायलंडमध्ये सरकार नियुक्त झाल्यानंतर नुकतीच २३ आणि २४ जूनला बँकाक शहरात कंबोडिया, लाओस, मॅनमार, व्हिएतनाम, थायलंड या पाच देशांची वाणिज्यविषयक परिषद झाली. या परिषदेला थायलंडचे पंतप्रधान छान ओ छा, लाओसचे वाणिज्य मंत्री खेमानी एकोलसेना, मॅनमारचे वाणिज्यमंत्री डॉ. थाम मियांत, व्हिएतनामचे वाणिज्यमंत्री ट्रेन टुआन यांच्यासह पाच देशातील उद्योगपती, व्यापारी, राजकारणी, अर्थतज्ज्ञ, कायदे आणि वाणिज्य सल्लागार उपस्थित होते. अमेरिका व चीन देशातील व्यापार युद्धाचा फायदा कसा घेता येईल हा परिषदेचा हेतू होता. भारताची लोकसंख्या, स्थिर सरकार या गोष्टींचा विचार करता भारताबरोबर व्यापार संबंध वाढवण्यासाठी प्रयत्न करता येईल. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, गोवा, मध्य प्रदेश या राज्यांवर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्याशी बैठक होणार आहे. वाणिज्य सल्लागार म्हणून काम करण्यापूर्वी नरके ...



...: अरुण नरके फौंडेशनच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित उपक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे अध्... ...रके, शाहीर शिवप्रेमी मिलिंद सावंत, वस्ताद आनंदराव ठोंबरे यांच्यासह अन्य.

# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके

## अरुण नरके फौंडेशनचा उपक्रम

कोल्हापूर / प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या पूर्वसंध्येला रंकाळा गार्डन येथे शिवकालीन शस्त्रांच्या माहितीसह मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके करण्यात आली. अरुण नरके फौंडेशनच्या वतीने आयोजित या उपक्रमात शाहीर शिवप्रेमी मिलिंद सावंत आणि वस्ताद आनंदराव ठोंबरे यांनी ऐतिहासिक पोवाडे, शिवसंस्कारित समाज प्रबोधनपर बहारदार कार्यक्रम सादर केले.

प्रारंभी छत्रपती शिवरायांच्या मूर्तीचे पूजन व दीपप्रज्वलन झाले. संस्थेचे अध्यक्ष चेतन नरके यांनी स्वागत केले. शाहीर शिवप्रेमी मिलिंद सावंत यांनी पोवाड्याच्या माध्यमातून मराठी मुलखातील धगधगत्या इतिहासाचे शौर्यशाली वर्णन, शिवकालीन शस्त्रांची माहिती, अरुण नरके फौंडेशनचे कार्य सादर केले. तसेच सांस्कृतिक कला लेझीमबरोबरच सिंगल, डबल लाठी, लाठी-कैची, सिंगल, डबल पट्टा, पट्टाकैची, पट्टा चालविण्याचे विविध प्रकार, पट्ट्याच्या साहाय्याने लिंबू कापणे, पोटावरील आणि गळ्यावरील केळी कापणे, खाऊची पाने कापणे, टाचेखालील व तोंडातील हनुवटीखालील लिंबू कापणे, त्याचबरोबर तलवार चालविणे, ढालतलवार ... चित्तथरारक विविध प्रकारच्या मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. या कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्त, भागातील ज्येष्ठ नागरिक कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थी व शिवप्रेमी समूहाने लाभ घेतला.



सकाळ

...सा : डॉ. शिसवे

प्रायोजक असे...

ARUN NARKE FOUNDATION
मानवता हिताय तत्परम्

लोकमत

# चेतन नरके थायलंडचे वाणिज्य सल्लागार

पाच देशांच्या चर्चासत्रामध्ये सहभाग

कोण आहेत चेतन...

# बँकॉकमधील वाणिज्य परिषदेत भारत उत्पादकता सिद्ध : चेतन नरके

st Published at 16:36 2019-07-04



ल्हापूर (प्रतिनिधी) : भारताची उत्पादन क्षमता वाढून ापार वृद्धी व्हावी यासाठी पाच देशांनी एकत्र येवून तलेल्या वाणिज्य परिषदेत भारताच्या उत्पादनाची युक्तता सिद्ध करणे शक्य झाले आहे. यामुळे या परि ग घेणाऱ्या पाच देशाची अर्थव्यवस्था सक्षम होण्यास णार असल्याची माहिती थायलंडच्या वाणिज्य विषय ल्लागार म्हणून प्रतिनिधीत्व केलेले चेतन नरके यांनी रुवार) यांनी पत्रकार परिषदेत दिली.



चेतन नरके

वाणिज्य सल्लागार, थायलंड सरकार

कोल्हापूरची प्रगती स्वबळावर झाली असली तरी सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात कोल्हापूरला मोठी झेप घ्यावी लागणार आहे. त्यासाठी कोल्हापूरने पुण्या, मुंबईशी स्पर्धा न करता जगाशी स्पर्धा करण्याचा निश्चय केला पाहिजे. ज्ञानाची कास धरत आजवर कोल्हापूरकरांनी 'कर लो दुनिया मुठ्ठी में...' हा मंत्र जोपासला आहे. स्टार्टअप कोल्हापूर ही संकल्पना बळकट करण्यासाठी सरकारने पुढाकार घेणे गरजेचे आहे. येथील उद्योग, व्यापारातील संघटनांनी एकत्र येऊन त्यावर विचारविनिमय करून आराखडा तयार करायला हवा. लोकप्रतिनिधींनीही स्थानिक राजकारणाला फाटा देऊन कोल्हापूरच्या विकासाला चालना देण्याबाबत विचार करावा. त्यासाठी जनतेच्या

लोकमत

चेतन नरके : चीनशी बरोबरी करण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करायला हवे

# भारत-चीनच्या ताणलेल्या संबंधांकडे संधी म्हणून पहा

मार्केटिंगचे तंत्रज्ञान अवगत करून 'सेंद्रिय'कडे वळा



मीडियाला 'ग्लोबल' विचारांची गरज

लोकमत

चर्चेतील व्यक्तीशी थेट संवाद

# चौकटबद्ध विचार बदलल्यास मोठ्या संधी

संडे स्पेशल मुलाखत

ही बलस्थाने

मानसिकता बदला

# भारत - थायलंड व्यापारसेतू बांधणार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

थायलंडचे वाणिज्य सल्लागार चेतन नरके यांची माहिती

# कोल्हापुरातील उद्योजकांना थायलंडमध्ये गुंतवणुकीची सं

भारत-थायलंडमध्ये १०० कोटींचे करार : चेतन नरके यांची म



# थायलंडला निर्यातीची कोल्हापूरला संधी



START UP कोल्हापूर

वाणिज्य सल्लागार चेतन नरके यांची माहिती

# शीतकरण उद्योगामध्ये मोठ्या संधी : चेतन नरके

'रेफकॉन २०२०' परिषद उत्साहात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शीतकरण आणि शीतकरण साखळी यांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या तंत्रज्ञ, अभियंते आणि व्यावसायिक सल्लागार यांना मोठी संधी आहे. याचा लाभ घ्यावा, यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन थायलंड सरकारचे व्यापार आणि वाणिज्य सल्लागार चेतन नरके यांनी दिले.

... 'रेफकॉन २०२०' या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. हॉटेल सयाजी येथे बुधवारी हा कार्यक्रम झाला. परिसंवादात गोकुळ दूध संघाचे कार्यकारी संचालक डी. व्ही. घाणेकर, एस. एस. साने, डॉ. प्रशांत इनामदार, हर्षल सुर्वे, प्रसाद वारियर यांनी मार्गदर्शन केले. ईशरे पुणे चॅप्टरचे अध्यक्ष नंदकुमार माटोडे स्वागत, सांगली चॅप्टरचे सुरेश पाटील यांनी प्रास्ताविक केले.



कोल्हापूर : 'रेफकॉन २०२०' परिषदेत मार्गदर्शन करताना चेतन नरके.



## कोल्हापूर-थायलंड विकासासाठी प

कोल्हापूर आणि थायलंड हे परस्परांच्या विकासासाठी ठरू शकतात. उद्योग, व्यापार, पर्यटन, शिक्षण, संशोधन अनेक क्षेत्रात दोन्हीकडील लोकांना एकत्र येऊन काम क संधी आहे. विशेषत: फाउंड्री क्षेत्रात कोल्हापुरातील उद्योग आणि थायलंडच्या फाउंड्री उद्योगात देवाण होऊ शकते. शिक्षण आणि संशोधनाच्या पातळीवर शिवाजी विद्यापीठाशी कर शकतात. यातून संशोधनाला चालना मिळू शकते. थायलंड आणि महाराष्ट्र सर पातळीवर व्यापार, उद्योगातील देवाण-घेवाणीचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र आणि थायलंड सरकारमध्ये लवकरच महत्त्वाची बैठक होणार आहे. याचा कोल्हापूरला होऊ शकतो.

- चेतन नरके, थायलंड सरकारचे वाणिज्य स

# चेतन नरके यांची थायलंड देशाच्या वाणिज्य सल्लागारपदी निवड



# भविष्यातील उपक्रम

अरुण नरके फौंडेशन गेली २६ वर्षे स्पर्धा परीक्षेतील उच्च गुणवत्ता बरोबरच विविध सामाजिक उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा कायम प्रयत्न करीत आलेले आहे पण या वटवृक्षाचा कार्यविस्तार बदलत्या काळानुसार बदलत्या परिस्थितीत नविन तंत्रज्ञानानुसार महाराष्ट्राबरोबरच देश–विदेशात होणे अत्यंत गरजेचे आहे यासाठीच संस्था पुढील क्षेत्रात उपक्रम राबवण्यासाठी प्रयत्नशील आहे.

- कला
- क्रीडा
- नियोजन
- कृषी पर्यटन
- शिक्षण
- स्पर्धा परीक्षा
- कौशल्य विकास
- महिला व बालकल्याण
- कौटुंबिक
- उद्योग व व्यापार व्यवसाय
- वाणिज्य व व्यापार
- दुग्ध व पशुसंवर्धन
- दिव्यांग
- वाङ्मय
- मुद्रण
- डिजिटल तंत्रज्ञान
- सामाजिक न्याय
- वित्त
- आरोग्य
- आदिवासी
- वृद्धाश्रम
- सहकार
- तृतीयपंथी
- निर्मिती
- अनाथालय
- धार्मिक

# भविष्यातील उपक्रम

अरुण नरके फौंडेशनने संस्थेची ध्येय आणि उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून भविष्यातील उपक्रमांचा विभागवार आराखडा तयार केला आहे या आराखड्यानुसार भविष्यातील उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. या लोककल्याणकारी उपक्रमांचा विभागवार गोषवारा पुढीलप्रमाणे

## शिक्षण

प्रशासनात ग्रामीण भागातील युवकांचा सहभाग व्हावा या हेतूने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापण्याचा निर्णय फौंडेशनच्या विश्वस्तांनी २७ वीस वर्षांपूर्वी घेतला होता. या केंद्राचा लाभ ग्रामीण भागातील युवकांना मोठ्या प्रमाणात झाला आहे. आजवर सुमारे ४६५० हून अधिक प्रशासकीय अधिकारी घडवण्याचे अतुलनीय कार्य फौंडेशनने केले आहे. याच कार्याचा विस्तार महाराष्ट्रातील ग्रामीण व निमशहरी भागात करण्याचे फौंडेशनने ठरविले आहे. त्याच बरोबर ग्रामीण भागातील अंगणवाड्या सक्षम करणे आमची बालवाडी हा प्रकल्प शहरी झोपडपट्ट्यांमध्ये पुन्हा नव्याने सुरू करणे, दहावी–बारावीनंतर शास्त्रोक्त पद्धतीने करिअर मार्गदर्शन व समुपदेशन करणे, विविध क्षेत्रात संशोधन करणे, संशोधनास प्रोत्साहन देणे, देशी–विदेशी विद्यापीठांबरोबरच्या भागीदारीने उद्योजकता व कौशल्य विकासाचे तसेच इतर विभागातील अल्पमुदतीतील प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचे अरुण नरके फौंडेशनने ठरविले आहे.

## कला

विविध कलांच्या वाढीसाठी व कलेच्या प्रचार–प्रसारासाठी कला प्रदर्शनाचे आयोजन करणे कलाक्षेत्रातील उदयोन्मुख कलाकारांना सन्मानित करणे त्यांना प्रोत्साहन देणे

## क्रीडा

कोल्हापूरचे वैशिष्ट्य असणाऱ्या कुस्ती, फुटबॉल, कबड्डी या खेळाचे सामने भरवणे तसेच गुणवंत खेळाडूंना शास्त्रोक्त पद्धतीने प्रशिक्षण देणे, गौरव करणे.

## कामगार कल्याण

कामगार कल्याणाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी शासनाच्या कामगार कल्याण मंडळ तसेच शासनाचे इतर समुचित प्राधिकृत संस्थांना सहकार्य करणे.

## कौशल्य विकास व उद्योजकता

देशी, विदेशी विद्यापीठांसमवेत सामंजस्य करार याद्वारे कौशल्य विकास व उद्योजकता या विषयावर अल्पमुदतीतील अभ्यासक्रम चालू करणे.

# भविष्यातील उपक्रम

## अपंग व कल्याण पुनर्वसन

परीसरातील दिव्यांगांचे सर्वेक्षण करणे, माहिती गोळा करणे, शासन व
या क्षेत्रातील सेवाभावी संस्थांशी समन्वय साधत अपंग कल्याण व पुनर्वसन क्षेत्रात योगदान देणे.

## महिला व बालकल्याण

महिलांच्या बाबतीत कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ या विरोधात भूमिका घेणे, त्यासाठी समुपदेशन केंद्राची निर्मिती करणे, प्रबोधन करणे, स्त्री–पुरुष समानतेच्या प्रचार प्रसारासाठी पथनाट्य, लघुपट, व्याख्याने याद्वारे प्रयत्नशील राहणे, महिला बचत गटांना स्वयंरोजगार व गृह उद्योगाचे प्रशिक्षण तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, बालकांच्या हक्का संबंधी दक्ष राहणे, कुपोषणावर मात करण्यासाठी स्तनदा माता व बाल पोषण आहार उपक्रमांमध्ये योगदान देणे, बालकामगार बालकांचा शारीरिक व मानसिक तसेच लैंगिक छळ या विरोधात भूमिका घेणे, त्यासाठी समुपदेशन व सहाय्यता केंद्राची उभारणी करणे यासारख्या संस्थांच्या व शासनाच्या तसेच इतर संस्थांच्या संयुक्त उपक्रमात सहभागी होणे, लहान मुले व स्त्रियांसाठी कल्याणकारी योजना राबवणे.

## युवा युवतींना स्वावलंबी बनविणे

शाळेत न जाणाऱ्या मुला–मुलींना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करून त्यांच्या स्वतःच्या पायावर त्यांना उभे राहता यावे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

## ग्राम विकास

कृषी व कृषिपूरक व्यवसायाच्या वाढीसाठी प्रयत्न करणे, प्रक्रिया उद्योगांसाठी ग्रामीण भागातील तरुणांना मार्गदर्शन करणे, गावे अधिकाधिक स्वयंपूर्ण होतील या दृष्टीने प्रयत्न करणे, ग्राम विकासाचा नियोजनबध्द आराखडा तयार करणे, हा आराखडा कार्यान्वित होण्यासाठी प्रयत्नशील राहणे शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणे.

## शहरी विकास

दिवसेंदिवस बकाल होत जाणाऱ्या शहरांमध्ये नव्याने प्राण फुकण्यासाठी विकासाचा सर्वसमावेशक आराखडा बनविण्यात पुढाकार घेणे, झोपडपट्ट्यांचा विकास करण्याकामी शहरी प्रशासनास सहकार्य करणे, शहरी नियम आर्थिक गटातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

# भविष्यातील उपक्रम

## सामाजिक न्याय

समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांना वाचा फोडत सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी भूमिका निभावणे, सामाजिक न्याय अशा गंभीर प्रश्नांमध्ये हस्तक्षेप करीत सामाजिक जबाबदारी निभावणे, सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विविध प्रकल्प, उपक्रम यांचा कृती आराखडा तयार करणे व त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, शासन व इतर सामाजिक संस्थांबरोबर सहकार्य करणे.

## पर्यावरण

अनेक कारणांनी होणारे जल प्रदूषण कमी करण्यासाठी पुढाकार घेणे, वायू व ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी समाजात जनजागृती निर्माण करणे, वृक्षलागवड व संवर्धन करणे.

## साहित्य भाषा व सांस्कृतिक कार्य

साहित्य, भाषा व संस्कृतीच्या संदर्भाने प्रासंगिक उपक्रम राबवणे व त्या कामी प्रोत्साहन देणे.

## अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

अन्न व इतर नागरी पुरवठा अधिक प्रभावी व अधिक उत्पादन व्हावा यासाठी शासनाबरोबर काम करणे, ग्राहकांना याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

## अल्पसंख्यांक विकास

विविध अल्पसंख्यांक प्रकारातील समूहांना भारतीय संविधानातील तरतुदी प्रमाणे अल्पसंख्यांकांच्या हक्कांबाबत दक्ष राहत त्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील राहणे.

# भविष्यातील उपक्रम

## नियोजन

केंद्र, राज्य, जिल्हा, शहर व गाव पातळीवरील नियोजन विषयक कामकाजात शासनाबरोबर भागीदारी करणे.

## विधी व न्याय

ग्रामीण व शहरी भागातील तंटे आपापसातील वाटाघाटीने, सामोपचाराने मिटवण्यासाठी शासनाच्या लोकअदालती सारख्या उपक्रमांना लोकांपर्यंत पोहोचविण्यास सहाय्य करणे, जिल्हा विधी सेवा केंद्राच्या सहाय्याने मोफत विधी सेवेचा लाभ गरजूंना होण्यासाठी प्रयत्न करणे.

## कौटुंबिक विसंवाद

विवाहत्तर कौटुंबिक संबंध सुरळीत राहावेत यासाठी वस्ती पातळीवर जाऊन मार्गदर्शन करणे, सामंजस्याने मार्ग काढणे, योग्य सल्ला देणे व जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी शिबिरे घेणे

## आरोग्य

ग्रामीण व दुर्लक्षित वाडयावस्त्यांवर आरोग्य विषयक शिबिरे घेणे तसेच शासनाच्या आरोग्य विषयक विविध योजना पोहोचवणे.

## आदिवासी व भटके-विमुक्त विकास

आदिवासी व भटके-विमुक्त यांच्यापर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचवून त्यांना त्यांचा नैसर्गिक हक्क मिळवून देण्यासाठी कार्य करणे

# भविष्यातील उपक्रम

## माहिती तंत्रज्ञान व विदा

सार्वजनिक जीवनातील अनेक गोष्टींमध्ये सहजता, सुलभता यावी व त्या वेगवान व्हाव्यात यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग निर्माण करण्याचे तसेच लोककल्याणासाठी विदा गोळा करून तो जतन करण्याचे, त्याचे विश्लेषण करून कल्याणकारक प्रारूप बनवण्याचे व त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करण्याचे अरुण नरके फौंडेशनने ठरविले आहे.

## माध्यम विकास

माध्यम क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्याची भूमिका संस्थेने घेतली आहे. फेक न्यूज मुळे मुख्य प्रवाह इलेक्ट्रॉनिक व इतर माध्यमांची डागाळलेली प्रतिमा, कमी झालेली विश्वासार्हत, माध्यमांतील राजकीय हस्तक्षेप, खाजगी मालकी, जनतेप्रती उत्तरदायित्व नसणे इत्यादी अनेक कारणांमुळे आज कधी नव्हे इतक्या प्रकर्षाने लोकांप्रती उत्तरदायित्व असणाऱ्या पारदर्शक, निर्भीड व लोकाभिमुख माध्यमाची गरज आहे त्यामुळे माध्यम क्षेत्रात प्रवेश करण्याचे अरुण नरके फौंडेशनने ठरवले आहे. त्याच बरोबर दर्जेदार लघुपट व माहितीपट यांची निर्मिती करण्याचे नियोजित आहे.

## पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास

आधुनिक अधिक उत्पादक पद्धतीच्या पशुसंवर्धनाविषयी चे शिक्षण पशुपालकांना देणे, यासंदर्भातील सोयी उपलब्ध करून देण, दुग्ध व्यवसायात आधुनिकता व उत्पादकतेला चालना देणारे उपक्रम राबवणे, मत्स्य व्यवसायाबाबत तरुणांना शिक्षित करून व इतर अर्थसहाय्यासाठी सहकार्य करणे, रोजगाराद्वारे शेतीवरील अतिरिक्त भार कमी करण्याचा प्रयत्न करणे.

## सहकार

सहकार्य संकल्पनेचा तरुणांमध्ये प्रचार–प्रसार आणि विस्तार करणे, आधुनिक व्यवसाय सहकारी तत्त्वावर चालवण्यासाठी प्रोत्साहन देणे, एका स्वतंत्र विभागाद्वारे या संदर्भातील मार्गदर्शन करणे.

# भविष्यातील उपक्रम

## शैक्षणिक क्षेत्रातील नव्या दिशा

शैक्षणिक क्षेत्रामध्ये संगणक व मल्टिमीडिया व इंटरनेट चा वापर करुन क्रांतिकारक बदल घडवून आणता येणे शक्य आहे. यासाठी ई–लर्निंग, ऑनलाईन शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून विविध ऑनलाईन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

## बालवाडी प्रकल्प विकास

पूर्ण कोल्हापूर जिल्ह्याचा सर्वे करून ३ ते ६ वर्षे वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या मुलांसाठी बालवाड्या सुरू करणे, दरवर्षी १–२ तालुके याप्रमाणे येत्या दहा वर्षांत कोल्हापूर जिल्हा कव्हर करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

## प्रज्ञाशोध परीक्षा मार्गदर्शन

शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या धर्तीवर हे मार्गदर्शन वर्ग चालवले जातील त्यासाठी प्रशिक्षित अनुभवी मार्गदर्शक मिळणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

## शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन

शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ऑनलाईन / ऑफलाईन शैक्षणिक पद्धतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा मानस आहे.

# आव्हाने

संस्थेच्या २६ वर्षाच्या इतिहासामध्ये असंख्य आव्हाने आली. त्या सर्व आव्हानांना पार करून संस्थेने आपला एक वेगळा नावलौकिक कमविलेला आहे. या स्पर्धेच्या युगामध्ये टिकायचे असल्यास बदलत्या परीस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करणे हेच मोठे आव्हान आहे. संस्थेसाठी काम करणाऱ्या अनुभवी लोकांचे मार्गदर्शन घेवून येणाऱ्या सर्व आव्हानांचा योग्य रीतीने सामना करणे सोयीस्कर जाईल यात तीळ मात्र शंका नाही. संस्थेच्या प्रगतीचा चढता आलेख पाहता त्यामध्ये सातत्य ठेवणे हे मोठे आव्हान आहे. पुणे आणि मुंबई या बरोबरच विदेशात कार्यविस्तार करताना तेथील स्पर्धात्मक संस्थांचा अभ्यास करून संस्थेचा कार्यविस्तार वाढवणे हे मोठे आव्हान आहे.

विद्यार्थी व सर्वसामान्य जनता हाच केंद्रबिंदू मानून काम करणारी आपली संस्था असून त्यांच्यासाठी नवनविन अद्ययावत माहिती पुरवठा हे देखील एक आव्हान आहे. एम.पी.एस.सी. वारंवार आपल्या परीक्षा पध्दतीमध्ये बदल करीत आहे. त्यामध्ये अभ्यासक्रम व गुणदान पध्दत यांचा विशेषकरून समावेश आहे. यानुसार बरेच बदल करणे हे देखील एक आव्हान आहे. तसेच काही आव्हाने ही परीस्थितीजन्य सुध्दा असू शकतात. उदा. पूरपरीस्थिती, कोरोना विषाणू या कालावधीमध्ये स्पर्धापरीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्याचे काम करणे हे देखील मोठे आव्हान आहे. त्याचबरोबर संस्था, संस्थेतील सर्व कर्मचारी वृंद, समाजातील वंचित घटक यांचे जीवनमान उंचाविणे हे देखील तितकेच मोठे आव्हान आहे.

गेली २६ वर्ष अरुण नरके फौंडेशन फक्त स्पर्धा परीक्षा या एकाच क्षेत्रामध्ये काम न करता अनेक क्षेत्रांमध्ये आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविलेला आहे. संस्थापक मा. अरुण नरके साहेब यांच्या दूरदृष्टीतुन उभा राहिलेली ही संस्था गेली २६ वर्षे आपल्या कार्याच्या जोरावर एका विशिष्ट उंचीवर पोहचली आहे. संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन अरुण नरके साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार संस्थेची वाटचाल योग्यरीतीने सुरू आहे. संस्थेचे विकास अधिकारी मा. शशिकांत सुतार यांचे देखिल संस्थेच्या भरभराटीस मोलाचे योगदान आहे.

एकंदरीत अरुण नरके फौंडेशनच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे देखील कष्ट संस्थेच्या प्रगतीमध्ये महत्वाचे आहे.

*एक समृध्द भारत निर्मितीसाठी, युवकांच्या कल्याणासाठी,*
*सामान्य जनतेच्या सेवेसाठी, मानवहितांसाठी सदैव सेवा देण्यात*
*अरुण नरके फौंडेशन कायम वचनबध्द आहे.*

# समारोप

सामाजिक क्रांतीचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची विचार पताका, सहकार आणि कृषी क्षेत्रातील आपल्या योगदानाने श्री अरुण नरके साहेबांनी गेली कित्यके वर्षे तेवत ठेवली आहे. याच विचारांतून अरुण नरके फौंडेशनच्या माध्यमाद्वारे पूर्व प्राथमिक शिक्षण, स्पर्धा परीक्षा, महिला नेतृत्व विकास, कृषी, सहकार, कला, क्रीडा, अपंग कल्याण व पुनर्वसन इत्यादी क्षेत्रांमध्ये भरीव कार्य उभे राहिले. आज अरुण नरके फौंडेशनने सामाजिक क्षेत्रातील कार्याचा २६ वर्षाचा एक मोठा टप्पा पूर्ण केला आहे. गेली २६ वर्षे समाजोन्नतीसाठी काम करीत असताना, घेतलेल्या अनेक अनुभवांचे गाठोडे संस्थेच्या पुढील प्रवासात दिशादर्शक ठरणार आहे. संस्थेने सामाजिक जीवनाच्या प्रत्येक आघाडीवर व्यापक अंगाने मूलभूत कार्य करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी २४ विभागांची नव्याने प्रस्थापना केली असून, त्या प्रत्येक विभागांतर्गत अनेक प्रकल्प प्रस्तावित आहेत. अरुण नरके फौंडेशनची धुरा ज्येष्ठ मंडळीनी आता नव्या पिढीकडे सुपूर्द केली आहे.

उच्च विद्याविभूषित असणारे आणि अनेक देशातील आघाडीच्या कंपन्यांमधील व्यवस्थापन कार्याचा मोठा अनुभव असणारे संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. चेतन अरुण नरके जागतिक भान असणारे, नव्या दमाचे आणि आश्वासक असे नेतृत्व पुढे आले आहे. त्यांच्या नेतृत्वात अरुण नरके फौंडेशन आपला विस्तार करीत आहे. स्थापने वेळी संस्थापकांनी पाहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी विद्यमान अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ जोरदार वाटचाल करीत आहेत. वेळोवेळी संस्थेच्या जेष्ठ शिलेदारांचे मार्गदर्शन घेत व समाजातील मान्यवर व्यक्तींशी संवाद साधत संस्थेची जडण घडण सुरू आहे. अरुण नरके साहेबांचा मित्र परीवार व संस्थेचे अनेक हितचिंतक यांचे योगदान नेहमीच महत्वपूर्ण ठरत आले आहे. समाजाची नेमकी गरज लक्षात घेत अधिक चांगली सेवा देण्यास नेहमी तत्पर असणारा कर्मचारीवर्ग अरुण नरके फौंडेशनचे एक महत्वाचे अंग राहिला आहे. संस्थेच्या अनेक लाभार्थ्यांनी देखील जनमानसात संस्थेची चांगली प्रतिमा निर्माण करण्यास हातभार लावला आहे.

या लाभार्थ्यांचे संस्थेशी असणारे जिव्हाळ्याचे नाते, संस्था आणि समाजाच्या प्रगतीत हातभार लावणारे आहे. अरुण नरके साहेबांच्या कार्याची पुण्याई, समाजाप्रती असणारा जिव्हाळा, नवनिर्मितीचे प्रामाणिक प्रयत्न, विद्यमान अध्यक्ष चेतन नरके साहेबांचे जागतिक भान असणारे उमदे नेतृत्व, ही कोल्हापूरची पुरोगामी भूमी आणि या भूमितील मायबाप जनतेच्या पाठबळावर एकविसाव्या शतकातील तिसऱ्या दशकात पदार्पण करीत असताना येणाऱ्या नव्या आव्हानांचे आभाळ पेलण्यास संस्था सदैव सज्ज आहे!

# अभिप्राय


- मान्यवरांचे अभिप्राय
- यशवंतांची यशोगाथा
- कर्मचारी मनोगते

# मान्यवरांचे अभिप्राय

ARUN NARKE FOUNDATION

ANF

मानवता हिताय तत्परम्



INWARD NO.
DATE:

MAHAROGI SEWA SAMITI, WARORA

at & Post: ANANDWAN,
via warora, 442 914
dist. Chandrapur Maharashtra
Phone : 07176-82034/82425

दिनांक
२८-७-९७

श्री अरुण नरके

सस्नेह

आपले पत्र मिळाले. महिला नेतृत्व व कार्यकर्ता विकसनाच्या संदर्भात आपण सुरु केलेले अभियान अत्यंत स्तुत्य कौतुकास्पद आहे.

महिलांतील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांना समाजोन्मुख करणे ही काळाची गरज आहे. आपण केलेल्या सुचना विचाराधीन आहेत. आवश्यक ते संपर्क साधल्यावरच त्याबाबतीत निश्चीत मार्गदर्शन करु शकु.


आपल्या या अभिनव उपक्रमास आमच्या शुभेच्छा व शुभकामना

विनीत

for (signature)

DR. VIKAS AMTE
Medical Superintendent
Maharogi Sewa Samiti, Warora
ANANDWAN – 442 914
Via Warora
Dist : Chandrapur
Maharashtra – India

INWARD NO 69
DATE:- 1-8-97




| Date | Name & Address | Remarks |
|---|---|---|
| | या फाउंडेशनच्या व्यासपीठावरून बोलण्यासाठी इथे आले पण न बोलता फाउंडेशन करत असलेलं काम समजले तेव्हा फार बरं वाटलं. उत्तम व्यवस्था, नेटके, सुसंस्कृत व्यक्तिमत्वांचा सुनियोजित वावर, आगत्यशील आतिथ्य आणि उत्सुक श्रोते – असा अनुभव नेहमी येत नाही. सुनीताताईंच्या स्मृतीला विधायकपणे जपणारा हा कार्यक्रम असाच साजरा होत रहावा आणि फाउंडेशनच्या कामालाही अनेकांचा सहभाग असावा, हीच शुभेच्छा. (signature) | |

| Date | Name & Address | Remarks |
|---|---|---|
| 1/3/12 | PARESH. PANDYA. C/95 Karmchari Nagar. Part I Ghatlodia. Ahmedabad: 380061 | You are doing wonderful job - helping students to make their career. Really appreciable. Sugg: Have internet facilities to your students. (signature) |

| Date | Name & Address | Remarks |
|---|---|---|
| 9-3-06 | नीला सत्यनारायण. | फाऊंडेशनचा उपक्रम स्तुत्य आहे. कस्तीरवासियांनाही धन्यवाद. आजचा संवाद खूप रंगला. नीला सत्यनारायण 9.3.06 |

| Date | Name & Address | Remarks |
|---|---|---|
| | अरुण नरके फाउंडेशनतर्फे आज सुनीताताईंच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान देण्यासाठी आले होते. फार छान अनुभव. सुविहित व्यवस्था. उत्तम श्रोतृवर्ग. उत्सुक, क्रियाशील कार्यकर्ते सर्वांचा दुर्मिळ प्रत्यय आला. संस्मरणीय कार्यक्रम. फाउंडेशनच्या विविधरंगी कार्याला मनःपूर्वक शुभेच्छा. वीणा देव २ मार्च २०१० | |

# मान्यवरांचे अभिप्राय



| Date | Name & Address | Remarks |
| --- | --- | --- |
| 7th Feb 98 | | The institute from the beginning is well equipped with the lecture rooms, a small but selected in fact a classic library. And the guidance of Mr. Sachin Ghatage, with all time enthusiastic and really knowledgeable person, I am very confident that he will take the institute to the TOP very soon. And it will be a No. 1 institute for competitive exams. AVINASH R. HADGAL PROB. TAHASILDAR |

| Date | Name & Address | Remarks |
| --- | --- | --- |
| | सुनीलकुमार लवटे | अरुण नरके फौंडेशनच्या एका कौतुक समारंभाच्या निमित्ताने स्पर्धात्मक जीवनाची नवी धडपड नि दृष्टी पाहून आनंद झाला. आपली संस्था करत असलेले कार्य एकविसाव्या शतकाच्या दृष्टीने अधिक उपयोगी वाटते. आजच्या अनुदानित शिक्षण संस्था अनुदार झाल्याने असा लोकस धडपडींच्या केंद्रांचे महत्त्व आगळे! अभिनंदन! सुनीलकुमार |


| Date | Name & Address | Remarks |
| --- | --- | --- |
| 5/7/2002 | Prof. M. G. Takwale, Vice-chancellor Shivaji University, KOLHAPUR | संस्थेस आज भेट दिली. एम पी एस सी व इतर स्पर्धा परिक्षांसाठी विद्यार्थी तयार करण्याचा प्रयत्न या संस्थेमार्फत करण्यात येतो. हे कार्य अत्यंत महत्त्वाचे व विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे. त्या बद्दल संस्थेचे अभिनंदन व कार्यास शुभेच्छा. M G Takwale |

| Date | Name & Address | Remarks |
| --- | --- | --- |
| 5.9.02 | Malia Quenault 227 Brighton Road Sandgate Queensland Australia | Many thanks for opportunity to meet you and observe the you do it has been use to me in my s… |

# मान्यवरांचे अभिप्राय

ARUN NARKE FOUNDATION


मानवता हिताय तत्परम्



सौ. माधवी घारपुरे

माननीय श्री. अरुणजी,
काय लिहू ? मन भरून येतं
तेव्हा शब्द मुके होतात. स्त्रियांच्या
हितासाठी आपल्या फाउंडेशनने
हाती घेतलेल्या कार्यास फक्त
शुभेच्छा देते कारण मला माहीत आहे
की ----
सतत चालणाऱ्या पावलांना,
रस्ता नेहमीच थिटा वाटतो.
काम करणाऱ्या हातांना
परमेश्वर हसरी दाद देतो.
माधवी
'ध्यास' २ मार्च २००५

# मान्यवरांचे अभिप्राय



# यशवंतांची यशोगाथा

अरुण नरके फौंडेशनच्या माध्यमातून
स्पर्धा परीक्षांमधून तावून सुलाखून यशस्वी झालेल्या

## ‘यशवंतांची यशोगाथा’

त्यांच्याच शब्दात!



**शर्मिला मिस्कीन** (राज्यकर उपायुक्त, सांगली)

अरुण नरके फौंडेशनमध्ये अभ्यासाला पोषक वातावरण होते. त्यामुळे सगळे घडत गेले. आज मला शासकीय सेवा करण्याचे भाग्य मिळाले ते अरुण नरके फौंडेशन मुळेच!



**सतीश शिंदे** API (LCB) इचलकरंजी

ग्रामीण भागातील तरुणांचे अधिकारी होण्याचे स्वप्न मला फौंडेशनमुळे पूर्ण करता आले. मी स्वतः अधिकारी झालो त्याचे पूर्ण श्रेय फौंडेशनचे आहे. विद्यार्थ्यांना सुसज्ज ग्रंथालय, अभ्यासिका, उत्तम मार्गदर्शन अत्यंत माफक फी ठेवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम अरुण नरके फौंडेशन करत आहे.

# यशवंतांची यशोगाथा



## वैशाली काशीद (राज्यकर उपायुक्त, कोल्हापूर)

आज मला या खुर्चीवर जो मान रुबाब ऐश्वर्य जे मिळाले ते अरुण नरके फौंडेशनमुळे! ज्या ज्या वेळेला जे जे लागेल ते विद्यार्थ्यांना पुरवण्याचे काम अरुण नरके फौंडेशनने केले, मला अभिमान आहे. मी अरुण नरके फौंडेशनची पहिली विद्यार्थिनी क्लासवन अधिकारी झाले आहे.



## शिवराज बंडोपंत नाईकवडे (अधिक्षक, धर्मादाय सहआयुक्त कार्यालय कोल्हापूर)

ज्या काळात स्पर्धा परीक्षांची काही माहिती नव्हती. त्याकाळात अरुण नरके फौंडेशनने मोठ्या प्रमाणात पुस्तके उपलब्ध करून दिली. सुरुवातीला जेव्हा मार्गदर्शनाची आवश्यकता होती तेव्हा अरुण नरके फौंडेशनमध्ये बेसिक पक्के करण्यासाठी मदत झाली. इथूनच पाया मजबूत झाल्यामुळे आम्ही या पदापर्यंत पोहोचू शकलो.



## उदयसिंह पांडुरंग सरनाईक (गटविकास अधिकारी शाहुवाडी)

स्पर्धा परीक्षांची तयारी अरुण नरके फौंडेशनमध्ये केली. माझ्या यशात अरुण नरके फौंडेशनचा खूप मोठा वाटा आहे विशेष म्हणजे फौंडेशनचे ग्रंथालय आणि अभ्यासिका यांचा खूप मोठ्या प्रमाणावर उपयोग झाला. मी जे गटशिक्षण अधिकारी पद म्हणून कार्यरत आहे ते शंभर टक्के अरुण नरके फौंडेशन मुळेच!

# यशवंतांची यशोगाथा



## सुधीर सुभाष पाटील

**उपजिल्हाधिकारी (गट-अ) राज्यात दुसरा क्रमांक**

**इतर निवड-** STI, ESI

जून २०१५ पासून राज्यसेवा परीक्षेची तयारी सुरू होती. अरुण नरके फौंडेशनमध्ये यावेळी प्रवेश घेतला. याचा मला खूप उपयोग झाला.

योग्य प्रकारे पूर्वतयारी करून नियोजन बध्द वाटचाल केल्यास आणि त्याला भरपूर सरावाची जोड दिल्यास, कमीत कमी वेळात मोठे यश मिळू शकते. फक्त प्रयत्न करण्याची गरज आहे.

***वक्त भी झूक जायेगा, तू कदम तो बढा कर देख.....***
***सफलता मिलकर रहेगी, तू एक जुनून जगा के तो देख!***



## उदय पाटील पी.एस.आय.(राज्यात दुसरा)

माझा यशामध्ये अरूण नरके फौंडेशनचे खूप सहाकर्य लाभले. वैयक्तिक प्रशिक्षण झाले. मुलाखती सरावासाठी दरवेळी वेगवेगळे पोलीस प्रशासनातील अधिकारी होते. त्यातून खूप काही शिकायला मिळाले त्यामुळेच PSI पदी राज्यात दुसरा क्रमांकाने निवड झाली.



## सुरज उदय पाटील Specialist officer (Agriculture field officer) BOI

माझा हा पहिलाच प्रयत्न होता. आई–वडीलांचा आशिर्वाद अथक परीश्रम आणि नियोजनरीत्या अभ्यास ही यशाची त्रिसुत्री अरुण नरके फौंडेशनच्या माध्यमातुन गवसली. मुलाखतीसाठी विशेष सहकार्य केल्यामुळे हे यश खुपच सोप्पे झाले. मला लाभलेल्या या मोलाच्या मार्गदर्शनाबद्दल मी अरूण नरके फौंडेशनचा शतशः ऋणी आहे. धन्यवाद!

# यशवंतांची यशोगाथा



## **सौ. राणीताई शिवाजीराव पाटील** (अधिव्याख्याता DIET)

आम्हा शेतकऱ्यांच्या मुलींना अधिकारी होण्याचे स्वप्न साकार करण्यामध्ये अरुण नरके फौंडेशनने सिंहाचा वाटा उचलला आहे, फौंडेशनचे शतशः आभार. अधिकारी होण्याचे स्वप्न कोणत्याही वयात साकार होऊ शकते ते फौंडेशनमध्ये आल्यानंतर कळाले व मेहनत करण्याचे बळ मिळाले अरुण नरके फौंडेशनच्या सहकार्यास अभिनंदन!



## **सोनी सदाशिव शेट्टी (PSI)** राज्यात ३ री

आज मी अधिकारी पदापर्यंत पोहोचले ते फक्त अरुण नरके फौंडेशनमुळेच! स्पर्धा परीक्षेतील अडचणीवर मात करताना मी संयम राखून ठेवला. मला आत्मविश्वास देण्याचं अपयशातून पुन्हा जोमाने उठून स्पर्धा परीक्षा देण्यासाठी प्रेरीत केले. माझे अरुण नरके फौंडेशनमधील गुरु आणि स्टाफ यांचे मनःपूर्वक आभार!



## **रामलिंग सूर्यवंशी (Excise PSI)**

अरुण नरके फौंडेशनचे प्राध्यापक वृंद खरंच खूप मेहनतीने प्रत्येक विद्यार्थ्याकडून स्पर्धापरीक्षेची तयारी करून घेतात. तसेच फौंडेशनने माफक दरामध्ये चालू केलेल्या ओजस निकेतन लायब्ररीत मला खूप फायदा झाला. माझ्या यशामध्ये फौंडेशनचा वाटा अमूल्य आहे.

# यशवंतांची यशोगाथा



## दीपक आनंदा माने (PSI)

माझ्या एम.पी.एस.सी.च्या वाटचालीमध्ये अरुण नरके फौंडेशनचा मोलाचा वाटा आहे. विशेषतः गरीब कुटुंबातील मुलांना माफक फी मध्ये योग्य मार्गदर्शन देण्याचे काम फौंडेशन करत आहे. त्या बद्दल विशेष आभार. विशेष म्हणजे अधिकाऱ्यांकडून आमच्या मुलाखती झाल्या व त्याचा मला जास्त फायदा झाला.



## अमोल जगन्नाथ पाटील (PSI)

स्पर्धा परीक्षेमध्ये अभ्यासाबरोबर मुलाखतीची तयारी महत्वाची असते. त्याची परिपूर्ण तयारी अरुण नरके फौंडेशनमध्ये करून घेण्यात आली. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी राहील. अरुण नरके फौंडेशन अभ्यासासाठी परिपूर्ण असे फौंडेशन आहे. तरी विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग करिअर घडवण्यासाठी करावा.



## प्रणाली संजय पाटील (लिपिक महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ)

सर्वप्रथम मी अरुण नरके फौंडेशनचे मनापासून आभार मानते. मी अरुण नरके फौंडेशनमध्ये २०१७ ला बँकिंगची IBPS P.O. च्या बॅचला ॲडमिशन घेतल होते. या क्लासचा मला खूप फायदा झाला. येथील शिक्षक व शिक्षकेत्तर स्टाफने मला येथे शिक्षण घेण्यात तसेच Study Room मध्ये Study करण्यात खूपच मदत केली. त्यामुळे मी इथे खूप Comfortable Study करू शकले. तसेच आज जे यश मला मिळाले त्यात माझ्या आई–वडीलांच्या सोबतच अरुण नरके फौंडेशनचाही मोलाचा वाटा आहे. शेवटची फक्त एवढच म्हणेन Thank you so much for everything.

# यशवंतांची यशोगाथा



## वर्षाराणी पाटील (बँक ऑफ इंडिया, क्लार्क)

बँकिंग चा अभ्यास करताना मला अरुण नरके फौंडेशनमधील सर्व स्टाफ ने खूप मदत केली वेळोवेळी बँकिंग टर्म आणि बेसिक कन्सेप्ट क्लिअर केल्या. स्टडीरूम मधील वातावरणामुळे अभ्यासात उत्साह निर्माण झाला आणि त्यामुळे मी फायनल सिलेक्शन पर्यंत पोहोचू शकले.



## रजनीगंधा येळापुरे (विजया बँक, क्लार्क)

मला दहावी नंतर दृष्टीमध्ये दोष आला. त्यामुळे माझे सर्व शिक्षण राईटर व ऑडिओ सीडीच्या माध्यमातून झाले आहे. माझे शिक्षण एम.ए. हिंदी त्याचबरोबर मी नेट व सेट सुद्धा पूर्ण केले आहे. शिक्षण घेत असताना मी स्पर्धा परीक्षेची तयारी करत होते. अरुण नरके फौंडेशनमध्ये मी प्रवेश घेतला आणि दोन महिन्यांमध्येच माझी विजया बँक क्लार्क पदी निवड झाली.

अरुण नरके फौंडेशनमधून मला खूप सहकार्य मिळाले. मी कुठेतरी कमी आहे याची जाणीव त्यांनी करून दिली नाही. माझ्या वेळेनुसार त्यांनी सहकार्य केले. माझ्या यशात अरुण नरके फौंडेशनचा फार मोठा मोलाचा वाटा आहे. समाजामध्ये माझ्यासारखी अंध अपंग मूकबधिर मुले आहेत अशा मुलांना सहकार्य करून पुढे न्या धन्यवाद!



## नरहरी रघुनाथ पाटील (माजी सैनिक)

मंत्रालय लिपिक, कर सहाय्यक, MSRTC क्लार्क, CID मधील फिंगरप्रिंट व हँड रायटिंग एक्सपर्ट

१९ वर्षे देशसेवा करून मी सेवानिवृत्त झाल्यानंतर अरुण नरके फौंडेशनमध्ये स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रवेश घेतला माझे वय ४२ वर्षे असून त्यात १९ वर्षे देशसेवा करून MPSC च्या माध्यमातून यश मिळवणे हे माझ्यासाठी चॅलेंज होते. अरुण नरके फौंडेशनमध्ये प्रवेश घेतल्यानंतर सर्व स्टाफ ने जो मला आत्मविश्वास दिला त्यामुळे ९ महिन्याच्या स्पर्धा परीक्षेतील परिश्रमानंतर आज मला ५ पोस्ट मिळाल्या. त्यामध्ये मंत्रालय लिपिक, कर सहाय्यक, MSRTC क्लार्क, CID मधील फिंगरप्रिंट व हँड रायटिंग एक्सपर्ट अशा ५ पोस्ट मिळवू शकलो. २०–२५ वर्षे मी MPSC च्या अभ्यासक्रमापासून दूर होतो आणि या वयात नवीन उमेदीने अभ्यास करण्यास उत्साह, आत्मविश्वास प्रेरणा दिली अशा अरुण नरके फौंडेशनच्या सर्व स्टाफचे मी आभार मानतो.

# यशवंतांची यशोगाथा



## प्रियांका रंगराव तावडे (BOI Clerk)

माझ्या आईवडीलांचा पाठिंबा, भावाची सोबत आणि अरुण नरके फौंडेशनचं मोलाचं असं मार्गदर्शन यामुळेच मी माझ्या या यशाला गवसणी घालू शकले. यासाठी बरोबर दोन वर्षाचं माझं अथक परीश्रम अरुण नरके फौंडेशनच्या सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाची खुप मदत झाली आणि त्यामुळेच बरोबर दीड वर्षाच्या अभ्यासातुन दोन पोस्ट काढू शकले. मला मिळालेल्या मोलाच्या अशा मार्गदर्शनाबद्दल मी शतशः ऋणी आहे. धन्यवाद!



## उर्मिला आबिटकर पोस्टल असिस्टंट

माझे मनोगत व्यक्त करण्यापूर्वी मी अरुण नरके फौंडेशनचे खूप आभार मानते कारण त्यांच्या अनमोल अशा मार्गदर्शनामुळे आम्ही आमच्या कुटुंबांमधील चौघेपण सरकारी नोकरी करत आहोत.

मी प्रथम म्हाडा ऑफिस मुंबईमध्ये फेब्रुवारी–२०१६ पासून लिपिक या पदावर कार्यरत होते. फेब्रुवारी–२०१८ मध्ये माझे पोस्टल सॉर्टींग असिस्टंट म्हणून सिलेक्शन झाले. यादरम्यान MPSC CLERK, पशुसंवर्धन विभाग परीचर, या परीक्षेतही यश मिळाले. मी डिसेंबर २०१४ मध्ये अरुण नरके फौंडेशनला प्रवेश घेतला फौंडेशनमध्ये शिक्षकांची शिकवण्याची पद्धत, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे तसेच गणित व बुद्धिमत्ता वरील प्रश्न सोडवण्याच्या ट्रिक्स, इंग्रजी विषयावरील दिले जाणारे सखोल तसेच बेसिक नॉलेज, आठवड्यातून घेतल्या जाणाऱ्या टेस्ट तसेच घरी सोडण्यासाठी दिले जाणारे गणिताचे प्रश्न असा सतत सराव घेतल्यामुळे विषय पक्के होण्यास मदत झाली. अभ्यासिकेची सोय, फौंडेशनमध्ये शिकवत असणाऱ्या सरांच्या अनमोल अशा मार्गदर्शनामुळे मी हे यश मिळवू शकले. तसेच घरातील सासू सासरे व माझे मिस्टर यांचा मला स्पर्धा परीक्षा देण्यासाठी खूप मोलाचा पाठिंबा आहे.

अरुण नरके फौंडेशनचे खूप आभार आणि तुम्हा सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी खूप शुभेच्छा ....

# यशवंतांची यशोगाथा



## भाग्यश्री बाळू कांबळे (PSI)

२०१७ पासुन एम.पी.एस.सी. चा अभ्यास करायला सुरूवात केली. आणि पहिलीच परीक्षा पास होऊन मी PSI झाले. प्रवास खडतर होता. पण अरुण नरके फौंडेशनच्या मदतीने तो पार करायला मदतच झाली. सर्व सरांनी खूप आत्मविश्वास दिला. मुलाखत उत्तमरीत्या घेतली. त्यामुळे याचा आयोगाच्या मुलाखतीवेळी चांगला उपयोग झाला . त्यामुळे मी सर्वांची ऋणी राहीन. धन्यवाद!



## विवेक पांडुरंग जाधव (जलसंधारण अधिकारी गट -ब)

मी अरुण नरके फौंडेशनचे प्रथमतः खूप आभार, एक सामान्य मुलगा अधिकारी होऊ शकतो हा त्यांनी दिलेला विश्वास! प्रत्येक स्टाफ मेंबरने ज्याज्या वेळी मदत लागेल तेव्हा खूप मदत केली. या प्रवासात आईवडीलांनी मोलाची साथ दिली. अपयशाने खचून न जाता त्यावर मात कशी करावी हे त्यांनी शिकवले. अरुण नरके फौंडेशनने दिलेला कानमंत्र म्हणजे, ''जेव्हा अपयश येते तेव्हा समजून जा, अजून तू ऐरण आहेस, घाव सोस ... आणि जेव्हा हातोडा होशील तेव्हा घाव घाल! ...'' स्पर्धा परीक्षेचा हा प्रवास खूप काही शिकवून गेला... मोलाच्या मार्गदर्शनाबद्दल अरुण नरके फौंडेशने खूप खूप आभार!



## शशिकांत विलास माने (विक्रीकर निरीक्षक महाराष्ट्रात ६ वा.)

सर्वप्रथम मी अरुण नरके फौंडेशनचा आभारी आहे. कारण, ''जो चांगल्या वृक्षाचा आधार घेतो त्याला चांगलीच सावली लाभते.'' या उक्तीप्रमाणे अरुण नरके फौंडेशनच्या वृक्षरूपी सावली मध्ये मी घडलो या बद्दल मला सार्थ अभिमान वाटतो.''

# यशवंतांची यशोगाथा



## सत्यवान विलास शेंबडे (CISF)

मी सत्यवान शेंबडे गाव–दिडवाघवाडी,(सातारा) या खेडे गावातून कोल्हापूरात शिक्षणासाठी आलो परंतू माझ्याकडे उदरनिर्वाह व शिक्षणाचा कोणताच मार्ग नव्हता. ज्यावेळी मी अरुण नरके फौंडेशन मध्ये आलो, त्यावेळी अरुण नरके साहेबांनी व सर्व स्टाफ ने मला मदत केली. शुन्यातून विश्व उभा करण्याची प्रेरणा अरुण नरके फौंडेशनमुळे मला लाभली. एखादयाला पुर्णपणे बदलण्याची ताकद अरुण नरके फौंडेशनमध्ये आहे. अरुण नरके फौंडेशन व नरके साहेबांचा मी सदैव ऋणी आहे.



## राहुल हनुमंत निपसे (जिल्हा महिला व बालविकास अधिकारी)

माझ्या धावपळीच्या वेळेत उरलेला वेळ अभ्यासात खर्च करताना, सकाळ, दुपार व अगदी रात्री उशिरापर्यंत सुध्दा अरुण नरके फौंडेशनने माझ्यावर विश्वास दाखवला व स्टडीरूम व इतर अभ्यास साहित्य उपलब्ध करून दिले व माझा यशाचा प्रवास सुरू झाला. त्याबद्दल अरुण नरके फौंडेशन व स्टाफ, कर्मचारी, मार्गदर्शक यांचे आभार. तसेच वेळो वेळी श्री. अरुण नरके साहेबांनी प्रेरणा दिली, त्याबद्दल त्यांचे व्यक्तीशः आभार. हे यश माझे वैयक्तीक न मानता मी अरुण नरके फौंडेशनचे यश मानतो.



## अक्षता धनंजय मुतालीक देसाई (बँक ऑफ इंडिया क्लार्क)

खरंतरं २०१४ ची IBPS Clerk ही परीक्षा मी दिलेली पहिलीच परीक्षा होती. पण मला अरुण नरके फौंडेशन कडून खूप चांगलं मार्गदर्शन मिळालं. प्रत्येक विषयाची तयारी पक्की झाल्यामुळे,फक्त सी. डब्लु. ई. चीच नाही तर Interview ची सुध्दा परफेक्ट तयारी झाल्यामुळे पहिल्याच प्रयत्नात मी यश मि ळवू शकले.

अरुण नरके फौंडशनने माझ्या करिअरचे फौंडेशन रचल्यामुळे पुढच्या टप्प्यांचा प्रवास सोपा झाला आहे.

# यशवंतांची यशोगाथा



**अमर चौगले** पोस्टल असिस्टंट

मनोगत सुरू करण्यापूर्वी मी आवर्जून सांगेन की, मी कोणती आयएएस, आयपीएसची परीक्षा क्लिअर केली नाही, पी.एस.आय., एस.टी.आय. परीक्षा क्लिअर केली नाही. मात्र माझ्या कुटुंबाच्या मोडक्या संसाराला आधार देईन अशी पोस्ट तर नक्कीच मिळवली आहे.

१ ली ते १० वी नेहमीच टॉपर राहील्याने घरच्यांच्या अपेक्षा माझ्याकडून जास्तच राहिल्या. मात्र ११वी, १२ वी च्या काळात हा टॉपर कुठे गायब झाला समजलेच नाही. १० वी ला ८२% मार्क्स मिळवणारा १२ वी ला ६२.६७% वर आला. डोळ्यासमोर काहीच ध्येय नसल्याने सी.ई.टी. परीक्षा पण दिली नाही. मग कोणाच्या तरी सल्ल्याने डी. एड. केले, पण डी. एड. शेवटचा पेपर ज्या दिवशी होता त्याच दिवशी समजले की पुढची ५ वर्षे शिक्षक भरती होणार नाही. माझी, माझ्या घरच्यांची सगळी स्वप्न डोळ्यांसमोर धूसर होताना दिसत होती. मग विचार केला की, जे होऊन गेले त्यावर विचार न करता भविष्याचा विचार करावा.

सुरक्षित नोकरी पाहिजे असेल तर स्पर्धा परीक्षेशिवाय पर्याय नाही असा विचार करून मी त्याचा अभ्यास सुरू केला. पण युद्ध जिंकायचे असेल तर सल्लागार, मार्गदर्शक पण त्याच योग्यतेचा निवडावा लागतो आणि माझ्या या युद्धात मला **अरुण नरके फौंडेशनचे** अमूल्य असे मार्गदर्शन मिळाले. माझ्यासाठी अभ्यास करणे हे कधी चॅलेंज नाही राहिले पण माझ्यासाठी माझी परीस्थिती नेहमीच चॅलेंजिंग राहिली. माझ्या जवळ नेहमी प्रवासाएवढेच पैसे असायचे. कधी चहा, नाश्ता करण्याचे मन झालेच तरी मी नाही करायचो. मग या परीस्थितीत मी उपाय म्हणून खाजगी शिकवण्या, इंग्रजी शाळेत शिक्षक म्हणून काम करत मिळेल तेवढा वेळ अभ्यास करत राहिलो. वडील हमाली करायचे, आई मोलमजुरी करायची. त्यांची ही परीस्थीतीच मला नेहमी प्रेरणा देत राहिली. २०१४ मध्ये माझी निवड पोस्ट ऑफिस च्या परीक्षेत पोस्टल असिस्टंट म्हणून झाली पण हा संघर्ष इथेच संपला नाही. याच परीक्षेची स्किल टेस्ट तीन वेळेस घेतली गेली होती. या स्पर्धा परीक्षेच्या जीवनात अनेक चढ-उतार आले पण ध्येय नेमके असल्याने मी ते साध्य केले.

मी माझ्या स्पर्धा परीक्षा जीवनात एक मोठी चूक केली, कदाचित ती परीस्थिमुळे असेल, की माझे अभ्यासात सातत्य राहायचे नाही. पण माझे मनोगत वाचणाऱ्या विद्यार्थ्यांनी तरी किमान ही चूक करू नये असे मला वाटते. पाण्याचा थेंब त्याच्या ताकदीमुळे नव्हे तर त्याच्या सातत्य मूळेच दगडाला भेदू शकतो. माझ्या या संघर्षातून एका जरी विद्यार्थ्याना प्रेरणा मिळाली व तो यशस्वी झाला तर मी माझ्या संघर्षाचे सार्थक झाले असे समजेन.पुन्हा एकदा अरुण नरके फौंडेशनचे आभार आणि सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा!

# मनोगत

## सदैव मानवहितासाठी कार्य करणारी संस्था

नमस्कार मी शशिकांत सुतार गेली १५ वर्षे नरके परीवारातल्या विविध शैक्षणिक संस्थामधून विविध शैक्षणिक व तांत्रिक जबाबदारींची कार्ये अध्यापन व व्यवस्थापनाची यशस्वी कार्ये करून आज अरुण नरके फौंडेशन मध्ये विकास अधिकारी पदाची धुरा सांभाळत आहे. या प्रवासात माझी कार्यतत्परता पाहून 'अरुण नरके साहेबांनी मला विविध विभागामध्ये काम करण्याची संधी दिली त्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे.

क्रिडा, सहकार, राजकारण व समाजकारण अशा विविध यशाची शिखरे सर करून सुध्दा आपली पावले सदैव जमिनीवर ठेवणारे, सर्वसामान्यांचे हित डोळ्यासमोर ठेवणारे अंगी सौजन्य, विनम्रपणा, समाजमन जपण्याचा गुण असणारे, मुलखावेगळे आदर्श व्यक्तीमत्व म्हणजे 'अरुण नरके साहेब!' त्यांची आभाळभर सामावलेली कर्तृत्वाची उंची, उज्ज्वल भविष्याकडे स्थिरावलेली दुरदृष्टी, कोणताही थाटमाट, बडेजावपणा यापासून नेहमीच अलिप्त, विनम्रपणा, खिलाडूवृत्ती नेहमीच आम्हा सर्वांना भारावून जाते, तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष मा. श्री. रामचंद्र पाटणकर साहेब, मा. श्री. रविंद्र उबेरॉय साहेब यांचे अमूल्य मार्गदर्शन, त्यांचे प्रेरणादायी विचार आम्हास संस्थेत काम करत असताना  नवचेतना, नवऊर्जा देतात.

जागतिक पातळीवरील मोठया संस्थांच्या कामाचा अनुभव असलेले संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन नरके साहेबांची समाजप्रती असणारी संवेदनशीलता, समस्यांचे निराकरण करण्यासाठी असणारी सततची धडपड, अमूल्य मार्गदर्शन आणि नाविन्याची आस, आम्हास काम करत असताना नवऊर्जा व हार्डवर्क करण्यास पाठबळ देतात, त्यांच्याकडून बऱ्याच नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. त्यामुळेच संस्थेच्या प्रगतीसाठी कार्य करत असताना वेळेचे भानसुध्दा राहत नाही.

ज्यांच्याकडे जिद्द आहे, आणि कष्टाने कर्तृत्वाचे आभाळ भेदण्याची ताकद आहे, अशा कर्तबशीर तरूणांच्या पंखात बळ मिळावे आणि पिढयानपिढया गरीबीत जीवन कंठणाऱ्या दारिद्र्याच्या झोपडीत आशेचे दिप लागावे या उदात्त हेतूने 'अरुण नरके फौंडेशन' गेली २६ वर्षे शैक्षणिक, स्पर्धा–परीक्षा, विविध सामाजिक कार्यातून अखंडीतपणे कार्यरत आहे.

जनतेसाठी, लोकहितास्तव, लोकार्पण भावनने, निस्पृह सामाजिक कार्य करणारे, नव्याचा स्विकार, जुन्यांचा आदर बाळगत, नवनवीन उपक्रम राबवून प्रशासनात आपल्या गुणवान विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ठसा उमटविणारे सर्वांना आपलेच व हवेहवेसे वाटणारे 'अरुण नरके फौंडेशन' मध्ये काम करण्याची मला संधी मिळाली त्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो, याचा आम्हास सार्थ अभिमान आहे.

भविष्यातही संस्थेच्या कार्याचा महान वटवृक्ष साता–समुद्रापार बहरत जावो, हि सदिच्छा!..

श्री. शशिकांत सुतार<br>
विकास अधिकारी<br>
अरुण नरके फौंडेशन

# मनोगत

## नावारुपास आलेली संस्था म्हणजे अरुण नरके फौडेशन

अरुण नरके साहेब ही आता व्यक्ती राहीली नसुन ती संस्था झाली आहे. सहकार, शैक्षणिक, क्रीडा, बँकीग, शेती, युवा, राजकीय व सामाजिक अशा विविध क्षेत्रावर अरुण नरके साहेब यांनी आपल्या व्यक्तिमत्वाचा आणि कार्य कुशलतेचा ठसा उमटविलेला आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात भरकटलेल्या युवक–युवतींना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन देत असतानांच त्यांना प्रसंगी धीर देण्याचं आणि योग्य मार्गदर्शन करायचं काम अरुण नरके फौंडेशनने केले आहे.

श्री. अरुण नरके साहेबांचा संकटात मदतीला धावून जाणं हा त्यांचा स्थायीभाव! जेष्ठ, श्रेष्ठ व्यक्तीपासून ते तळागाळातल्या लहान कार्यकर्त्यांपर्यंत सर्वानाच ते हवेहवेसे वाटतात, थोरसमाजसेवक बाबा आमटे यांनी एके ठिकाणी म्हटलं आहे की, हात उभारण्यासाठी असतात, उगारण्यासाठी नसतात, तसे श्री. अरुण नरकेसाहेब यांनी आजपर्यंत अनेक हात हातात घेवून जीवन प्रवास केला. उगारण्यासाठी उभारलेल्या अनेक हातांचे रुपांतर श्री अरुण नरके साहेब यांनी सामाजिक कार्याची धुरा वाहण्यासाठी केले.

संस्था ग्रामीण भागातील शेतकरी वर्गातील मुलांना स्पर्धा परिक्षा माहिती व सरकारी नोकरी मिळविण्यासाठी कोण कोणती परीक्षा दयावी लागते याचे मार्गदर्शन मिळावे यासाठी सदैव प्रयत्नशिल आहे. तसेच शेतकरी वर्गातील मुलांना माफक फीमध्ये शिक्षण मिळावे व विद्यार्थ्यांचा उत्कर्ष व्हावा, सर्वसामान्यांची स्वप्ने साकार व्हावीत यासाठी संस्था कार्यरत आहे. संस्था नेहमीचं केवळ अर्थाजनांचा हेतू बाजूला ठेवून सामाजिक बांधिलकीच्या प्रेरणेने, सेवाभावी वृत्तीने विविध सामाजिक उपक्रमातून अरुण नरके फौंडेशन गेली २६ वर्षे अखंडीतपणे कार्य करत आहे.

पूरग्रस्त व कोरोना लॉकडाऊनच्या काळात संस्थेने केलेली सामाजिक कार्ये कौतुकास्पद आहेत. अश्या संस्थेत मला लेखापाल म्हणून काम करणेची संधी मिळाली हे माझ भाग्यच आहे. संस्थेचे अध्यक्ष मा. चेतन अरुण नरके साहेब व संस्थेच्या भावी वाटचालीस हार्दीक शुभेच्छा!

श्री. प्रकाश शिंदे
वरिष्ठ लेखापाल
अरुण नरके फौंडेशन, कोल्हापूर

# मनोगत

## नावात एवढी ताकद कशी?

अरुण नरके  फौंडेशन म्हटले की डोळ्यासमोर येतात ते अरूण नरके साहेब. त्यांचे अष्टावधानी संयमी समाजशील व्यक्तीमत्व! संस्थेची स्थापना साहेबांच्या ५० व्या वाढदिनी झाली. आज संस्थेने यशस्वी वाटचालीचा मोठा टप्पा पूर्ण केला. ज्यां काळात कोल्हापूर व परीसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षांच्या तयारीसाठी पुणे, मुंबई सारख्या ठिकणी जावे लागत होते अशा काळात कोल्हापूरात एक सक्षम पर्याय निर्माण केला. आज ४६५० पेक्षा जास्त विद्यार्थी सरकारी अधिकारी झाले. संस्थेचा रौप्यमहोत्सव गेल्या वर्षी मोठया थाटात संपन्न झाला. एखाद्या नावात एवढी ताकद कशी? असा प्रश्न मला स्वतःला नेहमी पडायचा. साहेबांचा साधेपणा, आपुलकी, प्रत्येक कर्मचाऱ्याला सन्मानाची वागणूक, आयुष्यभर समाजकारण व सहकार याक्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने उमटवलेला वेगळा ठसा त्यातून उभारलेला हा एवढा मोठा पसारा. हे सर्व पाहिले की आपल्याला समजते, ही ताकद कर्तृत्वात असते आणि या कर्तृत्वामुळेच ती नावातून प्रकट होत जाते. त्यामुळेच एवढा मोठा मित्र परीवार, हितचिंतक वर्ग आणि जनसमुदाय आजही अखंडपणे त्यांच्या मागे उभा आहे.

श्री. अरुण नरके साहेबांनी कधीच कोणताही बडेजाव केला नाही. आयुष्यभर साधेपणा जपत आले. अगदी कार्यालयात कधी अचानक आले तर आम्ही सगळे उठून उभे रहायचो तर साहेब आम्हाला लगेचच खाली बसायला सांगायचे. तुमची जी काम चालू आहेत ती तुम्ही करा असे म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधायला सुरू करायचे. प्रत्येक विद्यार्थ्याला जवळ बोलावून आपुलकीने विचारायचे. कुठून आलास काही अडचण आहे का? फौंडेशन मध्ये अजून काही हव आहे का? त्यामुळे कितीतरी लोक दररोज फौंडेशनशी जोडले जात होते. नवीन आणि जुने असे असंख्य विद्यार्थी आजही अरुण नरके फौंडेशन परीवाराशी जोडले गेलेले आहेत. ते विद्यार्थी आज अधिकारी झालेत ते कोल्हापूरात काही कामानिमित्त आले तर फौंडेशनमध्ये येऊन आठवणीने भेटून जातात. जो साधेपणा अरुण नरके साहेबांनी आयुष्यभर जपला, तोच साधेपणा सध्याच्या अरूण नरके फौंडेशनचे विद्यमान अध्यक्ष मा. श्री. चेतन अरुण नरके साहेब देखील जोपासत आहेत. उच्चविद्याविभूषित परदेशात मोठया पदावर काम करून भारतात परतल्यावर देखील कोणताही बडेजाव नाही. हा समाजसेवेचा वसा आणि वारसा त्याच ताकदीने सक्षमपणे साहेब पेलत आहेत. 'अरुण नरके फौंडेशन ची स्थापना समाजकार्यासाठी झाली असल्याने नरके परीवार न थकता न थांबता, अखंडपणे हा समाजकार्याचा वारसा जोपासत आहे.

आजवर संस्थेला अनेक उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या. त्यातील एक मजेशीर प्रसंग म्हणजे, कोल्हापूरच्या तत्कालीन जिल्हा न्यायाधीश माननीय रूपराणी निंबाळकर या एके दिवशी त्यांच्या मुलासह स्पर्धा परीक्षांची माहिती घेण्यासाठी आमच्या शिवाजीपेठ शाखेत आल्या होत्या त्यांचा मुलगा दहावीची परीक्षा नुकतीच संपल्यामुळे थोडा निवांत होता.

# मनोगत

## नावात एवढी ताकद कशी?

त्याला पुढील करिअर संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी त्या फौंडेशनमध्ये घेऊन आल्या होत्या. त्यांना संपूर्ण मार्गदर्शन केलं. दहावीनंतरच्या करिअरच्या संधी, स्पर्धा परीक्षेतील करिअरच्या संधी या सर्वांवर बोलून मार्गदर्शन करून झाले, त्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले. तोपर्यंत त्यांनी मला हे कळू दिले नव्हते की, त्या जिल्हा न्यायाधिश आहेत म्हणून! शेवटी सर्व चर्चा संपल्यावर मला त्यांनी आपली खरी ओळख करून दिल्यावर मी उठून उभा राहिलो, तसे त्यांनी लगेच मला बसायला सांगितलं आणि म्हणाल्या जर तुम्हाला मी आल्या आल्या लगेच सांगितलं असतं की मी जिल्हा न्यायाधीश आहे म्हणून तर तुमच्यावरचा ताण प्रचंड वाढला असता. आता जो काही संवाद घडून आला तो एवढया सहजतेने घडला नसता. खूप छान माहिती दिली हे सांगायला त्या विसरल्या नाहीत. शेवटी अरुण नरके फौंडेशनच्या कार्याची प्रशंसा करून, संस्थेच्या कामकाजाबाबत, संस्थेबाबत विचारणा करून त्या निघून गेल्या.

मी सुरूवातीला शिवाजीपेठ शाखेत समुदपदेशकाची जबाबदारी पार पाडत होतो. समुपदेशक ते शिवाजी पेठ शाखेचा शाखाधिकारी हा प्रवास माझ्यासाठी खूपच रंजक होता, या सगळ्या कालावधीत अरुण नरके साहेबांना खूपदा भेटता आले. त्यांचा सहवास अगदी जवळून लाभला. त्यांचा साधेपणा खूप भावतो. नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या, नविन संधी निर्माण झाल्या. समुपदेशनाचा मोठा अनुभव पाठीशी असल्यामुळे व संपुर्ण संस्थेची सूक्ष्म माहिती असल्यामुळे शाखाधिकारी पदाचे काम करताना, जबाबदारी पार पाडताना त्याचा खूप फायदा झाला. मा. अरुण नरके साहेबांच्या मार्गदर्शनाने संस्था आपल्या समाजकार्याची कक्षा विस्तारत आहे. नवीन गरजेनुसार नवीन बदल, स्पर्धापरीक्षांसोबतच विविध क्षेत्रातील संधी ओळखून त्याप्रमाणे अद्यावत डिजिटल प्रणाली कार्यान्वित केली आहे. भविष्यात असंख्य विद्यार्थी याचा नक्कीच लाभ घेतील. यासर्व प्रयत्नांतून अनेक अधिकारी तयार होतील, यात तिळमात्रही शंका नाही. भविष्यात ही संस्था अशीच मोठया वटवृक्षाप्रमाणे बहरत राहो, खूप लोकांच्या कामी येवो, त्यातून समाजाचा उत्कर्ष होत राहो या सदिच्छा!

**रमेश गणपती कांबळे**
शाखाधिकारी,
शिवाजी पेठ, शाखा

# मनोगत

## तव किर्तीचा सुगंध दरवळत राहो ...

अरुण नरके फौंडेशन हे नाव वृत्तपत्रातील बातम्यांमधून अनेकदा वाचले होते. विविध सामाजिक कार्य, स्पर्धा परीक्षांमधून उत्तीर्ण होणारे असंख्य विद्यार्थी आणि मा. श्री. अरुण नरके साहेबांच्या नावाचे लाभलेले मोठे वलय. संस्था विविध शाखांच्या माध्यमातून आपल्या कार्याची कक्षा रूंदावत होती. अशा नामांकित संस्थेत काम करण्याची संधी मला मिळाली. शिवाजीपेठ मुख्य शाखेच्या शाखाधिकारी पदाची जबाबदारी माझ्यावर सोपवली गेली. यापूर्वीचा अनुभव व शिक्षण याचा पुरेपूर वापर करत व आपल्या कामाच्या माध्यमातून संस्था अगोदरपासूनच करत असलेल्या कामात प्रामाणिकपणे अजून मोठया उंचीवर नेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. कोणतेही काम एकटयाचे नसते त्यासाठी असंख्य हातांची गरज लागते. याच पध्दतीने सर्वांनी मिळून, एकजुटीने कार्य केल्यास ते सिध्दीस जाते. यावर विश्वास होता. यापूर्वीचा ॲपटेकसारख्या तांत्रिक संस्थेचा मोठा अनुभव पाठीशी असल्याने कार्यालयीन कामकाज आणि व्यवस्थापन पूर्वीपासूनच माहिती होते. त्याचा खूप फायदा झाला तसेच मा. श्री. अरुण नरके साहेबांनी कामाचे केलेले कौतुक यामुळे आत्मविश्वास वाढत गेला. सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने उत्तम काम करता आले.

विविध सामाजिक उपक्रम राबवताना दुर्गम भागातील वाडया वस्त्यांवर जाऊन तेथील मुलांना शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे वाटप करता आले. यावेळी त्या मुलांच्या चेहऱ्यावरील अवर्णनीय आनंद बघता आला. अंध मुलांच्या निवासी शाळेत फौंडेशनच्यावतीने मदत करण्यासाठी गेले असता मुलांच्या जेवणासाठीचे साहित्य संपले होते. ते खुप मोठं काम फौंडेशनच्या माध्यमातून करता आले. अरुण नरके फौंडेशनने काही गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना कमवा व शिका योजनेच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यापैकी बरीच मुले–मुली आज अधिकारी म्हणून कार्यरत आहेत आणि आपल्या सारख्याच गरीब, होतकरू मुलांना मदत करायला तयार देखील झाली आहेत. ही समाजसेवेची साखळी अखंड सुरू आहे. वर्षभराच्या शिवाजीपेठेतील कामगिरीनंतर संस्थेने शिवाजी पेठेतून नागाळापार्क शाखेच्या शाखाधिकारी पदाची जबाबदारी सोपवली.

आपली कामे जबाबदारी पूर्वक पार पाडणाऱ्या सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने चांगले काम सुरू आहे. मा. श्री. अरुण नरके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आता मा. श्री. चेतन नरके साहेब संस्थेची धुरी खुपच सक्षमपणे सांभाळत आहेत. परदेशातील उच्च शिक्षण व कामाच्या मोठया अनुभवाचा फायदा संस्थेला मोठया प्रमाणात होत आहे. तसेच मा. श्री. अरुण नरके साहेबांच्या कडून आलेला समाजकार्याचा वारसा मा. श्री. चेतन नरके साहेब संस्थेचे विद्यमान अध्यक्ष म्हणून अविरतपणे जपत आहेत.

मा. श्री. चेतन नरके साहेबांच्या मार्गदर्शनानुसार संस्था डिजिटल होत आहे, ई–लायब्ररी, ई बुक, ऑनलाईन क्लासेस, डिजिटल क्लासरूम, प्रशस्त ग्रंथालय, अभ्यासिका, सवलतीच्या दरात स्पर्धापरीक्षांची पुस्तक विक्री, आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज डिजिटल मुलाखत कक्ष या सर्व सोयी सुविधांच्या माध्यमातून भविष्यात अरुण नरके फौंडेशनमधून उत्तम दर्जाचे अधिकारी नक्कीच घडविले जातील. यापुढेही अरुण नरके फौंडेशनच्या समाजकार्याची कक्षा संपूर्ण भारतभर अशीच विस्तारात राहो, संस्थेच्या किर्तीचा सुंगध दूरदूरवर दरवळत राहो या शुभेच्छा!

**सौ. गौरी अभिजित देशपांडे**
शाखाधिकारी, नागाळापार्क

# मनोगत

## अरुण नरके फौंडेशन

**सांगली शाखेचा संक्षिप्त वृतांत**
**सन २००७-२०२०**

सन्माननीय पालक, विद्यार्थी मित्रहो,

आपल्या संस्थेचा व शाखेचा सर्व विविध भागांचा अहवाल आपल्यासमोर सादर करताना अतिशय आनंद होत आहे. गुणवत्तापूर्ण संस्कारक्षम व सक्षम बनविणारी, शिक्षण देणारे शैक्षणिक संकुल म्हणून आपल्या अरुण नरके फौंडेशनने ख्याती प्राप्त केलेली आहे. संस्थेच्या सर्व उपक्रमात, गुणवत्ता वाढीत व संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीत सर्व पालकवर्गाचे, विद्यार्थीवर्गाचे, हितचिंतकांचे सांगली परीसरातील सर्व संस्थांचे, आपल्या संस्थेच्या शाखेतील सर्व सेवकवर्गाचे, शिक्षकवर्गाचे बहुमोल सहकार्य सदैव लाभलेले आहे. या सर्वांविषयी मी शाखाधिकारी म्हणून अंतःकरणपूर्वक ऋण व्यक्त करतो.

सन २००७ झाली सांगलीतील मारुती पेठेतील अभिनंदन हॉटेल शेजारील इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर एका खोलीमध्ये मा. श्री. अरुण नरके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मा. श्री. अभिजीत मालगते यांनी सांगली शाखेचे पहिले शाखाधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारला आणि बिजांकुराची सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या कल्पवृक्षा कडे वाटचाल सुरू झाली, २००७ साली सांगलीमध्ये स्पर्धा परीक्षांबाबत योग्य मार्गदर्शन करणारी कोणतीही संस्था उपलब्ध नसेल अशा वेळी मा. श्री अरुण नरके साहेब यांच्या सांगलीमध्ये शाखा चालू करण्याच्या एका सुवर्ण विचाराने सांगली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी सरकारी नोकरीची दारे उघडली गेली. याबाबतीत सर्व सांगलीकर व विद्यार्थीवर्ग सदैव आपला ऋणी राहील. पहिले शाखाधिकारी मा. अभिजीत मालगते यांच्यापासून सुरू झालेला हा प्रवास वेळोवेळी येणाऱ्या सर्व नवीन शाखा अधिकाऱ्यांनी अधिक समृद्ध केला. यामध्ये प्रामुख्याने मा. श्री किरण कांबळे, मा. श्री. विशाल चौगुले, मा. श्री. भंडारी, मा. श्री. अमोल कांबळे, मा. श्री. सोमनाथ तुपे, मा. श्री. किरण लोंढे यांच्या कारकिर्दीचा उल्लेख करावा लागेल. या सर्वांनी वेळोवेळी शाखेच्या प्रगतीसाठी पूरक निर्णय घेतले व संस्थेच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. एप्रिल २०१७ नंतर शाखेने दूरवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन सांगली बस स्थानकापासून केवळ दोन मिनिटाच्या अंतरावर असणाऱ्या दीनानाथ चौक येथील इमारतीमध्ये दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर शाखा स्थलांतरित केली.

शाखेचा एका खोलीतून सुरू केलेला प्रवास आज एक स्वतंत्र अभ्यासिका, ग्रंथालय चार स्वतंत्र क्लास रूम, स्वतंत्र शाखाधिकारी व कौन्सिलर रूम विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन टेस्ट सरावासाठी कॉम्प्युटर ची सोय, विद्यार्थ्यांसाठी सवलतीत पुस्तक विक्री केंद्र शिवाय सर्व संस्था सीसीटीव्ही कॅमेरा च्या निगराणीखाली, २४ तास ॲक्वागार्डचे ते शुद्ध पाणी, पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधन व्यवस्था अशा स्वरूपातील सर्व सोयींनीयुक्त सुसज्ज शाखा सेवेसाठी आज उभी आहे.

जून २०१८ मध्ये श्री. किरण लोंढे यांच्याकडून शाखाधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारताना शाखेसमोर बरेच प्रश्न उभे होते. त्या सर्वावर मात करण्यासाठी सर्वप्रथम एक चांगली टीम असणे गरजेचे होते. त्यानुसार सर्व कर्मचारीवर्ग व शिक्षकवर्ग यांना विश्वासात घेऊन शाखेसमोरील प्रश्न सोडवण्यास प्राधान्य दिले. यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करण्याचा झाल्यास यशस्वी निकालात वाढ, विद्यार्थी प्रवेशात वाढ, सवलतीत पुस्तक विक्री केंद्र सुरुवात प्रत्येक महिन्यात विद्यार्थ्यांना चालू घडामोडी संदर्भात मोफत मार्गदर्शन, निबंधलेखन सराव, प्रोजेक्टरवर विद्यार्थ्यांना विविध विषयांचे मार्गदर्शन, परीक्षा फॉर्म भरून घेणे विद्यार्थी सकारात्मक कसे राहतील याची काळजी घेणे, सर्व विद्यार्थी वर्ग २४ तास संस्थेशी संपर्कात रहावा म्हणून व्हाट्स ॲप वरून सर्व सुचना देणे व मार्गदर्शन करणे होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना नोकरीची गरज असल्यास नोकरी मिळवुन देण्यासाठी प्लेसमेंट ची सोय, विद्यार्थीवर्ग कोणत्याही गोष्टीमुळे अडचणीत येऊ नये यासाठी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मानसिक समुपदेशन करणे याला प्राधान्य देण्यात आले व हे सर्व प्रश्न सोडवण्यात यश आले.

# मनोगत

## अरुण नरके फौंडेशन

**सांगली शाखेचा संक्षिप्त वृतांत**
**सन २००७-२०२०**

सर्व कर्मचारीवर्ग, शिक्षकवर्ग यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याने व त्यांनी दिलेल्या सल्ल्यांनी हे प्रश्न सोडवण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांना वेळावेळी शाखेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचे, प्रशासकीय अधिकारी वर्गाचे मार्गदर्शन व्याख्यान तसेच निबंध, प्रश्नमंजुषा यासारख्या स्पर्धा विविध विषयांच्या कार्यशाळा यासारखे उपक्रम आयोजित केले. संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त वर्षातून एकदा शाखेतील सर्व विद्यार्थी कर्मचारीवर्ग मिळून समाजाप्रती असणारे कर्तव्य लक्षात घेऊन रक्तदान यासारखे उपक्रम राबवितात.

या सर्वांचा परीणाम म्हणून आज शाखेत जवळपास सरासरी दोनशे विद्यार्थी विविध कोर्सेसना प्रवेश घेतात व अभ्यासिकेसाठी सुद्धा विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा आलेख वाढलेला आहे. राज्यात कोणत्याही ठिकाणी जाऊन कोणत्याही विषयावर सेमिनार घेऊ शकणारे तज्ञ मार्गदर्शक शाखेत उपलब्ध आहेत. शाखेत कार्यरत असणारे कर्मचारी वर्ग हा नेहमी शाखेच्या व संस्थेच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील असतो. शाखेत कार्यरत असणारे शिक्षकवर्ग हा त्यांच्या कामाबाबत कायम संशोधन विकास आणि प्रगती या तत्त्वावर वाटचाल करत आहे. यामध्ये उल्लेख करायचा झाल्यास वरिष्ठ शिक्षक श्री. सतीश पवार, सौ. पल्लवी काळे, श्री. सतीश देसाई, श्री.दिगंबर पाटील, सौ. उषादेवी कांबळे श्री.अन्यापनावर कुलकर्णी, सौ. सुप्रिया झांबरे हा सर्व तज्ञ शिक्षकवर्ग विद्यार्थी समाधान व यशाचा आलेख कसा चढता राहील यासाठी प्रयत्नशील असतो आणि याचीच परीणीती म्हणून सांगली शाखेतून शेकडो विद्यार्थी प्रशासकीय व बँकिंग सेवेत कार्यरत आहेत.

यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करायचा झाल्यास दीपा भिडे- महिला व बालविकास अधिकारी, सोनी शेट्टी झड्ख (राज्यात तिसरी), पुनम शिंगाडे राज्य गुप्तवार्ताधिकारी (ड्खऊ, राज्यात महिला प्रथम) अमोल रुपनर (एसटीआय व मंत्रालय सहाय्यक), विद्या कांबळे बँक (झज बँक ऑफ बडोदा), आसिम हुमनाबाद (क्लार्क सारस्वत बँक) असे शेकडो विद्यार्थी आहेत की जे शाखेतून मार्गदर्शन घेऊन यशस्वी झालेत व अरुण नरके फौंडेशन शाखा सांगलीचे नाव संपूर्ण देशात व राज्यात गाजवत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी सुसंस्कारित ज्ञानसंपन्न व स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन स्वावलंबी व्हावा या दृष्टीने संस्थेचे व शाखेचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

सध्या मा. श्री. अरुण नरके साहेब, अध्यक्ष मा. श्री. चेतन नरके साहेब, सर्व सन्माननीय विश्वस्त व वरीष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल सुरु असून सध्या UPSC व ११ वी, १२ वी साठी चे PCMB कोर्स वर्ग व या तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कोर्स चालू करण्याच्या नियोजनात आहे. संस्थेच्या सर्व उपक्रमांना तसेच भविष्यातील सर्व विकास कामांना सर्व विद्यार्थीवर्ग, पालकवर्ग, हितचिंतक माजी विद्यार्थी शिक्षकवर्ग व कर्मचारीवर्ग या सर्वांची मोलाची साथ मिळेल असा विश्वास आहे.

**विनायक चौधरी**
**शाखाधिकारी, सांगली**

# मनोगत

## ज्ञानदा

'ज्ञानदा' म्हणजे ज्ञान देणारी जननी याच 'ज्ञानदा' ते 'ओजस' प्रवास मी राजेश्वरी रा. पवार कथन करत आहे. मी अरुण नरके फौंडेशन येथे ग्रंथालय क्लार्क म्हणून रूजू झाले तेव्हा ग्रंथालय हे फौंडेशनच्या मुख्य इमारतीत होते. जसजसा हा वटवृक्ष वाढत गेला तसतसा त्यांच्या शाखांचा विस्तार होत होता. नविन काही देण्याचा संस्थेच्या ध्यासामुळे ग्रंथालय हे ओजस निकेतन या इमारती मध्ये स्थापन करण्याचे ठरवले गेले.

तेव्हा मीही नविन होते ओजसमध्ये खालचा मजला व वरच्या मजल्यावर कम्पार्टमेंट असलेली अभ्यासिका व तिसऱ्या मजल्यावर मुलींकरीता वसतीगृह अशी रचना करण्यात आली आणि २५ जुलै २०१४ रोजी याचे अनावरण करण्यात आले मोठ ग्रंथालय, पहिलीच कम्पार्टमेंट असलेली अभ्यासिका सगळ्याचे आकर्षण ठरले आणि पाहता पाहता अभ्यासिका भरून गेली. अभ्यासिकेतील विद्यार्थी, पुस्तके घेण्याकरता आलेले, पेपर वाचण्या करता आलेल्या विद्यार्थ्यांची सगळीकडे चेहल पहेल असायची, त्यांच्या बरोबरीने मी पण खूप काही शिकले कधी मार्गदर्शक तर कधी हितचिंतक तर कधी मुलींची आई म्हणून! मुलाशी प्रसंगी कठोर आणि कटु वागावे लागत होते. ओजस चे नाव सगळ्याच्या तोंडी होते त्यातच ओजस मधून यशस्वी होणाऱ्याची संख्या पण वाढत गेली.

ग्रंथालयात नाविण्य आणण्याकरता प्रयत्न करीत आहोत आधुनिक पध्दतीने ज्ञानाचा व माहितीचा खजिना सहज सोप्या पध्दतीने मुलांपर्यंत पोचण्याकरीता ई-लायब्ररी व डिजिटल लायब्ररी ही संकल्पना राबविण्याचा प्रयत्न करीत आहोत, यामुळे विद्यार्थ्यांपुढे ज्ञानाचा खजिना उघड होणार आहे. कोणतीही माहिती किंवा पुस्तक एका क्लिक वर मिळणार आहे.

ओजस म्हणजे तेजाकडून ज्ञानाकडे, तेज आणि ज्ञान यांच्या संगमातून ज्ञानाचा लख्ख प्रकाश सर्वत्र पसरणार आहे.

*ज गी जन्म माता पिता सत्य देती!*
*शिकावे शिकवावे सादही शिकावे!*
*स्वये वाचीत वाचीत वाचवावे!*
*म्हणुनीच ग्रंथालया मना पाही!*

सौ. राजेश्वरी पवार
ग्रंथपाल
अरुण नरके फौंडेशन

# मनोगत

## समाजसेवेचा महान वटवृक्ष ..

अरुण नरके साहेबांचा आपला ५०वा वाढदिवस साजरा करण्यास विरोध असतानाही त्यांच्या चाहत्यांनी गौरव समिती स्थापन केली. त्यातून १९९४ साली 'अरुण नरके फौंडेशन' या न्यासाची स्थापना झाली. अरुण नरके फौंडेशनद्वारे शहराबरोबर ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी शासकीय सेवेत रूजू होण्याचा मार्ग खुला झाला.

अरुण नरके साहेबांनी आपल्या कार्याचा कधीही गवगवा केलेला नाही, त्यांनी स्वतःच्या वागण्यातून आदर्श निर्माण केला आहे आणि लोकांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले, तोच वारसा मा. श्री. चेतन अरुण नरके चालवत आहेत. वडीलांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांची यशस्वी वाटचाल सुरू आहे. परदेशी उच्च विद्याविभूषित असूनही आपला साधेपणा त्यांनी जपला आहे व आपल्या हाताखालच्या लोकांना उभारी देवून मार्गक्रमण कसे करावे हे त्यांच्याकडून शिकता येते. अरुण नरके फौंडेशनचे अध्यक्ष, वाणिज्य सल्लागार थायलंड व इतर संस्थाचे विश्वस्त अशी अनेक पदे सांभाळत अरुण नरके फौंडेशनद्वारे समाजाचे ऋण फेडण्याचा त्यांचा प्रयत्न वाखाणण्यासारखा आहे. मागील वर्षापासून म्हणजेच पूराच्यावेळी लोकांना मदत असूदे किंवा कोरोना जागतिक महामारी असूदे स्वतःची पर्वा न करता अनेक लोकांना मदतीसाठी आपल्या सहकार्यांसोबत पुढे होते. आजतागायत संस्थेचा जो हेतू होता, 'मानवता हिताय तत्परम्म तो वारसा असाच पुढेही चालू राहील यात काही शंका नाही.

अरुण नरके फौंडेशनमध्ये काम करण्याची जी मला संधी मिळाली त्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजते कारण येथे काम करणारा कर्मचारी खूप काही शिकतो. संस्थेचे अध्यक्ष, विश्वस्त, अनेक मान्यवर मंडळी यांची समाजहिताची तळमळ पाहता खूप भारावून जायला होतं. संस्थेला या २६ वर्षात अनेक प्रगल्भ व्यक्तींचा व्यासंग लाभला आहे त्यामुळे संस्था कणखरपणे उभी आहे.

आजतागायत हजारो विद्यार्थी शासकीय व बँकींग क्षेत्रात कार्यरत आहेत, अशा तळागाळातील विद्यार्थ्यांना स्वप्न पाहायला लावून ध्येयापर्यत पोहचण्याचा मार्ग संस्थेने उपलब्ध करून दिला आहे आणि अशा पध्दतीने त्यांच्या कुटूंबाला उभं करण्याचे काम संस्थेने केले आहे तसेच शिवाजीपेठेसारख्या भागात अनेक महिलांना घर बसल्या उत्पन्न मिळवण्याची संधी, विद्यार्थ्यांसाठी मेस व रूमच्या माध्यमातून संस्थेने उपलब्ध करून दिली आहे.

भविष्यातही अरुण नरके फौंडेशन मोठया वटवृक्षाप्रमाणे विस्तारत राहो आणि या वटवृक्षाच्या फांदया सर्वदूर विस्तारत राहो हीच शुभेच्छा..!

सौ. शुभांगी मिलिंद शेळके
वरीष्ठ लिपिक
अरुण नरके फौंडेशन

उद्याच्या अथांग भविष्यात अनके स्वप्ने आकाराला येतील
या आकाशात झेप घेताना तुमच्या पंखात ताकद आणि
नजरेत आत्मविश्वास भरण्यासाठी
सदैव सज्ज आहे... अरुण नरके फौंडेशन!

ARUN NARKE FOUNDATION ®
ANF
मानवता हिताय तत्परम्

समाजसेवेतील तब्बल २६ वर्षांचा अनुभव असणारी यशस्वी संस्था

# अरुण नरके फौंडेशन

मानवता हितासाठी सदैव तत्पर...

मुख्य शाखा : 'चंद्रांगण' 628, 'ए' वार्ड, खंडोबा मंदिरासमोर, शिवाजी पेठ, कोल्हापूर. ✆ 0231-2627579 / 2628779

■ नागाळा पार्क शाखा : विवेकानंद कॉलेजसमोर, नागाळा पार्क, युथबँक 1 ला मजला, कोल्हापूर. 0231-2668950 ■

■ ग्रंथालय : ओजस निकेतन, न्यु कॉलेज, सरदार तालमीजवळ, शिवाजी पेठ, कोल्हापूर. 0231-2629796 ■

■ सांगली शाखा : 1058/ अ, मास्टर दिनानाथ चौक, गावभाग एस.टी स्टँडजवळ, सांगली. 0233-2332334 ■

http://www.anfworld.org.in info@anfworld.org.in arunnarkefoundation@gmail.com